मासिक वार्तापत्र • अंक 33 • ऑगस्ट 2023 • सहयोग मूल्य : रु. 10 • 16 पाने



# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक


कामगारांची जीवन स्थिती, कामगारांच्या तोंडून. मुक्काम पोस्ट : मंडाळा (मुंबई) 5

माल, उपयोग-मूल्य, विनिमय-मूल्य आणि मूल्य 6

बलात्कारी, महिला-विरोधी अपराध्यांना वाचवण्यात भाजप हिरिरीने पुढे 13


## मणिपूर, उत्तराखंड, हरियाणातील दंगली, ग्यानवापी, गोरक्षा ते समान नागरी कायदा: फॅशिस्ट भाजप सरकारांचे अपयश दडवण्यासाठी पुन्हा भडकावले जात आहेत धार्मिक उन्माद

### “इंडिया” आघाडीबद्दलचे भ्रम सोडा, क्रांतिकारी कामगार वर्गीय पर्याय उभा करा!

तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ मणिपूर मध्ये धगधगत असलेली अशांतता, उत्तराखंडमध्ये जून-जुलै मध्ये “लव्ह-जिहाद” च्या खोट्या प्रचाराआडून तापवले गेलेले मुस्लीमद्वेषी वातावरण, हरियाणामध्ये नूंह, गुरगाव येथे ऑगस्टच्या सुरुवातीला भडकावल्या गेलेल्या दंगली, काशीतील ग्यानवापी मशिदीचा वाद आणि मोदींनी पुढे आणलेला समान नागरी कायद्याचा मुद्दा हे सर्व दाखवतात की देशातील सत्ताधारी फॅशिस्ट भाजपकडे स्वतःचे गेल्या 9 वर्षातील अपयश लपवण्यासाठी, कर्नाटक-हिमाचल मधील राज्य विधानसभेतील पराभवानंतर मतांची बेगमी करण्यासाठी, बेरोजगारी-महागाई-भ्रष्टाचाराने त्रस्त कामगार-कष्टकरी जनतेच्या असंतोषाला भरकटवण्यासाठी शिल्लक आहे ते फक्त धर्मवादाचे, हिंदू-मुस्लिम विद्वेषाचे हत्यार, ज्याचा वापर करून 2024च्या निवडणुकांपूर्वी देशभरात ताणतणाव निर्माण करून मतांचे अधिक ध्रुवीकरण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

अशा स्थितीत, भांडवलशाहीचे नफ्याच्या दराच्या घसरणीचे आर्थिक संकट तीव्र असताना देशातील भांडवलदार वर्गाला नफ्याचा दर टिकवण्यासाठी कामकरी जनतेचे अधिकाधिक शोषण करवणाऱ्या धोरणांची गरज आहे. अशामध्ये भांडवलदारांना लुटीची खुली सूट देणारा, जनतेला निर्दयपणे दडपण्यात मागे-पुढे न बघणारा, आणि धार्मिक-जातीय ताणतणावांना ‘यशस्वी’रित्या बनवू-वापरू शकणारा फॅशिस्ट भाजपच बड्या भांडवलदारांचा लाडका पक्ष असला, तरी “इंडिया” आघाडी सारख्या आघाड्या ना या धार्मिक ध्रुवीकरणाला रोखू शकतात, ना गुणात्मकरित्या कोणतीही वेगळी धोरणे राबवू शकतात, ना कामगार-कष्टकऱ्यांच्या जीवनात खरे बदल घडवू शकणारा कोणता पर्याय बनू शकतात, हे समजणे आणि योग्य क्रांतिकारी कामगारवर्गीय पर्यायाच्या उभारणीचे काम हाती घेणे गरजेचे आहे.

संपादक मंडळ

#### मणिपूर, उत्तराखंड, हरियाणा, महाराष्ट्रः विद्वेषी राजकारणात होरपळतेय जनता

मणिपूर मध्ये गेले 3 महिने धगधगत असलेला असंतोष, दंगली, शेकडो माणसांचे मृत्यू, बलात्कार, जाळपोळ हे सर्व भारतीय जनता पक्ष आणि संघ परिवाराच्या हिंदुत्वाच्या फॅशिस्ट राजकारणाची थेट निष्पत्ती आहेत. 4 मे रोजी दोन कुकी महिलांवर झालेल्या बलात्कार आणि नग्न धिंडीच्या व्हिडिओंनी देशाला हादरवून सोडले, आणि मोदींचे मगरीचे अश्रू देशासमोर परत आले. परंतु ही एकमेव घटना नाही. गेल्या 3 महिन्यांमध्ये अशा शेकडो घटना झाल्या आहेत, ज्यांपैकी अनेकांचे एफ.आय.आर. सुद्धा दाखल झालेले नाहीत, आणि इंटरनेट बंदीमुळे त्या देशासमोर आल्या नाहीत.

मणिपुरचे भाजपचे मुख्यमंत्री एन.बिरेन सिंह यांची खुलेआम पक्षपाती भूमिका, सरकारी यंत्रणेने हिंसाचाराला दिलेले बळ, महिला अत्याचारात पोलिसांची समर्थनाची भूमिका, मेईतेई लिपुनचे प्रमुख प्रमोत सिंह यांचे संघ-भाजप सोबत असलेले नाते, हिंसाचारात मेईतेई-लिपुनची भूमिका, मणिपूरच्या डोंगराळ भागातील जमीन व इतर साधन-संपत्तीवरील अधिकाराच्या आणि सत्तेतील वाट्याच्या झगड्याला दिले जात असलेले हिंदू-ख्रिश्चन-आतले-बाहेरचे असे रूप, मेईतेई आणि हिंदुत्ववादी राष्ट्रवादाची जुळवलेली जोडी, पोलीस व सैन्य दलातील संघर्ष हे सर्व आणि डबल इंजिन भाजप सरकारचे सुव्यवस्था राखण्यातले घोर अपयश लपून राहू शकलेले नाही. परिणामी मेईतेई आणि कुकी या दोन्ही अस्मितांचे, ज्या कामगार वर्गाच्या विरोधातच काम करतात, आंदोलन तीव्र झाले आहे आणि उत्तर-पूर्व भारतातील मिझोराम सारख्या राज्यातही पोहोचले आहे. इतके असूनही भाजप बिरेन सिंह यांच्या पाठीमागे उभा आहे, आणि मेईतेई व हिंदू अस्मितांच्या ध्रुवीकरणाकडून राजकीय आस लावून आहे. या सर्वांचा वापर करून देशभरात भाजप मात्र भक्तमंडळींमध्ये आपली हिंदुरक्षक भूमिका चमकावण्याचे काम पुढे नेत आहे.

उत्तराखंडात मे-जून महिन्यात अशाच प्रकारे लव्ह-जिहादच्या आणि लँड-जिहादच्या खोट्या प्रचाराद्वारे धार्मिक भावना भडकावण्याचे काम संघ-भाजप परिवाराने केले आणि

पान 4 वर

## खाजगी सेना: भांडवली राज्यसत्तांचा आणि साम्राज्यवादी गटांचा क्रूर व भेसूर चेहरा

✎ निखिल

आपापल्या देशांच्या सैन्यदलांबद्दल अभिमानाची भावना, आणि भारतासारख्या देशात तर अंधभक्तीपर्यंत जाईल अशी भावना, निर्माण करण्याचे काम सर्वच राज्यकर्ते सतत करताना दिसतात. देशाचे रक्षण करणारे सैनिक हे खरेतर कामगार-कष्टकरी वर्गातूनच आलेले असतात, परंतु शेवटी त्यांना आदेश मात्र मानावे लागतात ते सरकारचे, अधिकाऱ्यांचे, जे स्वत: त्या-त्या देशातील भांडवलदार वर्गाच्या रक्षणासाठीच कटिबद्ध असतात. देशाच्या सैन्यदलांचे देशाच्या अस्तित्वाशी, देशाच्या ओळखीशी समीकरण घालून, सैन्यदलांचा असा गैरवापर करून जनतेला आपल्या सत्तेप्रती आज्ञाधारक बनवणारे जगभरातील सत्ताधारी मात्र काही प्रमाणात चोरीछुपे, आणि आता काही प्रमाणात तर खुलेपणाने खाजगी कंत्राटी कॉर्पोरेट सेना पोसताना, त्यांचा वापर करताना दिसत आहेत. यातून भांडवली राज्यसत्तांचा भेसूर चेहरा अधिक नागडेपणाने समोर येत आहे.

सैन्य आणि संरक्षण क्षेत्रात मागील 40 ते 50 वर्षात मोठ्या प्रमाणात खाजगीकरण सुरु आहे. सैन्यासाठी लागणाऱ्या जमिनीवरील रसद-यंत्रणेपासून (लॉजिस्टिक्स) तर मैदानावर लढाई करण्यापर्यंत विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणात खाजगी कंपन्या, खाजगी सैनिकी कंत्राटदार, खाजगी गुप्तहेर संस्था, संस्थात्मकरित्या आणि संस्थात्मक पातळीवर “थ्रेट ॲनालिसिस” करणाऱ्या विविध कंपन्या आणि संस्था ह्यांची अभूतपूर्व वाढ ह्या काळात झाली आहे. मागील एका वर्षात ह्यासंबंधी चर्चेला रशिया-युक्रेन युद्धाची पार्श्वभूमी लाभलेली आहे. युक्रेन युद्धाच्या संबंधात जगभरात आणि विशेषतः पश्चिमी भांडवली मीडिया मध्ये वॅगनर नावाच्या खाजगी कॉर्पोरेट कंत्राटी सैनिकी ग्रुपची युद्धातील भूमिका ह्यावर विविध पद्धतीने चर्चा होत आहे. पश्चिमी भांडवली मीडिया, सर्व काही जाणत असूनही, जणू ही अभूतपूर्व घटना आहे अशा पद्धतीने ह्याचे चित्रण करतो आहे. परंतु ह्या संदर्भात खाजगी सुरक्षा सेवेच्या नावावर मोठ्या प्रमाणात प्रशिक्षित निमलष्करी किंवा लष्करी प्रशिक्षण देणाऱ्या आणि सुरक्षेचे कंत्राट घेणाऱ्या विविध खाजगी कंपन्या, एजन्सी ह्यांचे अस्तित्वात येणे आणि त्यांत वाढ होणे तसेच खाजगी सैन्य, त्यांची क्रूरता, खाजगी सैन्य आणि भांडवली राज्यसत्तांचा संबंध इत्यादी वेगवेगळे मुद्दे समोर आले आहेत. कामगार वर्गाला आपल्या वर्गसंघर्षाच्या योग्य रणनीती निर्धारणासाठी ह्या सर्व स्थितीला नीट समजणे आवश्यक आहे.

भांडवलशाहीत वॅगनर ग्रुप सारखे क्रूर खाजगी सैन्य ही काही अभूतपूर्व

पान 12 वर

## पुन्हा एकदा गोमांस तस्करीच्या संशयावरून हत्या!

पान 3 वरून

आहे, ज्यानुसार त्याच बाजारांमध्ये जनावरांची खरेदी-विक्री होऊ शकते जे नोंदणीकृत आहेत आणि तेथेही गाईची विक्री फक्त शेतीविषयक कारणांमुळेच होऊ शकते, वधासाठी नाही. यामुळे निर्यात, रोजगार आणि बीफ उद्योग व चामडे उद्योग मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. भारत सरकारने 23 मे रोजी एक 'असाधारण'आदेश काढला, ज्याद्वारे पशु बाजारांमध्ये मारण्यासाठी होत असलेल्या पशु विक्रीवर बंदी आणली. याचा सर्वात जास्त परिणाम मांस उद्योगावर दिसून आला कारण या उद्योगाला लागणाऱ्या 90 टक्के पशूंचा पुरवठा अशाच बाजारांमधून होत होता. सोबतच चामडे उद्योगालाही कच्चा माल न मिळाल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे, असा उद्योग ज्यामध्ये 2006 ते 2011 दरम्यान 8.3 टक्के दराने वार्षिक वाढ होत होती. पण आता निर्यातीत वेगाने घट झाली आहे. या उद्योगात 25 लाख लोकांना रोजगार मिळतो, ज्यापैकी बहुतांश अनुसूचित जातींमधील आहेत. जवळपास 8 लाख दलित हे मेलेल्या जनावरांच्या कातडीच्या उद्योगावर जगतात पण हिंदुत्व ब्रिगेडच्या अफवांच्या जोरावर जमावाद्वारे होणाऱ्या हत्यांच्या घटनांमुळे फक्त दलितच नाही, तर या उद्योगाशी जोडलेले ट्रक चालक, व्यापारी आणि इतर लोकही मोठ्या प्रमाणात बाधित झाले आहेत. चामड्याचे उत्पादन करणारे लहान कारखाने, जे मुख्यत: दलितांना अशा कामांमध्ये नेमत होते, ते आता कामावरून काढले जात आहेत. घरगुती स्तरावर या उद्योगात काम करणाऱ्या लोकांची उपजीविका सुद्धा धोक्यात आहे. दुसऱ्या बाजूला सरकारने गाय / बैलाच्या चामड्याला शून्य टक्के कर लावून आयात करण्याची परवानगी दिली आहे, म्हणजे भारतात गाय मेली नाही पाहिजे, पण ती विदेशात मारली असेल तर स्वागत आहे! गरीब शेतकऱ्यांची सुद्धा दुरवस्था होत आहे. बहुतेक शेतकरी प्रेमाने जोपासलेल्या म्हाताऱ्या आणि आजारी जनावरांना विकत असतात जेणेकरून त्या पैशातून नवीन जनावरे घेऊ शकतील. आता नवीन गाईंना घेणे दूरच, उलट पशूहत्येवर पूर्ण बंदीमुळे शेतकऱ्यांना जनावरांच्या संगोपनाचा वेगळा खर्च (जो दरवर्षी जवळपास 40,000 रुपये असेल) करावा लागेल. या बंदीमुळे हिंदू आणि मुस्लिम दोघेही आपली जीविका गमावत आहेत.

गायीच्या नावावर राजकारण करून हे जनतेला आपापसात विभागण्याचे काम करतात जेणेकरून आपण आपल्या खऱ्या मुद्द्यांवर म्हणजेच शिक्षण, रोजगार, आवास, आरोग्य इत्यादींबाबत न बोलता असलेल्या खोट्या, फसव्या मुद्द्यांना घेऊन एकमेकांची डोकी फोडावीत! आज ही गोष्ट समजून घ्यायला लागेल की जाती - धर्माच्या नावावर ह्या कट्टर संघटनांकडून भडकवल्या जाणाऱ्या दंगलींमध्ये मरतात ती गरीब, कष्टकरी घरांतील मुलं! जेव्हा दंगलीचा वणवा पेटतो तेव्हा त्यात जळणारी घरं ही सामान्य कष्टकरी जनतेची असतात. कुठल्या नेत्या मंत्र्याची, बिल्डर-ठेकेदार-उद्योगपतींची नाहीत! ह्यांची मुलं कधीच रस्त्यांवर तलवारी-त्रिशूळ घेऊन धर्म रक्षणाच्या 'पवित्र' कार्यासाठी रक्ताच्या नद्या वाहताना दिसत नाहीत. उलट ते विदेशात मोठमोठ्या, नामांकित शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेत असतात, मौज-मज्जा करत असतात! हे गौरक्षणाचे, धर्मरक्षणाचे 'पवित्र' काम सामान्य कष्टकरी घरातल्या तरुणांचा उपयोग करवून घेऊन करवले जाते म्हणजे ह्यांना त्यांच्या राजकारणाच्या पोळ्या शेकता याव्यात, जनतेने आपआपसात लढत रहावं म्हणजे ह्यांना सर्व लोकशाही अधिकार संपवता येतील, कामगार कायदे नष्ट करता येतील, जनतेवर अमाप कर लावून महागाई अतोनात वाढवता येईल आणि ते सर्व करता येईल ज्यामुळे मालक, ठेकेदार, बिल्डर, उद्योगपती यांच्या तिजोऱ्या भरता येतील! म्हणून ह्यांना आपण आपल्या वस्त्या-गल्ल्यांमधून बाहेर हाकलून द्यायला हवे. यामागील राजकारण समजून घेऊन एकजूट होऊन आपल्या वास्तविक मागण्यांसाठी संघटित होऊन लढावं लागेल. अखलाख, पहलू पासून ते अफानपर्यंत सर्वांना तेव्हाच न्याय मिळेल!

### 'कामगार बिगुल'चे सर्व वाचक आणि हितचिंतक यांना आवाहन

'कामगार बिगुल'च्या सर्व वाचकांना आणि हितचिंतकांना आमचे आवाहन आहे की जर आपण या प्रकाशनाचे महत्त्व समजत असाल आणि जनतेचे प्रसारमाध्यम उभे करण्याच्या आमच्या प्रयत्नांचा एक आवश्यक भाग मानत असाल, तर खालील मार्गांनी 'कामगार बिगुल' सुरू ठेवण्यात आम्हाला साथ द्या:

1. कामगार बिगुलची वार्षिक, पंचवार्षिक वा आजीवन सदस्यता घ्या.
2. जर तुमची सदस्यता संपली असेल, तर तिचे नुतनीकरण करा.
3. 'कामगार बिगुल' चे वितरक बना. याला जास्तीत जास्त संख्येने कामगार-कष्टकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यात तुमची भूमिका बनवा.
4. 'कामगार बिगुल' करिता नियमित आर्थिक सहयोग द्या.

आम्ही जनतेच्या शक्तीवर विश्वास ठेवतो आणि आमच्या अनुभवाने सिद्ध केले आहे की कोणतीही तडजोड न करता, एका विचाराने जोडलेल्या लोकांची एकत्र मेहनत, आणि सहयोगाच्या जिवावर मोठी कामं होऊ शकतात. याच शक्तीच्या आधारावर गेली अनेक वर्षे कामगार बिगुल प्रकाशित होत आहे. तुम्ही साथ द्याल, याचा विश्वास नक्कीच आहे.

### बिगुल व्हॉट्सॲप चॅनेल

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सॲप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सॲप चॅनेल जॉईन करावा :**

**http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा :**

**9892808704**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वत: कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**

**लेनिन**

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वत:चे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727

• अहमदनगर : 74992 64646

• पुणे : 8669735643


### 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांत्यांचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अशा चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य राजकीय कार्यदिशेची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य कार्यदिशेच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्यांच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतिकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

**खाजगी वितरणासाठी**

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | kamgarbigul@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 10 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 120 (टपाल शुल्काशिवाय) |

# पुन्हा एकदा गोमांस तस्करीच्या संशयावरून हत्या!

## फॅशिस्टांनी उभ्या केलेल्या गोरक्षकांच्या उन्मादी जमावाचे जनविरोधी चरित्र ओळखा!

✎ पूजा

कामावरून घरी परतणारी, किराणा घ्यायला चौकातल्या दुकानात गेलेली किंवा कुठल्याही कारणाने घराबाहेर पडलेली घरातील व्यक्ती घरी येतच नाही आणि कळतं की तिला जमावाने ठेचून मारलं!! काल्पनिक नाही तर सत्य घटना! एक नाही अनेक घटना!! घराबाहेर काय घरात देखील जाऊन जीव घेतल्याच्या घटना!! कारण? फक्त संशय!! गोमांस खाण्याचा संशय, गोमांस वाहतूक करण्याचा संशय! ह्या गोरक्षेच्या हत्यांच्या साखळीत अखलाख, मजलूम, इम्तियाज, तबरेझ आणि कित्येक जीव गमावले गेलेत आणि आता त्यात 24 जून रोजी आणखी एक नाव जोडलं गेलंय, 32 वर्षीय अफान अन्सारीच! या घटनेने पुन्हा एकदा गोमातेच्या नावाने राजकारणाच्या पोळ्या भाजणाऱ्यांचे खरे चरित्र उघडे करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

महाराष्ट्रातल्या नाशिक मध्ये गोरक्षेच्या नावाखाली धार्मिक कट्टरतेत मदमस्त असणाऱ्या जमावाने गोमांस वाहतूक करत असल्याच्या संशयावरून अफान अन्सारी, नासीर शेख ह्या दोन मुस्लिम युवकांना 24 जून रोजी मारहाण केली ज्यात अफानचा मृत्यू झाला. हे दोघे कार मधून प्रवास करत असताना हिंदुत्ववादी जमावाने यांना अडवले, गाडीतून बाहेर काढले आणि लोखंडी रॉडने बेदम मारहाण केली. घोटी-सिन्नर रोडवर ही घटना घडली. चालू गाडी थांबवून, दमदाटी करत मूळचे कुर्ला, मुंबई येथील रहिवासी असलेले 32 वर्षीय अफान व 24 वर्षीय नासीर ह्यांना बाहेर खेचत त्यांच्याकडे असलेलं मांस हे गोमांस आहे सांगत त्यांना अमानुषपणे लोखंडी, लाकडी सळयांनी मारहाण केली. पोलिसांनी धामणगाव रुग्णालयात दोघांना दाखल केले असता रस्त्यातच अफान अन्सारीचा मृत्यू झाला तर नासीर शेखची स्थिती गंभीर आहे. ह्यापूर्वी देखील इगतपुरीजवळ ह्या गौरक्षकांनी 23 वर्षीय लुकमान अन्सारी याची गोमांस नेत असल्याच्या संशयावरून हत्या केली होती.

गेल्या 9 वर्षात नित्याची बनत गेलेली बातमी म्हणजे अशी जमावाने केलेली हत्या, म्हणजेच 'मॉब लिंचींग' फॅशिस्ट, हिंदुत्ववादी शक्तींनी समाजात पसरवलेल्या धार्मिक कट्टरतेच्या विषाचं क्रूर प्रतिबिंब आहे. आज देशभरात गोरक्षा, लव्ह जिहाद, लँड जिहाद सारखे खोटे, फसवे मुद्दे घेऊन धार्मिक उन्माद पसरवण्याचे काम केले जाते आहे. रा. स्व. संघ, बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, हिंदू महासभा यांसारख्या कट्टर हिंदुत्ववादी, धार्मिक उन्माद पसरवणाऱ्या संघटना ह्यात प्रामुख्याने पुढे आहेत. एका अहवालानुसार 2012 ते 2023 ह्या काळात 'मॉब लिंचींग'च्या तब्बल 90 घटना घडल्या ज्यात 45 मृत्यू झालेत! 2010 पासून आजपर्यंत गोहत्येसंदर्भातील हल्ल्यांमध्ये जितके मृत्यू झाले आहेत, त्यामध्ये 86% मुस्लिम आहेत आणि त्यातही 96.8% हल्ले 2014 नंतर झाले आहेत. 63 पैकी 32 घटना भाजप शासित राज्यांमध्ये झाल्या आहेत. इंडिया-स्पेंडच्या एका अहवालानुसार गेल्या 7 वर्षात जमावाकडून हत्येच्या घटनांमध्ये जवळपास 28 लोकांचा मृत्यू झाला आहे, ज्यात 24 लोक मुस्लिम होते. यापैकी निम्म्याच्या वर हल्ले (52%) अफवांवर आधारित होते. इंडिया-स्पेंडच्या अहवालात असेही दिसून आले आहे की गेल्या 8 वर्षांमध्ये अशा 63 हल्ल्यांपैकी 61 हल्ले 2014 ते 2017च्या दरम्यान झाले आहेत आणि थोड्या (5%) घटनांमध्ये कोणालाही अटक झालेली नाही, उलट 13 घटनांमध्ये (म्हणजे 21%) पोलिसांनी पीडित व्यक्तींच्या विरोधातच गुन्हा दाखल केला आहे. असे दिसून आले आहे की यापैकी 23 घटनांमध्ये विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि स्थानिक गोरक्षण समिती सारख्या कट्टर हिंदुत्ववादी फॅशिस्ट संघटना सक्रिय होत्या.

### भारतीय जनता पक्षाचा पवित्र नव्हे, राजकीय प्राणी: गाय!

2014 ते 2018 दरम्यान नेत्यांच्या भाषणात होणाऱ्या जातीय, धार्मिक द्वेष पसरवणाऱ्या भाषेचा प्रयोग पूर्वीपेक्षा पाच पटीने अधिक होता ज्यात 90% भाजपा नेते होते आणि त्यात गायींचे संरक्षण एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा होता. 2014 च्या निवडणूक प्रचार अभियानादरम्यान नरेंद्र मोदी सतत गोरक्षेबद्दल बोलत होते. वेळोवेळी भाजपा नेत्यांनी केलेल्या मुस्लिम द्वेष पसरविणाऱ्या, हिंसेचे समर्थन करणाऱ्या वक्तव्यांची काही उदाहरणे पाहूयात.

*"आपण कायदा हातात घेऊ नये, पण त्याच्या (पहलू खान) मृत्यूबद्दल आम्हाला दुःख नाही कारण जे गायतस्कर आहेत ते गोहत्या करणारे आहेत; त्यांच्यासारख्या पापींच्या नशिबी यापूर्वीही हेच होते आणि यापुढेही राहील."*

*- ज्ञानदेव आहुजा, भाजपा आमदार, राजस्थान राज्य, एप्रिल 2017.*

*"भारतीय संस्कृतीचे रक्षण करण्याचा एकच मार्ग आहे: गौ (गाय), गंगा आणि (देवी) गायत्री यांचे रक्षण करणे... या वारशाचे रक्षण करणारा समाजच टिकेल. अन्यथा अस्मितेचे मोठे संकट उभे राहील आणि अस्मितेचे हे संकट आपले अस्तित्व धोक्यात आणेल"*

*– आदित्यनाथ, भाजपा मुख्यमंत्री, उत्तर प्रदेश राज्य, नोव्हेंबर 2017*

*"जोपर्यंत गायीला राष्ट्रमातेचा दर्जा दिला जात नाही तोपर्यंत गोरक्षकांना तुरुंगात टाकले किंवा त्यांच्यावर गोळ्या झाडल्या तरी गोरक्षण युद्ध थांबणार नाही."*

*- टी राजा सिंह लोध, भाजप आमदार, तेलंगणा राज्य, जुलै 2018*

*"जे गोमांस खाण्यासाठी मरत आहेत, ते पाकिस्तान किंवा अरब देशांमध्ये किंवा जगातील इतर कोणत्याही भागात जाऊ शकतात जिथे ते उपलब्ध आहे."*

*– मुख्तार अब्बास नक्वी, भाजप, केंद्रीय संसदीय कामकाज राज्यमंत्री, मे 2015*

*"आमच्या मातेला मारण्याचा प्रयत्न केला तर आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही मरायला आणि मारायला तयार आहोत."*

*-साक्षी महाराज, भाजपचे खासदार, मोहम्मद अखलाकच्या हत्येबद्दल, ऑक्टोबर 2015*

*"मुस्लिम या देशात राहू शकतात, पण त्यांना गोमांस खाणे सोडावे लागेल. गाय हा आमचा श्रद्धेचा विषय आहे."*

*-मनोहर लाल खट्टर, भाजपचे मुख्यमंत्री, हरियाणा राज्य, ऑक्टोबर 2015*

*"गायीला मारणाऱ्यांना आम्ही फाशी देऊ."*

*- रमन सिंह, भाजपचे मुख्यमंत्री, छत्तीसगड राज्य, एप्रिल 2017*

*"मी वचन दिले आहे की गायीला माता न मानणाऱ्यांचे आणि त्यांची हत्या करणाऱ्यांचे मी हात-पाय तोडीन"*

*- विक्रम सैनी, भाजपा आमदार, उत्तर प्रदेश राज्य, मार्च 2017*

या सर्व वक्तव्यांमधून हेच दिसून येते की वर्तमान सरकारकडून गोरक्षणाच्या नावावर होत असलेल्या राजकारणाचे समर्थन अशा प्रकारच्या उन्मादी जमावांना प्रोत्साहन देत आहे. या हिंदुत्ववादी फॅशिस्ट शक्तींना जमावाद्वारे हत्यांमधून दहशत निर्माण करून, धार्मिक अल्पसंख्य व दलितांना असे दुय्यम नागरिक बनवायचे आहे ज्यांच्यासाठी कायदा आणि लोकशाही अधिकारांचा काहीच अर्थ नसेल.

ह्यांची गोमाता, गायीवरच्या प्रेमाची सत्यता ही आहे की ह्यांना गायीशी काहीच घेणे देणे नाही, तिच्या नावावर राजकारण करून ह्यांना मुस्लिम समुदायाला निशाणा बनवून एक नकली शत्रू आपल्यासमोर उभा करायचा आहे. आपण हे विसरता कामा नये की **भाजपाचे अर्नेस्ट मावरी, एन. बिरेन सिंह, विसासोली ल्होंगू, श्रेप्रकाश यांच्यासारखे नेतेच केरळ आणि उत्तर-पूर्व भारताच्या राज्यांमध्ये उघडपणे गोमांस खाण्याबद्दल बोलतात किंवा निवडणुकीत भाजपा निवडून आली तरी गोमांस मिळणं बंद होणार नाही याचे आश्वासन देतात.** अमित शहा गोव्यात जाऊन तिथल्या जनतेला आश्वासन देतो की गोव्यात गोमांस विक्री कधीच बंद होणार नाही. भाजपा नेता संगीत सोम खुद्द अल-दुआ नावाच्या कत्तलखान्याचा मालक असल्याचे समोर आले आहे! परंतु ह्याबद्दल रा. स्व. संघ, भाजपा, हिंदू महासभा, विहिंप एक चकार शब्द सुद्धा काढताना दिसत नाहीत कारण वास्तवात गाय यांच्यासाठी एक पवित्र प्राणी नसून एक राजकीय प्राणी आहे! अनेकदा ह्या संघटनांनीच षडयंत्रकारी पद्धतीने स्वतः गोहत्या करून गोमांस मुस्लिम वस्तीत, मुस्लिम घरात ठेवून दंगे भडकवण्याचा, जमावाला घेऊन मुस्लिमांवर हल्ला करण्याचा, त्यांना जीवे मारण्याच्या घटनांना सत्यात उतरवले आहे. अशाच एका घटनेत हिंदू महासभेचा मुख्य प्रवक्ता असलेला संजय जाट मुख्य आरोपी होता. सप्टेंबर 2015 मध्ये 50 वर्षीय मोहंमद अखलाखला जिवानिशी मारण्यात आले आणि त्याचा 22 वर्षीय मुलगा गोरक्षकांनी केलेल्या मारहाणीत गंभीररित्या जखमी झाला. ह्या घटनेत आरोपी म्हणून अटक करण्यात आलेल्यांमध्ये एक भाजपाच्या स्थानिक नेत्याचा मुलगा देखील होता पण आज त्याच्यासह सर्व आरोपी जामिनावर बाहेर आहेत आणि अखलाखच्या कुटुंबाला ह्यांनी गुंडागर्दी करून गाव सोडण्यास भाग पाडले आहे. फॅशिस्ट शक्तींकडून गोरक्षणाचा मुद्दा नेहमीच उचलला गेला आहे. स्वतंत्र भारतात आर.एस.एस.ने सतत गोमांस प्रतिबंधक कायद्याच्या मुद्याला एका जन-अभियानाच्या स्वरूपात उचलले आहे. अशाप्रकारे गाईला खूप काळापासून एका राजकीय वाहनाच्या स्वरूपात वापरले गेले आहे आणि अनेकदा हे हिंदू-मुस्लिम दंगलींचे कारणही बनले आहे.

### संघ परिवाराचे 'पवित्र'गाईचे मिथक

संघ परिवाराकडून पसरवले जाणारे पहिले असत्य हे की हिंदू संस्कृतीने नेहमीच गोहत्येला निकृष्ट मानले आहे. संघाने भारतात गोमांस खाण्याच्या प्रथेला इस्लाम सोबत जोडण्याचा प्रयत्न केला आहे (यात लक्षात घेण्याजोगी बाब ही की मुघल सम्राट बाबर, अकबर, जहांगीर आणि औरंगजेबाने जैन व ब्राह्मणी भावनांना समायोजित करण्यासाठी गोहत्येवर बंदी घातली होती) आणि गोमांस खाण्याला मुस्लिम समुदायाची ओळख म्हणून स्थापित करण्याचा प्रयत्न सतत केला आहे. लोकांमध्ये या भ्रमाचा प्रसार करण्याचे काम संघ व्यवस्थित करत आहे की मुस्लिमांनी गोमांस खाणे चालू केले कारण मुस्लिम नेहमीच हिंदू संस्कृती विरुद्ध असतात आणि हिंदू संस्कृतीने आदीकाळापासून गाईला पवित्र आणि गोहत्येला निकृष्ट व पाप मानले आहे. भारतात इस्लाम येण्याच्या खूप अगोदर पासून गोमांस खाण्याची प्रथा प्रचलित होती. प्राचीन भारतीय ग्रंथांमध्ये पुरेसे पुरावे उपलब्ध आहेत जे हे सिद्ध करतात की गोमांस खाण्याची प्रथा भारतात अनेक शतकांपासून प्रचलित आहे. वैदिक काळात (जवळपास ई.स.पूर्व 800 ते 1500) भारतात 'पवित्र' गाय अशी कुठलीही कल्पना अस्तित्वात नव्हती. वैदिक आर्यांच्या धार्मिक कर्मकांडांमध्ये अनेकदा गाईचा बळी दिला जात होता. या विषयावर डी.एन.झा यांचे पुस्तक 'द मिथ ऑफ द होली काऊ' (पवित्र गाईचे मिथक) यात खूप सविस्तर चर्चा केली आहे आणि तथ्यांसहित सिद्ध केले आहे की हिंदू संस्कृतीने नेहमीच गोहत्येला निकृष्ट मानलेले नाही. आजही फक्त मुस्लिम गोमांस खात नाहीत, तर हिंदू धर्मातीलही अनेक जाती गोमांस खातात. केरळ मध्ये 72 जाती आहेत, ज्यापैकी अनेक हिंदू आहेत, ज्या गोमांस खातात. याशिवाय अनेक खालच्या म्हटल्या जाणाऱ्या जातीही गोमांस खातात. सर्वसाधारणपणे दलित, आदिवासी आणि शूद्र समजल्या जाणाऱ्या समुदायांमधील खालच्या स्तरांमध्ये मांस खाल्ले जाते. गोमांस हे प्रथिनांचा सर्वात स्वस्त स्त्रोत असल्यामुळे ते यावर अवलंबून आहेत. याकडेही लक्ष दिले पाहिजे की जगाच्या स्तरावर गोमांस खाणाऱ्यांमध्ये भारत सातव्या स्थानावर आहे.

### भाजपा, आरएसएस प्रणित गोहत्याबंदी कायद्याचे आर्थिक आणि सामाजिक परिणाम

2014 च्या निवडणूक प्रचारात गाय-गाय करून हंबरडा फोडणाऱ्या, गायींच्या मृत्यूने आकस्मिक चिंतित झालेल्या प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा गायी मारल्या जाण्याचा तर्क सपशेल खोटा ठरला जेव्हा 2012 मध्ये झालेल्या जनावरांच्या जनगणनेतून लक्षात आले की भारतात गाईंच्या संख्येत 6.2 टक्के दराने वाढ झालेली आहे! यातून गाईंचा मोठ्या प्रमाणात मारल्या जाण्याचा प्रश्नच उरत नाही! तसे तर अगोदरपासूनच भाजप शासित राज्यांमध्ये गोमांस बंदी कायद्यांमधील बदलांमुळे बीफ उद्योग आणि चामडे उद्योगाचे खूप नुकसान झाले आहे. मे महिन्यात भाजप सरकारने केंद्रीय स्तरावर 'प्रिव्हेंशन ऑफ क्रुएल्टी टू ॲनिमल्स ॲक्ट 1960' मध्ये एक नवीन कलम जोडले

पान 2 वर

# फॅशिस्ट भाजप सरकारांचे अपयश दडवण्यासाठी पुन्हा भडकावले जात आहेत धार्मिक उन्माद

पान 1 वरून

परिणामी देशभरात ताणतणाव वाढवले. एका अल्पवयीन मुलीच्या अपहरणाच्या प्रकरणाला, ज्यामध्ये एक हिंदू व एक मुस्लीम मुलगा सामील होते, आणि जिथे तक्रारकर्त्या नातेवाईकांच्या मते कोणताही धार्मिक मुद्दा नव्हता, संघ-भाजपच्या अफवा-प्रचार यंत्रणेने लव्ह-जिहादचा मुद्दा बनवले आणि राज्यातील अनेक मुस्लिम दुकानदार-व्यापाऱ्यांना पळून जाण्यास भाग पाडले.

हरियाणा मध्ये येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांबद्दल भाजपला सत्ता टिकवण्यावरून अगोदरच बुडबुडा आला आहे. त्यामुळेच तिथेही धार्मिक दंगलींचे षडयंत्र जोरात रचले गेले आहे. ऑगस्टच्या सुरुवातीलाच मेवात जिल्ह्यातील नूंह मध्ये झालेल्या दंगलीत हिंदू-मुस्लिम अनेकांचे जीव गेले आणि अनेक जखमी झालेत. विहिंप-बजरंग दलाद्वारे आयोजित एका ब्रजमंडल यात्रेवर कथित हल्ला झाला आणि दंगली भडकल्या असे म्हटले जात आहे. विहिंप आणि बजरंग दलाने योजना बनवून भडकावणारी भाषणे दिली, भडकावणाऱ्या नाऱ्यांसहित "धार्मिक शोभा यात्रा" काढली, गोरक्षणाच्या नावाने ज्यांच्यावर खून, मॉब लिंचिंग सारखे गुन्हे दाखल आहेत ते मोनू मानेसर सारखे अपराधी, बिट्टू बजरंगी सारखे लंपट अपराधी या यात्रेच्या आयोजनामध्ये हिरिरीने पुढे होते आणि यात्रेत सहभागी होण्याचे आवाहन लोकांना करत होते, जनतेच्या योग्य मुद्यांवरील आंदोलनांना सुद्धा दाबणाऱ्या सरकारने संवेदनशील भागातून जाण्यासाठी अशा यात्रेला परवानगी दिली, यातून दिसून येते की धार्मिक भावना भडकावण्याचे नियोजन झालेले होते. हरियाणाचे उपमुख्यमंत्री दुष्यंत चौताला यांनी म्हटले आहे की विहिंप व इतर आयोजकांनी यात्रेची पूर्ण माहिती दिली नव्हती, मोनू मानेसर सारख्या नकली गोरक्षकांवर कारवाई केली जाईल, आणि पोलीस दलाने नीट नियोजन केले नव्हते असेही म्हटले, परंतु हे फक्त दिखाव्याचे नक्राश्रू आहेत. यात्रेमध्ये तलवारी आणि बंदुका लहरवत, डिजे वाजवत, धमक्या देत चालणारी गर्दी कोणता धार्मिक सण "साजरा" करण्यासाठी एकत्र आली होती, आणि हे सरकारला दिसत नव्हते का? मोनू मानेसर सामील असल्यामुळे मुस्लिम गटांकडून यात्रेवर हल्ला करण्याचे पूर्वनियोजन केले गेले होते अशा बातम्या समोर येत आहेत. हे खरे असेल तर ते भाजपच्या राज्य सरकारच्या पोलीस दलाचे कायदा-सुव्यवस्था टिकवण्यातील अपयश नाही का? नूंहच्या घटनेनंतर गुरुग्राम आणि दिल्लीमध्ये सुद्धा मुस्लिमांवर हल्ल्याच्या घटना तत्काळ घडल्या आहेत. देशभरामध्ये भाजप सरकारांद्वारे अशा कार्यक्रमांना खुलेआम परवानगी दिली जात आहे, आणि सर्वोच्च न्यायालयाच्या केविलवाण्या आवाजात दिल्या गेलेल्या इशाऱ्यांना धुडकावून लावत हिंदुत्ववादी भडकावू भाषणे करणाऱ्यांवर कुठेही कारवाया केल्या जात नाहीयेत.

गेल्या 6 महिन्यात, महाराष्ट्रातही आमदार खरेदी-विक्रीचे घोडा-बाजार भरवून सत्तेत परत आल्यानंतर नितेश राणे, गणेश नाईक, गीता जैन, आमदार आशिष शेलार, प्रवीण दरेकर, खासदार गोपाळ शेट्टी व मनोज कोटक सारखे भाजप नेते "सकल हिंदू समाज" नाव पुढे करून झालेल्या धार्मिक विद्वेष पसरवणाऱ्या सभांमध्ये, काजल शिंगला, अभिजित सारंग उर्फ कालिचरण, टी. राज सिंह सारख्या विखारी भाषणकर्त्यांसोबत सामील झाले आहेत आणि परभणी, मुंबई, नवी मुंबई, कल्याण, पुणे, पिंपरी, सातारा, कोल्हापूर, इचलकरंजी, लातूर, सोलापूर सहित 50 च्या वर शहरांमध्ये मोर्चे काढले गेले आहेत. स्पष्ट आहे की तणाव वाढवणे, आणि दंगली घडवण्याचे पुरेपूर प्रयत्न केले जात आहेत.

गेल्या 9 वर्षात एका उन्मादी, "भक्त" संप्रदायी, मुस्लीमद्वेषी, अतिरेकपंथी जमावाची यशस्वी वाढ संघ-भाजपने करवली आहे, ज्यांना भरवले गेले आहे की देशातील सर्व समस्यांना मुस्लीम जबाबदार आहेत, आणि त्यांचा बदला घेण्याचा अधिकार तथाकथित या हिंदुंना आहे. स्वतःला हिंदुरक्षक म्हणवणाऱ्या भाजपच्या राज्यातच हिंदू कसे धोक्यात येतात हा प्रश्न सुद्धा पडू नये इथपर्यंत "भक्त" संप्रदायाची मती भ्रष्ट करवली गेली आहे. याचाच परिणाम आहे की ओरिसा ट्रेन दुर्घटना झाल्यावर लगेचच त्यामागे मुस्लीम षड्यंत्र असल्याचा खोटा प्रचार सुरू होतो, आणि 31 जुलै रोजी रेल्वेमध्ये तणावग्रस्त आर.पी.एफ. जवान चेतन कुमार मुस्लिम प्रवाशांवर विनासंकोच गोळ्या झाडून खून करतो आणि नंतर योगी-मोदींचे राज्य असले पाहिजे असे कॅमेऱ्यासमोर म्हणतो सुद्धा. देशातील भांडवलदार वर्गाच्या भाजपकरिता असलेल्या भक्कम पाठिंब्यामुळे सतत मंदिर-मशीद, हिंदू-मुस्लिम, भारत-पाकिस्तान, लव्ह-जिहाद, गोमाता, बुरखा-हिजाब, सारख्या मुद्दयांवरच जनतेचे लक्ष केंद्रित करवून, भाजप-संघाच्या फॅशिस्ट राजकारणाला खतपाणी घालणाऱ्या "गोदी" मिडीयाचा, भाजप आय.टी. सेलचा, आणि संघपरिवाराच्या अफवा प्रचार यंत्रणेचा अशी मानसिकता बनवण्यात मोठा वाटा आहे.

अशातच आता काशी-विश्वनाथ येथील मशिदीचा मुद्दा जोमाने पुढे आणला जात आहे. धार्मिक स्थळांची स्थिती न बदलण्याबाबत कायदा असूनही तेथील मशिदीच्या सर्वेक्षणाचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने सुद्धा कायम ठेवला आहे, आणि सर्वेक्षण सुरू आहे. सर्वेक्षणाचा निकाल काय असणार आहे याबाबत शंका असण्याचे कारण नाही. जुलै महिन्यात कायद्याचा कोणताही मसुदा प्रस्तुत न करता, मोदींनी समान नागरी कायद्याचे पिल्लू सोडून पाहिले, आणि देशभरामध्ये या मुद्द्यावरून पुन्हा हिंदू-मुस्लीम ध्रुवीकरण वेगवान करण्याचे काम केले. आदिवासी आणि ख्रिश्चनांना हा कायदा लागू होणार नाही अशी वक्तव्ये अगोदरच भाजप नेत्यांकडून आली आहेत. हे विसरता कामा नये की कामगार वर्ग निश्चितपणे एका खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष, लैंगिक-समानता प्रदान करणाऱ्या, व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण करणाऱ्या, समान नागरी कायद्याचे समर्थन करतो, परंतु भाजप सरकारचा इरादा मात्र असा कोणताही नसून कमजोर, भेदभावपूर्ण असा हिंदू वैयक्तिक कायदाच मुस्लिमांवर थोपवणे हा आहे, असे दिसून येत आहे.

देशात महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचाराने उच्चांक गाठले आहेत आणि कोट्यवधी लोकांसाठी रोजचे जीवन जगणे सुद्धा असह्य झाले आहे. या पार्श्वभूमीवर याची खात्री बाळगू शकता की **2024 च्या निवडणुका जसजशा जवळ येतील, तसतसे देशामध्ये धार्मिक ताणतणाव वाढवण्याचे काम अधिक वेगाने पुढे नेले जाईल.** काशी-विश्वनाथ, राम-मंदिर, लव्ह-जिहाद, गोमाता, समान नागरी कायदा सारखे अनेक मुद्दे सतत पुढे आणले जातील. मणिपूर, उत्तराखंड, हरियाणा, महाराष्ट्र मधील घटना हेच दाखवतात की फॅशिस्ट भाजप सत्ता टिकवण्याकरिता कोणत्याही थरास जायला तयार आहे. भाजपचेच जम्मू-काश्मिरचे माजी राज्यपाल सत्यपाल मलिक यांनी 2019 च्या निवडणुकी अगोदर झालेल्या पुलवामा हल्ल्याबाबत भंडाफोड करून मोदी सरकारची सैनिकांचे जीव जाण्यामागील भूमिका सर्वांसमोर आणली आहे. यामुळेही भाजपच्या "हिंदूरक्षक" प्रतिमेला थोडा धक्का तर नक्कीच बसला आहे. त्यांनी म्हटल्याप्रमाणे आणखी एखादा पुलवामासारखा हल्ला या काळात झाला तर आश्चर्य वाटून घ्यायला नको.

## "इंडिया" आघाडीबद्दलचे भ्रम सोडा!

गेल्या 9 वर्षातील सर्वाधिक वाईट स्थितीमध्ये आज भाजप आहे. परिणामी संघाच्या मुखपत्रांनी पण इशारा दिला आहे की फक्त मोदी आणि धर्म, बजरंग बली, हिंदू-मुस्लीम सारख्या मुद्द्यांआधारे निवडणुका जिंकता येतीलच असे नाही, आणि जनतेला महागाई-बेरोजगारी पासून थोडातरी दिलासा देतील' अशी पावले गरजेची आहेत. परंतु एका बाजूला आपल्या भांडवलदार मालकांना खूश करत त्यांना धंद्याची खुली सूट देणे, कामगारांच्या शोषणाची मुक्त परवानगी देणे, श्रम अधिकार संपवणे, निसर्गाच्या लुटीची मुभा देणे, खाजगीकरण करून सर्व देश विक्रीला काढणे, भांडवलदारांना करमाफी देत जनतेवर कर वाढवणे आणि दुसऱ्या बाजूला असंतोष मर्यादित ठेवण्याकरिता का होईना जनतेला चाराणे-आठाणेच्या काही सवलती देणे ही कसरत दीर्घकाळ यशस्वीपणे करणे शक्य नाही!

अशामध्ये काँग्रेसप्रणीत यु.पी.ए. आघाडीने इतर काही पक्षांना सोबत घेऊन "इंडिया" (इंडियन नॅशनल डेव्हलपमेंटल इन्क्ल्युसिव अलायंस) असे काहीसे ओढूनताणून निर्माण केलेले नाव घेतले आहे आणि 2024 च्या निवडणुका ह्या "इंडिया" विरोधात एन.डी.ए. निवडणुका असतील असा प्रचार सुरू केला आहे. अपेक्षेप्रमाणेच भाजपने या लढ्याला "इंडिया" विरोधात "भारत" असे रूप देण्याचा प्रयत्न चालवला आहे. या आघाडीच्या निर्मितीने देशातील उदारवादी, समाजवादी राजकारणाच्या शीडात थोडी हवा भरून पुन्हा एकदा "आशा" निर्माण करण्याचे काम केले आहे. कर्नाटक व हिमाचल मधील भाजपच्या पराजयामुळे "इंडिया" आघाडीबद्दलच्या आशा जास्त प्रज्वलित होण्यासही सहाय्य झाले आहे, आणि ही शक्यता नाकारता येत नाही की एकास-एक असा उमेदवार देण्यात महद प्रयत्नांती ही आघाडी यशस्वी झाली तर बेरजेच्या राजकारणाच्या सहाय्याने निवडणुकीमध्ये भाजपला ती आव्हान बनू शकते.

परंतु, कामगार वर्गाने या दिखाव्याने संभ्रमित होण्याचे काहीच कारण नाही, कारण की ना या आघाडीकडे फॅशिझमशी लढण्यासाठी, ना जनतेच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्यासाठी, ना बेरोजगारी-महागाई-भ्रष्टाचारापासून सुटका देण्यासाठी कोणताही ठोस कार्यक्रम असणार आहे.

फॅशिझम म्हणजे फक्त खोटा शत्रू निर्माण करून विद्वेषी प्रचार करणे, अधिकारशाही सत्ता निर्माण करणे नव्हे! फॅशिझम हा भांडवलदार वर्गाच्या हातात ज्याचा पट्टा आहे असा एक हिंस्त्र कुत्रा आहे, ज्याचा वापर आर्थिक संकटाच्या काळात कामगारवर्गीय आंदोलनाचे दमन करण्यासाठीच आहे. फॅशिझम एक जनविरोधी सामाजिक चळवळ आहे, जिचा निम्न-भांडवलदार वर्गात, लंपट सर्वहारा वर्गात सामाजिक आधार आहे; 21 व्या शतकातील भारतातील संघ-भाजपचा फॅशिझम हा काँग्रेसप्रणीत उदारवादी धोरणांच्या परिणामी निर्माण झालेल्या दीर्घकालिक आर्थिक संकटाच्या प्रतिक्रियेमध्ये भांडवलदार वर्गामार्फत पुढे आणला गेलेला एक दीर्घकालिक राजकीय पर्याय आहे, पोलीस-सेना-न्यायपालिकेसह सत्तेच्या सर्व अंगांना पोखरून काढून आणि 'आपल्या' माणसांमार्फत तिच्यावर नियंत्रण मिळवत लोकशाहीचा दिखावा ठेवत तिला गाभ्यातून संपवणे ही या फॅशिझमची कार्यपद्धत आहे; विहिंप, बजरंग दल, आणि इतर अनेक हिंसक संघटनांच्या आणि सत्तेतील आपल्या कायमस्वरूपी माणसांमार्फत एक कायद्यापलीकडची पर्यायी सत्ता म्हणून तिचे अस्तित्व आहे. त्यामुळे मुळातच या फॅशिझमला फक्त निवडणुकांच्या मार्गाने हरवता येईल हे एक दिवास्वप्न आहे.

हे विसरता कामा नये की युपीए सरकारच्या भ्रष्टाचाराला, महागाईला, बेरोजगारीला कंटाळून, आणि या समस्यांवर दाखवलेल्या खोट्या आशेला भुलूनच, क्रांतिकारी पर्यायाच्या अनुपस्थितीत, जनतेने भाजपचा पर्याय 2014 मध्ये निवडला होता. प्रचंड भ्रष्टाचार-महागाई-बेरोजगारी सारख्या समस्या या भांडवली अर्थव्यवस्थेच्या गरजेपोटी लागू केलेल्या खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाउजा) या धोरणांचा परिणाम आहेत, ज्यांची सुरुवात 1991 मध्ये काँग्रेस सरकारनेच केली होती, आणि ज्या धोरणांबद्दल सर्व भांडवली पक्षांचे, सीपीआय, सीपीएम सारख्या दुरुस्तीवादी पक्षांचे सुद्धा एकमत आहे. भांडवली अर्थव्यवस्थेच्या दिशेबद्दल या पक्षांमध्ये काहीही दुमत नाही, आणि तीच अर्थव्यवस्था आज नफ्याच्या दराच्या घसरणीच्या आर्थिक संकटाने जगभरात ग्रस्त आहे. यामुळेच जनतेच्या वाढत्या असंतोषाला नियंत्रित ठेवण्यासाठी व भरकटवण्यासाठी जगभरामध्ये भांडवलदार वर्ग विविध उजव्या विचारांच्या पक्षांना पुढे आणत आहे. भांडवली राजकारण हे भांडवलदार वर्गाच्या आर्थिक पाठिंब्यातूनच चालते, आणि आज भारतात बड्या भांडवलदारांचा लाडका पक्ष भाजपच आहे, कारण "फौलादी" पद्धतीने राज्य चालवत जनतेला चिरडण्याची त्याची क्षमता अफाट आहे. **अशामध्ये भांडवलदार वर्गाची मर्जी वळवण्यासाठी "इंडिया" आघाडीला सुद्धा खाउजा धोरणांची अधिक वेगवान अंमलबजावणी, कामगार कायदे संपवणे, जनतेचे लोकशाही-नागरी अधिकार हिरावणे सारख्या धोरणांवरच चालणे भाग आहे**! म्हणूनच या आघाडीचा मुख्य अजेंडा "डेव्हलपमेंट" म्हणजे भांडवलदारांचा विकासच आहे, आणि धर्मनिरपेक्षतेचा, फॅशिझमला विरोधाचा, हिंदुत्ववाद्यांनी बनवलेले कायदे परत फिरवण्याचा नामोल्लेखही अपवादानेच दिसत आहे. राहुल गांधींनी भारत जोडो यात्रेत कमल हसन व रघुराम राजन यांना दिलेल्या

पान 5 वर

# फॅशिस्ट भाजप सरकारांचे अपयश दडवण्यासाठी पुन्हा भडकावले जात आहेत धार्मिक उन्माद

पान 4 वरून

मुलाखतींमधूनही हे अगदी स्पष्टपणे दिसून येते. "इंडिया" आघाडी वा काँग्रेस सारख्या पक्षांच्या सरकारांमुळे रस्त्यावरील फॅसिस्ट गुंड सेनांच्या कारवायांना थोडासा अटकाव होऊ शकतो, परंतु आपल्या आर्थिक धोरणांपायी, जनतेची दैन्यावस्था अजून वाढवत, आणि परिणामी योग्य क्रांतिकारी विचारांच्या अनुपस्थित जनतेला अधिकाधिक फॅशिस्ट-हिंदुत्ववादी विचारांच्या जवळ ढकलण्याचे, इतिहासात केल्याप्रमाणे फॅशिस्टांच्या सामाजिक चळवळीला खतपाणी घालण्याचे कामच ही सरकारे करणार हे निश्चित.

### फॅशिझमशी लढण्यासाठी स्वतंत्र कामगार वर्गीय क्रांतिकारी आंदोलन उभे करा!

फॅशिझमसारख्या भांडवलदार वर्गाच्या प्रतिक्रियावादी सामाजिक चळवळीला उत्तर एक क्रांतिकारी कामगार वर्गीय चळवळच असू शकते. दिल्लीमध्ये साक्षी नावाच्या मुलीच्या खुनाच्या विरोधात लव्ह-जिहादचे वातावरण बनवण्याचा प्रयत्न शहाबाद डेअरी भागात काम करणाऱ्या क्रांतिकारी कामगार वर्गीय कार्यकर्त्यांच्या योग्य प्रचारामुळे बऱ्यापैकी हाणून पाडला गेला. आज अशाप्रकारे फॅशिझमला तोंड देण्याचे काम ना कोणता भांडवली पक्ष करत आहे, ना तो करू शकतो, कारण त्यांचे उद्दिष्ट शेवटी "सबका मालिक एक" असलेल्या भांडवलदार वर्गाच्या हितांचे रक्षण आहे, आणि त्यासाठी जनतेच्या कोणत्याही क्रांतिकारी पुढाकाराला दाबणे त्यांच्याकरिता गरजेचे आहे.

निवडणुकांच्या राजकारणात तर क्रांतिकारी कामगार वर्गाने डावपेचात्मक हस्तक्षेप केलाच पाहिजे आणि समाजवादी क्रांतिकारी परिवर्तनाच्या कार्यक्रमाचा प्रचार जनतेत केलाच पाहिजे, परंतु त्यासोबतच सत्ता व धर्माला विभक्त करणाऱ्या खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष, लैंगिक समानतेची हमी देणाऱ्या, जातीअंताचा कार्यक्रम पुढे नेणाऱ्या, भांडवलदार वर्गाचे आणि त्यांच्या पक्षांचे चरित्र जनतेसमोर उघड्या पाडणाऱ्या, फॅशिस्टांच्या गुंडसेनेला सडेतोड प्रत्युत्तर देण्याची शक्ती असलेल्या चळवळीला पुढे नेण्याचे काम आज फक्त क्रांतिकारी कामगार वर्गीय शक्तीच करू शकतात. आज देशाच्या स्तरावर कामगार चळवळी संख्येने कमजोर, विखुरलेल्या, आणि वैचारिक विभ्रमांनी भरकटलेल्या आहेत. त्यामुळे येत्या काळात क्रांतिकारी कामगार वर्गीय प्रचाराच्या माध्यमातून कामगार वर्गाच्या लढाऊ अग्रदलाच्या निर्मितीचे काम पुढे नेणे हाच आपल्यापुढील मुख्य कार्यभार आहे.

# कामगारांची जीवन स्थिती, कामगारांच्या तोंडून. मुक्काम पोस्ट : मंडाळा (मुंबई)


✎ बबन, राहुल

मुंबईतील मोठ्या लोकसंख्येला राहण्याचे पर्याय संपुष्टात येऊ लागल्यावर मुंबईच्या परिघावर असलेल्या मानखुर्द-गोवंडी भागात1980 नंतर झोपडपट्टी वसायला सुरुवात झाली. त्याचबरोबर मानखुर्दमध्ये एका बाजूला वाशीची खाडी आणि दुसऱ्या बाजूला देवनार डम्पिंग ग्राउंड असलेल्या मंडाळा या भागात कोणत्याही प्रकारचे परवाने नसलेले काही छोटे-छोटे कारखाने उभे रहायला सुरुवात झाली. ज्यात प्रामुख्याने भंगाराचा पुनर्वापर करता येईल असे कारखाने, लोखंड वितळवून त्यापासून लोखंडाच्या वस्तू बनवण्याचे कारखाने तसेच तेल कारखाने उभे राहायला सुरुवात झाली. आज या भागात अनेक कारखाने चालत आहेत. तिथे काम करणाऱ्या कामगारांची जीवन-परिस्थिती व कामाची स्थिती अत्यंत विदारक असल्याचे दिसून येते. प्रत्येक कारखान्यात साधारणतः पाच ते पंधरा कामगार काम करत असतात. या कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा पुरवल्या जात नाही. कोणत्याच प्रकारची सामाजिक सुरक्षा दिली जात नाही; कारण येथे कोणतेच कामगार कायदे लागू केले जात नाहीत. अनेक वेळेस दुर्घटना झाल्यावर मालक सरळ अंग काढून कामगारांना आहे त्या स्थितीत सोडून देतात. याविरोधात कुठेही दाद मागण्याची व्यवस्थाच नसल्याचे कामगारांसोबत बोलल्यानंतर कळून येते. कामगारांसोबत झालेल्या संवादाचे आणि त्यांच्या मनोगताचे शब्दांकन खाली मांडले आहे.









### "मालकांकडे मजुरांचे अनेक पर्याय आहेत पण आमच्यासाठी सर्व पर्याय एकसारखेच आहेत."

सामाजिक सुरक्षेबद्दल बोलत असतांना एका कारखान्यात काम करत असलेल्या मनोज कुमार यांना विचारण्यात आल्यावर त्यांनी सांगितले की, "इथे कोणत्याच सामाजिक सुरक्षा दिल्या जात नाहीत. मालक सरळ बोलतो, काम करायचे असेल तर करा किंवा सोडून द्या! काम करायला लोकांची कमी नाही. अशात दुसरीकडे देखील कामाचे चांगले पर्याय उपलब्ध नाहीत, मग नाईलाजाने आहे ते काम करावे लागते. नाही तर घर कसे चालवायचे?"

### "ही मशीनच आत्ता माझी रोजीरोटी आहे."

करीम मूळचे राजस्थानचे आहेत. दहा वर्षापूर्वी मुंबईत आले तेव्हा एका नातेवाईकाच्या ओळखीने एका कारखान्यात हेल्पर म्हणून कामाला लागले तेव्हा त्यांना शंभर रुपये प्रत्येक दिवसाला मजुरी मिळत होती. पुढे काम करत असतांना लेथ मशीन चालवायला शिकले आणि त्यावर काम करायला लागले. आत्ता मशीनवर पीस रेटने काम करता एका पीसचा एक रुपया अशा पद्धतीने सकाळी आठ ते रात्री आठपर्यंत उभ्याने काम केल्यावर पाचशे पीस फिनिशिंग करतात तेव्हा त्यांना दिवसाला पाचशे रुपये मजुरी मिळते. पुढे ते सांगतात की, "या रोजंदारीवर घराचा सर्वच खर्च चालवावा लागतो. त्यात दोन मुलाचे शिक्षण, घरभाडे, किराणा आणि इतर सर्वच बाबी आल्या मग अशात जेमतेम पोट भरून आयुष्य सुरु आहे. ही मशीन चालवायला शिकलो नसतो तर तीनशे रुपया पेक्षा जास्त मजुरी मिळाली नसती मग जास्तच अवघड झाले असते. आत्ता ही मशीनच माझी रोजीरोटी आहे."

### "अल्लाह करेगा, और कभी ना कभी तो अच्छे दिन आयेंगे!"

मोसिन यांचा स्वत:चा पत्र्यापासून डबे बनवण्याचा एक छोटा कारखाना आहे. ज्यात ते आपल्या एक मुलाला आणि दोन नातेवाईकांना घेऊन काम करतात. वर्षानुवर्षे परिस्थिती बदलली नसली तरी ईश्वरावर भाबडी श्रद्धा ठेवत मोसिन म्हणतात की "घरच्या हलाखीच्या परिस्थितीमुळे मला शिक्षण करता आले नाही. त्यामुळे मी मजुरी करत चार पैसे कमावून या भाड्याच्या दुकानात आपला स्वतःचा धंदा सुरू केला ज्यात मी मालक पण आहे आणि कामगार पण. सोबतच माझे दोन नातेवाईक ज्यांना कामाची गरज होती त्यांना मी गावाकडून बोलावून घेतले आणि माझ्यासोबत कामाला लावले आहे. पण या कामात कितीही कष्ट केले तरी काही विशेष मिळकत होत नाही. प्रत्येक महिन्याला जेवढी गुंतवणूक करतो तेवढे पैसे परत मिळतील एवढीच मिळकत आहे. यात कारखान्याचा सर्व खर्च निघून प्रत्येक महिन्याला आमच्या चार जणांच्या रोजंदाऱ्या निघणे देखील आत्ता अवघड झाले आहे. असे वाटते कधी-कधी हे काम सोडून कुठे नोकरी करावी पण शिक्षण कमी असल्यामुळे दुसरे कुठे चांगले काम मिळेल याची देखील शाश्वती नाही. मग नाईलाजाने आहे ते काम करत राहावे लागते. 'अल्लाह करेगा और कभी ना कभी तो अच्छे दिन आयेंगे!' पण मार्केट थंडावलेले असल्यामुळे काहीच होत नाही."

### "नवऱ्याच्या कमाईमधून घर चालत नाही त्यामुळे मला हे काम कराव लागत आहे."

मंडाळाच्या एका चाळीत दोन मुले व पती यांच्या सोबत वाहीदा राहायला असतात. नवरा नाक्यावर बिगारी काम करतो. नवऱ्याला काम नियमित लागत नसल्यामुळे प्रत्येक महिन्याचा रोजचा खर्च चालवणे अवघड होते असल्यामुळे वाहीदा मंडाळ्यातील एका कारखान्यात कामाला लागल्या. या कारखान्यात भंगार आणि डम्पिंग मधील कचऱ्यातील काचेच्या बाटल्या फोडून त्याचे झाकण वेगळे करणे आणि फुटलेल्या काचा वेगळ्या करून पुढे ते वितवळण्यासाठी बाहेरच्या कारखान्यात पाठवण्याचे काम केले जाते.

वाहीदांना कामाविषयी विचारले असता त्या सांगतात की, "माझं शिक्षण नाही झाले त्यामुळे दुसरे कुठले काम मिळत नाही, म्हणून हे काम करावे लागते. या कामात आठ तासाचे तीनशे आणि बारा तासाचे चारशे रुपये मिळतात." थोडक्यात ओव्हरटाईमचा दर हा नियमित कामाच्या दरापेक्षाही कमी आहे! हाताला काच लागू नाही म्हणून जे हॅंडग्लोव्ह्स दिले जातात ते फार चांगल्या दर्जाचे नसल्याने ते फाटून हाताला काच लागत असल्याचे त्यांच्या हाताकडे पाहून लक्षात आले. सुरक्षा उपकरण का दिली जात नाहीत? यावर वाहीदा सांगतात कि, "ग्लोज द्यायला मालक सांगतो कि, त्यासाठी पैसे लागतात. त्याचा पैसा तुमच्या पगारातून कमी करावा लागेल. त्यामुळे आहे त्या स्थितीत काम करावे लागत आहे."

मंडाळा मधल्या या छोट्या-छोट्या कारखान्यात करीम, मोसीन, वाहीदा सारखे हजारहून जास्त कामगार काम करत आहेत, ज्यांना नाईलाजास्तव अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत 10 ते 12 तास काम करावे लागत आहे आणि तेही अल्पशा पगारात ज्यात त्यांचे घर मुश्किलीने चालत आहे. अनेक कामगारांना त्यांचे काम सोडता येत नाही कारण दुसरे काम मिळेल की नाही याची खात्री नाहीये. अनेक कामगार पोटाला चिमटा घेऊन मुलाबाळांच्या शिक्षणाचा खर्च करत आहेत. काही कामगारांना आशा आहे की आज ना उद्या त्यांच्या परिस्थितीमध्ये बदल होईल पण काही कामगारांनी अशा हलाखीच्या जीवनालाच आपले नशीब मानले आहे आणि ईश्वराप्रती भाबडी आशाही बाळगून आहेत.

इथल्या काही कारखान्यातील मालक हे छोटे भांडवलदार आहेत आणि त्यांच्या वर्कशॉप मध्ये साधारण पाच ते पंधरा कामगार कामाला आहेत. हे भांडवलदार शक्य तेवढे त्यांच्या कामगारांचे शोषण करून नफा कमविण्याचे काम करत आहेत मग ते अत्यंत अल्प पगारावर दहा ते बारा तास काम करून घेतात, ओव्हर टाइम मधले पैसे कापतात. कामगारांनी पगार वाढीची मागणी केली तर त्यांना कामावरून काढण्याची धमकी सुद्धा देतात. काही निम्न-भांडवलदार स्वतःच कारखान्याचे मालक आणि कामगार पण आहेत आणि ते स्वतःच स्वत:चे शोषण करत आहेत कारण ते जेवढी मेहनत करतात त्यातून स्वत:ला पुरेल एवढी कमाई होतेच असे नाही.

कामगारांना जाणीव आहे कि त्यांचे शोषण केले जात आहे परंतु त्यांच्यात वर्ग चेतनेचा अभाव आहे आणि त्यामुळे कामगारांत कोणतीही एकता अजून कायम झाली नाही, याचे स्पष्ट कारण हेच आहे की त्यांना योग्य राजकीय शिक्षण देऊ शकणाऱ्या कामगार वर्गीय क्रांतिकारी शक्ती तेथे काम करत नाहीयेत. मुंबई शहराच्या एका कोपऱ्यात मंडाळा आहे, जेथील हजारो कामगारांचे जीवन कधीच कोणत्या सरकारच्या चिंतेचा विषय बनले नाही त्यामुळे हजारो कामगार तुटपुंज्या पैशावर हलाखीच्या स्थितीत कोणत्याही सुरक्षा साधनाशिवाय काम करण्यासाठी मजबूर असल्याचे दिसून येत आहे.

## क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 5

# माल, उपयोग-मूल्य, विनिमय-मूल्य आणि मूल्य

✍अभिनव

मानवी श्रमातून निर्माण होणाऱ्या वस्तूंचे एक वैशिष्ट्य असते, ते म्हणजे त्यांचे उपयोगी असणे. त्या कुठल्या ना कुठल्या मानवी गरजांची पूर्तता करतात. तसे नसेल तर कोणी त्यांना बनवणार नाही. त्यांच्या उपयुक्त असण्याच्या या गुणाला आपण **उपयोग-मूल्य** म्हणतो. उपयोग-मूल्याच्या स्वरूपात वस्तूंचे हे उत्पादन प्राचीन काळापासून जेव्हा मनुष्याने आपल्या गरजांसाठी निसर्गात बदल करून वस्तूंची निर्मिती करण्यास सुरुवात केली, म्हणजेच उत्पादन सुरू केले, तेव्हापासून चालत आले आहे. एखाद्या वस्तूचे उपयोग-मूल्य हा पूर्वप्रदत्त नैसर्गिक गुण नसून तो ऐतिहासिक आणि सामाजिक गुण असतो. एखाद्या ऐतिहासिक कालखंडात एखादी गोष्ट ठराविक लोकांना उपयोगी पडू शकते आणि कालांतराने असे होऊ शकते की ती वस्तू उपयुक्त राहणार नाही. पण कुठल्याही वेळी माणसांच्या श्रमाने निर्माण झालेली एखादी वस्तू माणसाची गरज भागवत असेल तर ती त्यात एक उपयोग-मूल्य निर्माण करते. एकेकाळी, समाजात बहुतांश वस्तूंचे उत्पादन प्रत्यक्ष उपभोगासाठीच केले जात होते, मग त्यांचा प्रत्यक्ष उपभोग प्रत्यक्ष उत्पादकांकडून केला जात असो किंवा उत्पादक वर्गाने निर्माण केलेल्या वरकड उत्पादनाला हडपून घेणाऱ्या शोषक-सत्ताधारी वर्गाकडून केला जात असो. अशा कालखंडांबद्दल आपण असे म्हणू शकतो की वस्तूंचे उत्पादन प्रामुख्याने उपयोग-मूल्यांच्या स्वरूपात होत होते.

परंतु उपयोग-मूल्याव्यतिरिक्त मानवी श्रमातून तयार होणाऱ्या वस्तूंमध्ये आणखी एका प्रकारचे मूल्य असू शकते, ज्याला आपण **विनिमय-मूल्य** म्हणतो. म्हणजे अशा वस्तू ज्यांचे उत्पादन श्रीमंत वर्ग वा प्रत्यक्ष उत्पादक वर्गाद्वारे प्रत्यक्ष उपभोगासाठी केले जात नाही तर बाजारात विक्री किंवा विनिमय करण्यासाठी केले जाते. आपण अशा वस्तूंना केवळ उपयोग-मूल्य मानू शकत नाही, कारण त्यांचे उत्पादन प्रत्यक्ष उत्पादक आणि श्रीमंत शोषक वर्गाद्वारे प्रत्यक्ष वापरासाठी केले जात नाही तर बाजारात विक्री किंवा विनिमय करण्यासाठी केले जाते. एखाद्या वस्तूचा दुसऱ्या कुठल्यातरी वस्तूबरोबर किंवा पैशाबरोबर विनिमय होण्याचा हा गुण त्या वस्तूला उपयोग मूल्यापेक्षा काहीतरी अधिक बनवतो. आता त्या वस्तूला केवळ उपयोग-मूल्य नाही तर विनिमय-मूल्यही आहे. ज्या वस्तूंचे उपयोग-मूल्य तसेच विनिमय मूल्य असते, म्हणजेच ज्या वस्तू बाजारात विकण्यासाठी तयार केल्या जातात, त्यांना आपण माल म्हणतो. माल म्हणजे त्या वस्तू किंवा सेवा ज्यांचे उत्पादन प्रत्यक्ष उपभोगासाठी नसून विक्रीसाठी केले जाते आणि ज्यांचे एक उपयोग-मूल्य आणि एक विनिमय-मूल्य असते. विनिमय-मूल्य हा कोणत्याही मालाचा अन्य दुसऱ्या मालासोबत एका निश्चित प्रमाणात विनिमय होण्याचा गुण आहे. त्याचे दोन पैलू आहेत: पहिला, त्याचा इतर मालांसोबत विनिमय होऊ शकण्याचा गुण, जो त्याचा **गुणात्मक पैलू** आहे आणि दुसरा, त्याचा इतर मालांसोबत एका निश्चित प्रमाणात विनिमय होण्याचा गुण, जो त्याचा **परिमाणात्मक पैलू** आहे.

तमच्या हे लक्षात आले असेल की मालांचा उल्लेख करताना आम्ही येथे वस्तूंसोबत "सेवा" शब्दाला सुद्धा जोडले आहे. कारण हे की प्रत्येक माल स्पर्श करता येणारी भौतिक वस्तूच असावी हे गरजेचे नाही. माल एक सेवा देखील असू शकते, जिचा उपयुक्त परिणाम असतो आणि जिला विकल्या जाते. तिचा उपयुक्त परिणाम तिच्यामध्ये मूल्य तयार करतो आणि ज्याअर्थी तिला विकण्यासाठी तयार केले आहे त्यामुळे त्याचे विनिमय-मूल्यही असते आणि त्यामुळे ती सुद्धा एक माल आहे. उदाहरणार्थ, वाहतूक सेवेत कोणती वस्तू तयार होत नाही. ती एक उपयुक्त परिणाम निर्माण करते. हा उपयुक्त परिणाम आहे वस्तू आणि लोकांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाण्याचा. या मालाचे उत्पादन (म्हणजे स्थान बदलणे) आणि त्याचा वापर (ग्राहकांकडून वस्तू आणि/ किंवा व्यक्तींच्या स्थानामध्ये बदल) एकाच वेळी घडतात. परंतु जर ही सेवा निर्माण करणाऱ्या उत्पादकाने ती लोकांना विकली तर ती देखील एक माल आहे. म्हणूनच मार्क्सने म्हटले होते की, "एक सेवा म्हणजे दुसरे काही नसून उपयोग-मूल्याचा उपयुक्त परिणाम होय." (कार्ल मार्क्स, 1992, कॅपिटल, खंड 1, पेंग्विन पब्लिकेशन्स, पृ. 299). जर उपयोग-मूल्य असलेली ही सेवा प्रत्यक्ष उपभोगासाठी नसून विनिमयासाठी अर्थात विक्रीसाठी निर्माण केली जात असेल तर ती देखील एक माल आहे.

फरक समजून घेण्यासाठी काही उदाहरणे विचारात घेऊयात:

- एका शेतकरी कुटुंबाद्वारे स्वत:च्या वापरासाठी तांदूळ उत्पादन केले जाणे हे माल उत्पादन नाही, परंतु जर ते तांदळाचे उत्पादन बाजारात विक्रीसाठी करत असतील तर ते माल उत्पादन आहे.

- जर सुतार स्वत:ला बसण्यासाठी एक खुर्ची बनवतो, तर तो फक्त उपयोग-मूल्य तयार करतो आणि म्हणून माल तयार करत नाही. पण जर तीच खुर्ची बाजारात विकण्यासाठी तो बनवत असेल, तर ते माल उत्पादन आहे.

- एका कार कंपनीच्या कारखान्यात तयार केलेली कार ही एक माल आहे कारण कार कंपनीचा मालक तिचे उत्पादन स्वतः चालवण्यासाठी करत नाही तर बाजारात विकण्यासाठी करतो.

- जर एखाद्या घरातील कुटुंबातील सदस्य घरात साफसफाईची सेवा देत असेल, तर ते अशा सेवेचे उत्पादन आहे जी माल नाही. पण जर तीच सेवा त्याने बाजारातून विकत घेतली आणि या कामासाठी मजूर ठेवला, तर ती माल बनली आहे कारण कामगार स्वतःच्या प्रत्यक्ष वापरासाठी ती सेवा तयार करत नसून त्या कुटुंबाला विकण्यासाठी तिचे उत्पादन करत आहे.

या उदाहरणांवरून आपण माल आणि केवळ उपयोग-मूल्ये म्हणून उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवा यांच्यात फरक करू शकतो. **मानवी श्रमाची जी उत्पादने प्रत्यक्ष वापरासाठी नसून विक्रीसाठी तयार केली जातात, त्यांना आपण माल म्हणतो. ही उत्पादने वस्तू असू शकतात किंवा ती सेवा असू शकतात. प्रत्येक मालामध्ये हे दोन्ही गुणधर्म, म्हणजे उपयोग-मूल्य आणि विनिमय-मूल्य, असणे आवश्यक आहे.** जर एखाद्या वस्तू किंवा सेवेची काही उपयुक्तताच नसेल, तर कोणी ती वापरणार पण नाही आणि विकतही घेणार नाही. म्हणजेच, प्रत्येक विनिमय-मूल्याचा वाहक केवळ कुठलेतरी उपयोग-मूल्यच असू शकते. परंतु प्रत्येक उपयुक्त वस्तू ही माल नसते. एखादी वस्तू किंवा सेवा तेव्हाच माल बनू शकते जेव्हा तिला खरेदी-विक्रीसाठी बनवले गेले असेल.

इतिहासात असा काही काळ होता का जेव्हा सामान्यतः वस्तूंना विनिमय-मूल्य नव्हते आणि फक्त उपयोग-मूल्यच होते? होय! वस्तूंची निर्मिती प्रत्यक्ष उपभोगासाठी नव्हे तर देवाणघेवाणीसाठी व्हावी यासाठी समाजात श्रमविभागणीची एक विशिष्ट पातळी विकसित होणे आवश्यक असते. यालाच आपण **सामाजिक श्रम विभाजन** म्हणतो. साहजिकच, ज्या समाजात किंवा समुदायात सर्व लोक एकाच वस्तूचे किंवा समान वस्तूंचे उत्पादन करत असतील, तेथे देवाणघेवाण म्हणजेच खरेदी-विक्रीची गरज भासणार नाही. एखाद्या दूध उत्पादकाजवळ दुसऱ्या दूध उत्पादकाशी विनिमय करण्यासाठी काहीच नसेल. तो दुधाचा दुधाशी विनिमय का करेल? म्हणून श्रमाच्या सामाजिक विभाजनाची एक विशिष्ट पातळी गाठल्यानंतरच देवाणघेवाण सुरू होऊ शकते. हे एखाद्या समुदायातील उत्पादक शक्तींच्या विकासामुळे आणि विविध वस्तूंच्या उत्पादनात गुंतलेल्या त्या समुदायातील लोकांमुळे झाले असेल किंवा विविध वस्तूंचे उत्पादन करणारे समुदाय आपापसात संपर्कात आल्याने घडले असेल, परंतु हे मात्र निश्चित आहे की विनिमय, व्यापार आणि बाजाराची उत्पत्ती तेव्हाच होऊ शकते जेव्हा समाजात श्रमांचे विभाजन होते. जोपर्यंत समाजात श्रमाची ही सामाजिक विभागणी होत नाही, म्हणजेच जोपर्यंत विविध लोक किंवा लोकांचे गट वेगवेगळ्या वस्तू आणि सेवांचे उत्पादन करत नाहीत, तोपर्यंत देवाणघेवाण, खरेदी-विक्री, व्यापार, बाजार इ. ची सुरुवात होऊ शकत नाही. **इतिहासात असेही काही काळ होते जेव्हा श्रमाचे कोणतेही सामाजिक विभाजन नव्हते किंवा ते अत्यंत आदिम टप्प्यावर होते. त्यावेळी विनिमय सुरू झाला नव्हता. त्या काळी वस्तूंची निर्मिती केवळ उपयोग-मूल्याच्या स्वरूपात होत होती.** विशेषतः आदिम टोळी समाजात अशीच परिस्थिती होती.

परंतु उत्पादक शक्तींच्या विकासासह श्रमांचे सामाजिक विभाजन झाले आणि विनिमय सुरू झाला. यासोबतच अनेक वस्तू आणि सेवांच्या प्रत्यक्ष वापरासाठीच्या उत्पादनाबरोबरच विविध वस्तूंचे मुख्यतः विनिमयासाठी उत्पादन सुरू झाले आणि यासोबतच त्यांचे विनिमय मूल्यही निर्माण झाले आणि त्यांचे रूपांतर मालामध्ये झाले. यासोबत मालाचे उत्पादन सुरू झाले. **ज्या समाजात बहुसंख्य वस्तू आणि सेवांचे मालामध्ये रूपांतर होते, प्रत्यक्ष उत्पादकांची श्रमशक्तीसुद्धा स्वतः मालामध्ये रूपांतरित होते आणि माल उत्पादन प्रभुत्वशाली बनते, त्यालाच आपण भांडवली समाज म्हणतो.**

परंतु माल उत्पादन भांडवली समाजासोबत अस्तित्वात आले नाही. तर प्राचीन काळीच आदिम जमातींमध्ये एका अतिशय प्राथमिक प्रकारच्या विनिमयाची सुरुवात झाली होती आणि आदिम टोळी समाजाचे विघटन होऊन गुलाम समाजाच्या स्वरूपात प्रथम वर्ग समाजाचा उदय आणि विकासाचा टप्पा येईपर्यंत माल उत्पादन चांगले विकसित झाले होते. परंतु माल उत्पादन हे अद्याप प्रभुत्वशाली उत्पादन बनले नव्हते आणि त्यासोबत उत्पादनाचे इतर अनेक प्रकार अस्तित्वात होते, ज्यामध्ये उत्पादक वर्गाद्वारे किंवा त्यांना लुटणाऱ्या शासक-शोषक वर्गाद्वारे प्रत्यक्ष वापरासाठी वस्तू आणि सेवा उत्पादित केले जात होते आणि उत्पादनाचे हे स्वरूप अजून समाजात माल उत्पादनापेक्षा जास्त महत्त्व ठेवून होते. उदाहरणार्थ, गुलाम समाज आणि सरंजामशाही समाजातही माल उत्पादन अस्तित्वात होते, परंतु अजून इतर प्रकारचे उत्पादन त्याच्याबरोबर केवळ अस्तित्वातच नव्हते, तर त्याहून अधिक महत्त्वाचे होते. म्हणून माल उत्पादन उत्पादनाच्या इतर प्रकारांपेक्षा अजून प्रबळ बनले नव्हते आणि म्हणूनच या समाजांमध्ये, विशेषतः गुलाम समाजात, माल उत्पादनाचा लक्षणीय विकास झालेला असूनही ती अद्याप प्रभुत्वशाली उत्पादन पद्धत बनली नव्हती, श्रमशक्ती अजून मालात रूपांतरित झाली नव्हती आणि त्यामुळे अजून भांडवली माल उत्पादन सुरु झाले नव्हते. या प्रकारच्या माल उत्पादनास **साधारण माल उत्पादन** म्हणतात.

**भांडवली समाजातही प्रत्येक वस्तू आणि सेवा मालाच्या स्वरूपात तयार होत नाहीत.** जसे की शेतकऱ्यांनी केलेल्या उत्पादनाचा तो भाग ज्याचा वापर ते आणि त्यांचे कुटुंबीय प्रत्यक्ष वापरासाठी करतात. आज हा भाग फारच छोटा आहे कारण एकूण कृषी उत्पादनापैकी 90 टक्के भाग हा आता विक्रीयोग्य अधिशेषाच्या श्रेणीत येतो. एक छोटासा असला तरी हिस्सा आहे, जो केवळ उपयोग-मूल्य म्हणूनच निर्माण केला जातो. इतर प्रकारची उत्पादने आणि सेवा ज्या मालामध्ये रूपांतरित होत नाहीत त्या सरकारी सार्वजनिक वितरणाचा भाग असतात, मग ते सरकारी शाळांमधील मोफत शिक्षण असो, मोफत धान्य वितरण असो किंवा इतर कोणतीही सेवा किंवा वस्तू असो. याशिवाय, भांडवली समाजात कुटुंबातील सदस्यांनी घरामध्ये केलेले घरगुती काम देखील माल उत्पादनाच्या श्रेणीत येत नाही कारण त्याची खरेदी-विक्री केली जात नाही. ते निश्चितपणे उपयुक्त असते आणि कुठले ना कुठले उपयोगी वस्तू किंवा सेवा तयार करते. परंतु त्याचे कोणतेही विनिमय मूल्य नसते कारण ते विनिमयासाठी तयार केले जात नाही. परंतु अशा प्रकारची सर्व उत्पादने आणि सेवा हा भांडवली समाजाच्या एकूण उत्पादनाचा एक छोटासा भाग असतो, तर मोठा भाग हा विक्री आणि खरेदीसाठी उत्पादित केल्या जाणाऱ्या वस्तू आणि सेवांचा म्हणजेच मालाचा आहे.

आता थोडं खोलात जाऊ या.

**विनिमय मूल्य म्हणजे काय?** एखाद्या वस्तूचा अन्य इतर वस्तूंशी विनिमय होण्याचा गुण. परंतु कुठलाही विनिमय एका निश्चित प्रमाणातच होऊ शकतो. विनिमय मूल्य आपल्याला यापेक्षा वेगळे काहीही सांगत नाही, उदाहरणार्थ, दोन लीटर दुधासोबत किती किलोग्राम तांदळाचा विनिमय होईल किंवा दोन मीटर कापडासाठी किती किलोग्रॅम

**पान 7 वर**

## क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 5

# माल, उपयोग-मूल्य, विनिमय-मूल्य आणि मूल्य

पान 6 वरून

गहू दिले जातील, इ. परंतु दोन वस्तूंचा एका निश्चित प्रमाणात विनिमय होण्यासाठी त्यांच्यात काहीतरी समान असले पाहिजे ज्याची तुलना करता येईल. कारण एका निश्चित प्रमाणात दोन वस्तूंची देवाणघेवाण या दोन वस्तूंचे उत्पादक त्यांच्यातील समान गोष्टींची तुलना केल्याशिवाय करू शकत नाहीत. आता दोन लीटर दूध आणि तीन किलो तांदळात काय समान आहे? किंवा, दोन मीटर कापड आणि चार किलो गहू यात काय समान आहे? साहजिकच, त्यांच्या भौतिक गुणधर्मांमध्ये किंवा त्यांच्या उपयोग-मूल्यात काहीही साम्य नाही. मार्क्सने दाखवल्याप्रमाणे, प्राचीन ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टॉटलने सांगितले होते की वस्तूंची देवाणघेवाण करण्यासाठी, त्यांच्यात काहीतरी समान असले पाहिजे ज्याची तुलना करता येईल. ती समाईक गोष्ट काय आहे?

**ती समान गोष्ट म्हणजे सर्व वस्तू मानवी श्रमाचे उत्पादन असणे.** सर्व वस्तूंना आपापसात विनिमय करण्यायोग्य बनवणारी गोष्ट म्हणजे त्या सर्व वस्तू ह्या मानवी श्रमाने बनलेल्या असणे. कोणत्याही मालाच्या उत्पादनात लागलेले मानवी श्रमाचे प्रमाणच त्याचे मूल्य ठरवते आणि विनिमय-मूल्य हे स्वतःमध्ये दुसरे काही नसून दोन वस्तूंच्या मूल्यांचे प्रमाण असते. उदाहरणार्थ, एक मीटर कापड तयार करण्यासाठी 4 तास मानवी श्रम लागतात आणि 1 लिटर दूध तयार करण्यासाठी 1 तास मानवी श्रम लागतात, तर एक मीटर कापडाचा 4 लिटर दुधाशी विनिमय होईल. निश्चितपणे, जेव्हा एका जमातीतील लोकांनी एखादी दुसरी वस्तू बनवणाऱ्या टोळीतील लोकांशी प्रथमच योगायोगाने त्यांच्या मालाची देवाणघेवाण केली असेल तेव्हा त्यांनी मानवी श्रमांचा अचूक अंदाज लावला नसेल. परंतु जेव्हा ही देवाणघेवाण अथवा विनिमय पुन्हा-पुन्हा केले जाईल तेव्हा निश्चितच दोन जमातींचे लोक त्यांच्या उत्पादनात किती श्रम लागलेले आहेत याचा अंदाज लावू लागतील आणि त्या आधारावर त्यांच्या उत्पादनांच्या देवाणघेवाणीचे गुणोत्तर ठरवतील.

**पण मालांची किंमत ठरवताना आपण कोणत्या प्रकारचे मानवी श्रम मोजतो?** जेव्हा आपण दोन प्रकारचे माल, उदाहरणार्थ कापड आणि दूध यांबद्दल बोलतो तेव्हा त्यामध्ये लागलेल्या विशिष्ट प्रकारच्या श्रमांची तुलना करणे शक्य नाही. कापड तयार करण्यासाठी एका वेगळ्या प्रकारचे ठोस विशेष श्रम लागतात, तर दूध तयार करण्यासाठी वेगळ्या प्रकारचे ठोस विशेष श्रम लागतात. या दोघांची तुलना कशी होऊ शकते? त्याचप्रमाणे, प्रत्येक भिन्न प्रकारच्या मालांच्या उत्पादनामध्ये विशिष्ट प्रकारचे ठोस श्रम खर्च केलेले असतात. यालाच आपण मूर्त श्रम म्हणतो, ज्याचा अर्थ दुसरा काही नसून हा आहे की ते विशिष्ट प्रकारचे ठोस श्रम आहे. प्रत्येक मालाच्या उत्पादनात विविध प्रकारचे मूर्त श्रम वापरले जातात आणि त्यांच्या आधारावर वस्तूंची गुणात्मक आणि परिमाणात्मक तुलना करता येणे शक्य नाही. म्हणजेच मूर्त श्रमाच्या आधारे वस्तूंच्या देवाणघेवाणीसाठी म्हणजेच विनिमयासाठी आवश्यक असलेल्या गुणात्मक आणि परिमाणात्मक तुलनेचे काम शक्य नाही कारण मूर्त श्रमाचे विविध प्रकार ही समान तुलना करण्यायोग्य गोष्ट नाही ज्याच्या आधारे मालांचे मूल्य आणि त्यांच्यातील गुणोत्तराच्या रूपात त्यांचे विनिमय मूल्य निर्धारित केले जाऊ शकेल.

जेव्हा आपण वस्तूंचा विनिमय करतो, तेव्हा आपण त्यांच्या उत्पादनात गुंतलेल्या मूर्त श्रमाला नजरेआड करतो आणि त्या श्रमाला सर्वसाधारणपणे मानवीय सामाजिक श्रमाच्या स्वरूपात बघतो. **याचा अर्थ काय?** याचा अर्थ असा की आपण सर्वसाधारणपणे याला मानवी श्रमशक्तीचा खर्च मानतो. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, आपण सर्वसाधारणपणे याकडे मानवी श्रमाच्या म्हणजेच उत्पादकाच्या मानसिक आणि शारीरिक ऊर्जेच्या खर्चाच्या रूपात बघतो. याला आपण दुसऱ्या पद्धतीने देखील समजू शकतो. आपण कोणत्याही समाजाच्या एकूण उत्पादनाला त्या समाजाच्या एकूण श्रमाची निर्मिती म्हणून समजू शकतो. अशा प्रकारे, प्रत्येक उत्पादन एकूण सामाजिक श्रमाचा एक भाग दर्शवते. एकूण सामाजिक श्रम म्हणून आपण सर्वसाधारणपणे मानवी सामाजिक श्रम बघतो, संपूर्ण समाजाच्या एकूण श्रमशक्तीचा खर्च बघतो, ना की विविध प्रकारचे विशिष्ट मूर्त श्रम. थोडक्यात, सर्व प्रकारच्या मूर्त श्रमांच्या विशिष्ट, ठोस वैशिष्ट्यांना नजरेआड करून आणि त्यातून अमूर्तन करून प्रत्येक मालामध्ये लागलेल्या मानवीय श्रमांना सर्वसाधारणपणे मानवीय सामाजिक श्रम आणि मानवीय श्रमशक्तीच्या खर्चाच्या रूपात बघतो. म्हणजेच, आपण ते **अमूर्त श्रम** म्हणून पाहतो. अमूर्त श्रमच मालांमध्ये असलेली ती समान, तुलनीय गोष्ट आहे जिच्या गुणात्मक आणि परिमाणात्मक तुलनेच्या आधारे दोन मालांचा एका निश्चित प्रमाणात विनिमय शक्य होतो.

**मूर्त श्रम आणि अमूर्त श्रम यावरून गोंधळात पडण्याची गरज नाही.** हे दोन वेगवेगळ्या प्रकारचे श्रम नाहीत, जे वेगवेगळ्या वेळी आणि ठिकाणी होतील. जे मूर्त श्रम मालाच्या उत्पादनात म्हणजेच अशा वस्तू किंवा सेवांच्या उत्पादनात लागतात ज्यांना विनिमयासाठीच बनवले जात आहे, त्यांना अमूर्त श्रम म्हणून आपण पाहू शकतो. जेव्हा विनिमयाची गरज भासते तेव्हाच उत्पादकांना त्यांच्या मूर्त श्रमाचे अमूर्तन (ॲब्स्ट्रक्शन) करून त्याला सर्वसाधारणपणे मानवी श्रमशक्तीचा खर्च म्हणून पाहणे आवश्यक बनते. जेव्हा विनिमय होतो तेव्हाच श्रमाचे अमूर्तन करण्याची गरज निर्माण होते, कारण या आवश्यकतेशिवाय, म्हणजेच विनिमय नसेल तर, मूर्त श्रमाचे अमूर्तन करून अमूर्त श्रमापर्यंत येण्याची काही आवश्यकताच नसेल. **कारण हे की विनिमयासाठीच एक तुलनीय गोष्ट म्हणून आपल्याला एखाद्या वस्तू किंवा सेवेमध्ये लागलेल्या श्रमाला सर्वसाधारणपणे मानवी सामाजिक श्रम किंवा मानवी श्रमशक्तीचा खर्च म्हणून बघण्याची गरज भासते.** येथे आपण विविध प्रकारच्या मूर्त श्रमांचे अमूर्तन करतो, त्यामुळे या वस्तू आता आपल्यासाठी केवळ मानवी श्रमाचे उत्पादन राहतात. मूर्त श्रम वेगवेगळ्या मालांमध्ये विविध प्रकारच्या उपयोग-मूल्यांना जन्म देतात. या भिन्न उपयोग-मूल्यांच्या आधारे कुठलाही विनिमय शक्य नाही कारण त्यांची तुलना करता येत नाही. परंतु जेव्हा आपण मालांकडे केवळ मानवी श्रम-शक्तीच्या खर्चाची उत्पादने म्हणजेच वस्तुरूप ग्रहण केलेल्या मानवी सामाजिक श्रमाच्या एका निश्चित प्रमाणाच्या स्वरूपात बघतो, तेव्हा त्यांच्यात असलेले सर्व विशिष्ट भेद नाहीसे होतात. आता ते एकाच *सामाजिक पदार्थाचे* (social substance) म्हणजे साधारण मानवी सामाजिक श्रमाचे फक्त विविध प्रमाण म्हणूनच राहतात. मार्क्स लिहितात:

> "जर आपण मालांच्या उपयोग मूल्याकडे दुर्लक्ष केले, तर त्यांचा केवळ एकच गुणधर्म उरतो तो म्हणजे ती सर्व मानवी श्रमाची उत्पादने आहेत. पण अगदी श्रमाच्या उत्पादनाचेही आपल्या हाती रुपांतर झालेले असते. जर आपण त्यांचे उपयोग-मूल्यापासून अमूर्तन केले, तर आपण त्या भौतिक घटकांपासूनसुद्धा अमूर्तन करतो ज्यामुळे ते एक उपयोग-मूल्य बनलेले असते. आता ती एक टेबल, घर किंवा सुताचा एक तुकडा किंवा इतर कोणतीही उपयुक्त वस्तू राहिलेली नाही. इंद्रियांनी अनुभवता येणारे हे सर्व गुण आता नाहीसे होतात. आता ते सुतार, गवंडी किंवा सूत कातणारा किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या उत्पादक श्रमांचे उत्पादन राहत नाहीत. श्रमाच्या उत्पादनांचे उपयुक्त गुणधर्म नाहीसे होण्यासोबतच त्यांच्यामध्ये लागलेल्या विविध प्रकारच्या श्रमांचे उपयुक्त चरित्रदेखील नाहीसे होते; याचा अर्थ म्हणजे त्यांच्यामध्ये लागलेल्या श्रमाच्या विविध मूर्त स्वरूपाचे नाहीसे होणे. आता त्यांना वेगवेगळे करून पाहिले जाऊ शकत नाही, परंतु ते सर्व आता एकाच प्रकारचे श्रम, म्हणजेच अमूर्त रूपातील मानवीय श्रमात संक्षेपित (reduce) होतात." (कार्ल मार्क्स, 1992, भांडवल, खंड-1, पेंग्विन पब्लिकेशन्स, पृ. 128)

स्पष्ट आहे की अमूर्त श्रमाचा प्रश्न तेव्हाच येईल जेव्हा आपण माल उत्पादनाविषयी बोलत असू, केवळ उपयोग-मूल्य म्हणून उत्पादित होणाऱ्या वस्तू किंवा सेवांच्या उत्पादनाबाबत नाही. श्रमाच्या अमूर्ततेची गरज तेव्हाच निर्माण होईल जेव्हा विनिमयाची गरज असेल. अमूर्त श्रमाचा व्यय सर्वसाधारणपणे मानवी सामाजिक श्रमाचा व्यय असतो जो प्रत्येक वस्तू आणि सेवेच्या उत्पादनात खर्च होतो, मग त्याचे ठोस रूप आणि वैशिष्ट्य म्हणजेच त्याचे मूर्त रूप काहीही असो. **विशिष्ट प्रकारचे मूर्त श्रम विशिष्ट प्रकारचे उपयोग-मूल्य तयार करतात, जेव्हा की अमूर्त श्रम मूल्य निर्माण करतात.** वास्तवात मालाचे मूल्य दुसरे काही नसून वस्तूचे रूप धारण केलेले अमूर्त श्रम आहे, किंवा मार्क्सच्या शब्दात 'थिजलेले अमूर्त श्रम' (congealed labour) आहेत.

**पण अमूर्त श्रम मोजले कसे जातात?** आपण हे जाणतो की श्रमाला केवळ श्रमकाळातच मोजले जाऊ शकते. पण इथे आपल्यासमोर एक समस्या येते. समजा आपण बूट बनवणाऱ्या क्षेत्रातील पाच बूट उत्पादकांना घेतले जे समान प्रकारचे बूट तयार करतात. एक बूट बनवण्यासाठी पहिल्या उत्पादकाला 3 तास, दुसऱ्याला 4 तास, तिसऱ्याला 5 तास, चौथ्याला 6 तास आणि पाचव्याला 7 तास लागतात. म्हणजेच पहिल्या उत्पादकाचे 3 तासाचे श्रम खर्च झाले आहे, दुसऱ्याचे 4 तास, तिसऱ्याचे 5 तास, चौथ्याचे 6 तास आणि पाचव्याचे 7 तासाचे श्रम खर्च झाले आहे. पहिल्या उत्पादकाच्या बुटाचे श्रम-मूल्य 3 तास आहे, तर पाचव्याच्या बुटाचे श्रम-मूल्य 7 तास आहे. तर मग काय एकाच प्रकारचे बूट बाजारात पाच वेगवेगळ्या मूल्यांत किंवा किमतीत (ज्याबद्दल आपण आता सुरुवातीला एवढे मानू की ही मूल्याची मौद्रिक अभिव्यक्ती आहे) विकले जातील? नाही! आपल्या सर्वांना माहीत आहे की हे शक्य नाही. स्पष्ट आहे की जर ग्राहकाला एकाच प्रकारचा बूट पाच वेगवेगळ्या किमतीत मिळाला तर तो सर्वात स्वस्त बूट खरेदी करेल. म्हणून आपण अमूर्त श्रम मोजण्यासाठी वेगवेगळ्या उत्पादकांद्वारे खर्च झालेल्या श्रमकाळाला म्हणजेच वैयक्तिक श्रमकाळाला वापरू शकत नाही. कोणत्याही उत्पादनाच्या क्षेत्रात श्रमाचे प्रमाण मोजण्यासाठी आपण **सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ** वापरतो. खरं तर अमूर्त श्रम स्वतःमध्येच एक सामाजिक पदार्थ आहे आणि त्याला वैयक्तिक श्रमकाळाने मोजले जाऊ शकत नाही. ते केवळ सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळानेच मोजले जाऊ शकते.

**हा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ काय आहे?** कोणत्याही उत्पादनाच्या क्षेत्रात कोणत्याही वेळी अस्तित्वात असलेल्या उत्पादनाच्या सरासरी परिस्थितीच्या आधारावर मालाचे उत्पादन करण्यासाठी जो वेळ लागतो, त्याला आपण सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ म्हणतो. उत्पादनाची सरासरी परिस्थिती म्हणजे काय? उत्पादनाची सरासरी परिस्थिती म्हणजे उत्पादकता, कुशलता, तंत्रज्ञान इ. ची सरासरी पातळी. उत्पादनाच्या सरासरी परिस्थितीत एखाद्या मालाचे उत्पादन करण्यासाठी उत्पादकाला जेवढा वेळ लागतो त्याला आपण सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ म्हणतो. सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळानुसार मोजल्यानंतर कोणत्याही मालाच्या उत्पादनात जेवढे अमूर्त श्रम लागतात त्याला आपण त्या मालाच्या उत्पादनासाठी लागणारे सामाजिकदृष्ट्या आवश्यक अमूर्त श्रम म्हणतो आणि हेच त्या मालाचे मूल्य निर्धारित करते. आता आपण आपली व्याख्या थोडी परिष्कृत करूयात: *एखाद्या मालाचे मूल्य त्यामध्ये लागलेल्या मानवी अमूर्त श्रमांच्या प्रमाणाने निर्धारित होते ज्याला सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळानुसार मोजले जाते.* आपल्या वरील उदाहरणात जर सरासरी परिस्थितीत बूट उत्पादन क्षेत्रात बूट तयार करण्यासाठी 5 तास लागत असतील तर त्या मालाला त्याच्या सामाजिक किंवा बाजार मूल्यानुसार विकल्यास पहिल्या उत्पादकाला काही अतिरिक्त नफा मिळेल, दुसऱ्याला त्यापेक्षा कमी अतिरिक्त नफा मिळेल, तिसऱ्याला सामान्य सरासरी नफा मिळेल कारण त्याची उत्पादकता बूट उत्पादन क्षेत्रातील

पान 8 वर

# क्रांतिकारी कामगार शिक्षण मालिका - 5

## माल, उपयोग-मूल्य, विनिमय-मूल्य आणि मूल्य

पान 7 वरुन

सरासरी उत्पादकतेएवढी आहे, चौथ्या आणि पाचव्या उत्पादकांना तोटा सहन करावा लागेल आणि जर त्यांना बूट उत्पादन क्षेत्रात टिकून राहायचे असेल तर त्यांनासुद्धा कालांतराने त्यांची उत्पादकता वाढवावी लागेल. ही उत्पादनाच्या एखाद्या क्षेत्रातील माल उत्पादकांमध्ये होणारी स्पर्धा आहे. **उत्पादनाच्या एका क्षेत्रात होणाऱ्या या स्पर्धेच्या आधारे मालाचे सामाजिक मूल्य किंवा बाजार मूल्य निर्माण होते जे सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळानुसार निर्धारित होते.** हे समजणे सोपे आहे की मालाचे बाजार मूल्य किंवा सामाजिक मूल्य वेगवेगळ्या उत्पादकांच्या वैयक्तिक श्रमकाळानुसार निर्माण होऊ शकत नाही, कारण विनिमय ही स्वतःच एक सामाजिक प्रक्रिया आहे आणि विनिमयासाठी मूल्याचे निर्धारण स्वतः एका सामाजिक प्रक्रियेद्वारेच होते.

अजून एक समस्या उरली आहे ज्याबद्दल बोलणे आवश्यक आहे: **कुशल श्रम आणि अकुशल श्रमाची समस्या.**

जेव्हा आपण अमूर्त श्रमाच्या प्रमाणाद्वारे मूल्य ठरवण्याबद्दल बोलतो तेव्हा आपण साधारण किंवा अकुशल श्रमाबद्दल बोलत आहोत की जटिल किंवा कुशल श्रमाबद्दल? कुशल श्रमाचा एक तास अकुशल श्रमाच्या एका तासाएवढा असतो का? कुशल श्रमशक्तीचे मूल्य अकुशल श्रमशक्तीच्या मूल्याएवढे असते का? आम्हा कष्टकऱ्यांना आमच्या अनुभवावरून हे माहीत आहे की कुशल कामगाराला जास्त मजुरी मिळते, तर अकुशल कामगाराला कमी मिळते. आपल्याला हे माहीत आहे की एका तासाचे कुशल श्रम जास्त मूल्य निर्माण करते आणि एका तासाचे अकुशल श्रम त्यापेक्षा कमी मूल्य निर्माण करते. तर मग कोणत्या प्रकारचे श्रम मूल्य ठरवतात? मूल्य साधारण/अकुशल श्रमाद्वारे निर्धारित केले जाते, कारण कुशल श्रमाच्या एका तासाला अकुशल श्रमाच्या तासांच्या एका निश्चित प्रमाणात बदलले जाऊ शकते आणि अतिशय अचूकतेने आणि वैज्ञानिकतेने बदलले जाऊ शकते. हे काम राजकीय अर्थशास्त्रज्ञ नेहमीच करतात. कसे? आपल्याला हे माहीत आहे की अकुशल कामगार तो असतो ज्याचे कौशल्य अशा स्तरावरील असते जे समाजातील कोणतीही व्यक्ती विशेष प्रशिक्षणाशिवाय एका निश्चित काळाच्या उत्पादक श्रमाच्या अनुभवानंतर प्राप्त करू शकतो. कुशल कामगार तो असतो ज्याच्या कौशल्याची पातळी कुठलेतरी प्रशिक्षण घेतल्यानंतरच शक्य होते. हे प्रशिक्षण काय आहे? प्रशिक्षणाची ही प्रक्रिया प्रत्यक्षात कौशल्याची निर्मिती असते, ज्यात इतर श्रमशक्ती खर्ची होतात. उदाहरणार्थ, जर तुम्ही आयटीआय किंवा पॉलिटेक्निकमध्ये एखाद्या प्रकारच्या उत्पादक श्रमाचे कौशल्य शिकला असाल तर ते शिकवण्यासाठी शिक्षक, प्रशिक्षक, प्रयोगशाळा सहाय्यक इ. काम करतात. त्यांच्या श्रमातून जन्माला आलेले शिक्षण आणि प्रशिक्षण स्वतः एक माल असते, जे तुम्ही फी भरुन विकत घेता. प्रशिक्षण घेतल्यानंतर जेव्हा तुम्ही एखाद्या ठिकाणी वस्तूंच्या उत्पादनात लागता तेव्हा तुमची श्रमशक्ती *कंपाऊंड किंवा जटिल श्रमशक्तीच्या* रूपात उत्पादन प्रक्रियेत सक्रिय होते. याचा अर्थ असा की तुमच्या श्रमशक्तीच्या माध्यमातून तुमच्या कौशल्याच्या उत्पादनात खर्च झालेल्या इतर श्रमशक्तीही या उत्पादन प्रक्रियेत सहभागी होतात. परिणामी, कौशल्याच्या उत्पादनात खर्च झालेल्या श्रमशक्तींनी पुरविलेल्या सामाजिक श्रमाद्वारे निर्मित मूल्याच्या आधारावर आपण कुशल श्रमाच्या एका तासाचे साधारण श्रमाच्या तासांच्या एका निश्चित संख्येत रूपांतर करू शकतो. दुसऱ्या शब्दांत, कौशल्याच्या निर्मितीमध्ये खर्च केलेल्या श्रमशक्तीच्या आधारावर तुम्ही एक **गुणांक (कोइफिशन्ट)** काढू शकता, ज्याच्याशी गुणाकार करून तुम्ही एका तासाच्या जटिल/कुशल श्रमाच्या एका तासाला साधारण/अकुशल श्रमाच्या तासांच्या ठराविक संख्येमध्ये बदलू शकतो. उदाहरणार्थ, राजमिस्त्रीच्या श्रमाचा एक तास हा अकुशल बांधकाम कामगाराच्या तीन तासांच्या श्रमाच्या समतुल्य असू शकतो. ही गणना अत्यंत वैज्ञानिक आणि अचूक पद्धतीने केली जाऊ शकते आणि केली जाते. त्यामुळे, कुशल आणि अकुशल श्रम यांच्यातील फरकामुळे मूल्य निश्चित करण्यात कोणतीही अडचण निर्माण होत नाही. जेव्हा आपण मूल्य निर्धारित करताना श्रमाचे प्रमाण मोजतो, तेव्हा आपण अमूर्त साधारण सामाजिक श्रम मोजतो. त्यासाठी वरील गुणांकाच्या आधारे कुशल श्रमाला अकुशल श्रमात बदलावे लागते. या प्रक्रियेला 'जटिल श्रमांचे साध्या श्रमात संक्षेपण (reduction)' असे म्हणतात. मार्क्स याबद्दल लिहितात:

> "अधिक जटिल श्रमाचे मोजमाप हे केवळ *सघनीकृत* किंवा *गुणित* साधारण श्रमाच्या रुपातच होऊ शकते, ज्याद्वारे जटिल श्रमाच्या कमी प्रमाणाला साधारण श्रमाच्या अधिक प्रमाणाएवढे मानले जाते. अनुभव दर्शविते की हे संक्षेपण निरंतर होत राहते... विविध प्रकारच्या श्रमांना त्यांच्या मापाचे एकक म्हणून साधारण श्रमात ज्या प्रमाणात संक्षेपित केले जाते, ते एका सामाजिक प्रक्रियेद्वारे निर्धारित केले जाते जी उत्पादकांच्या पाठीमागे सतत चालू राहते." (कार्ल मार्क्स, 1992, भांडवल, खंड-1, पेंग्विन प्रकाशन, पृष्ठ 135)

जसे की आपण पाहू शकतो, कुशल आणि अकुशल श्रमातील फरक अमूर्त श्रमाच्या प्रमाणाद्वारे मूल्य निश्चित करण्यात कोणतीही अडचण निर्माण करत नाही. हा कुठलाही काल्पनिक विचार नाही आहे ज्यावरून वास्तविकता निर्धारित होईल, उलट वास्तविकतेच्या अध्ययनाच्या आधारावरच स्मिथ आणि रिकार्डो यांच्यासारख्या अभिजात राजकीय अर्थशास्त्रज्ञांनी आणि सर्वात महत्त्वाच्या स्वरूपात मार्क्सने हा सिद्धांत काढला.

आता आपण शेवटच्या समस्येकडे येऊयात, ज्याचा मूल्याच्या श्रम सिद्धांताशी थेट संबंध नसला तरी त्याच्या आकलनात हे महत्त्वाचे आहे. याविषयी आपण पुढेही बोलूच, परंतु आत्ता त्याबद्दल थोडक्यात चर्चा करणे उपयुक्त ठरेल.

सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम हा शब्द आपण दोन अर्थाने वापरतो. पहिला अर्थ म्हणजे तो ज्यावर आपण वर चर्चा केलेली आहे. म्हणजे, अमूर्त श्रमाचे ते प्रमाण जे एखाद्या मालाच्या उत्पादनासाठी आवश्यक असते, जे त्याचे मूल्य ठरवते आणि ज्याला सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळाद्वारे मोजले जाते. **परंतु सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाचा आणखी एक दुसरासुद्धा अर्थ आहे.** संपूर्ण समाजाच्या पातळीवर श्रमाचे ते प्रमाण जे समाजाच्या गरजेनुसार निश्चित मालाला निश्चित प्रमाणात उत्पादित करते त्याला आपण सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम म्हणतो. माल-उत्पादक समाजात विनिमयाच्या मध्यस्थीद्वारेच संपूर्ण सामाजिक उपभोग होतो. येथे सर्व उत्पादक मिळून हे ठरवत नाहीत की समाजाला कोणत्या मालाची किती प्रमाणात आवश्यकता आहे आणि त्याच्यानुसार संपूर्ण सामाजिक श्रमाचे उत्पादनाच्या विविध शाखांमध्ये वेगवेगळ्या प्रमाणात योजनाबद्ध पद्धतीने वाटपही ते करत नाहीत. **म्हणजेच सामाजिक श्रम विभागणी जाणीवपूर्वक आयोजित केली जात नाही.** माल-उत्पादक समाजात वेगवेगळे खाजगी माल उत्पादक त्यांच्या उत्पादनाच्या साधनांसह आणि श्रमशक्तीसह उत्पादन करतात आणि एकमेकांशी स्पर्धा करतात, जी बाजारात घडते. कोणालाच हे माहिती नसते की समाजात त्याच्या मालासाठी पुरेसे खरेदीदार असतील की नाही. ही एक अराजक प्रक्रिया असते ज्यामध्ये सामाजिक गरजांचे वैज्ञानिकदृष्ट्या मूल्यांकन केले जात नाही आणि त्यानुसार सामाजिक श्रम विभाजन ठरवले जात नाही. **परिणामी, कधी एखाद्या मालाचे गरजेपेक्षा जास्त तर कधी कमी उत्पादन होते.** हे एका उदाहरणाने समजून घेऊ. 1970 आणि 1980 च्या दशकात भारतातील वस्त्रोद्योगात परिवर्तन होत होते. मोठ्या पारंपारिक कापड गिरण्यांमध्ये सूती कापडाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन अनेक दशकांपासून सुरू होते. परंतु या काळात यंत्रमागाचे आगमन झाले आणि कृत्रिम कापडांचे उत्पादन सुरु झाले ज्याची उत्पादकता जास्त होती. परिणामी, हे कृत्रिम कापड अधिक परवडणारे आणि टिकाऊ होते. त्यामुळे त्यांची मागणीही समाजात वाढू लागली व त्यामुळे त्यांचा पुरवठा त्यांच्या मागणीपेक्षा कमी होता. त्याच वेळी जुन्या पारंपारिक कापड उद्योगात उत्पादित सुती कपड्यांची मागणी कमी होऊ लागली. त्यामुळे त्यांच्या भावात घसरण होऊ लागली आणि बहुतांश मालाची विक्रीही होऊ शकली नाही. **जो माल विकल्या गेला नाही त्याला समाजाने सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमाचे उत्पादन म्हणून स्वीकारले नाही.** यासोबतच वस्त्रोद्योगात गुंतवणूक करणाऱ्या भांडवलदारांनी त्यांच्या भांडवलाचा काही भाग इतर उद्योगांकडे आणि पॉवरलूम आणि कृत्रिम कापडाच्या उत्पादनाकडे वळवला. जुन्या वस्त्रोद्योगातून भांडवलाचा प्रवाह नवीन वस्त्रोद्योगाकडे जाण्यासोबतच सामाजिक श्रमाचा एक भागही नवीन वस्त्रोद्योगांकडे स्थानांतरित झाला. म्हणजेच, जुन्या कापड उद्योगात जे श्रम लागत होते ते सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमापेक्षा जास्त होते आणि त्याचा काही भाग वाया जात होता, ज्याच्या उत्पादाला बाजारात कुठलाही खरेदीदार मिळत नव्हता. परिणामी, सामाजिक श्रमविभाजन, म्हणजेच सामाजिक श्रमाचे उत्पादनाच्या विविध क्षेत्रांमधील वाटप देखील बदलले. नवीन प्रकारच्या वस्त्रोद्योगातील मालाच्या चढ्या किमती हे त्याला समाजाने दिलेले एक प्रकारचे प्रोत्साहन होते, जेणेकरून जुन्या वस्त्रोद्योगातून भांडवल व मजूर इकडे आकर्षित होतील आणि त्यासोबतच सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमानुसार श्रमविभागणीत बदल होईल. एका माल-उत्पादक समाजात सामाजिक श्रम विभाजन अशाच प्रकारे अराजक गतीने बदलते. काही मालांना समाज सामाजिकदृष्ट्या आवश्यक मानत नाही, त्यांचे मूल्य वास्तवीकृत होऊ शकत नाही, ते वाया जातात आणि त्या मालांच्या उत्पादनाच्या क्षेत्रात लागलेल्या श्रमांना सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रम म्हणून मान्यता प्राप्त होत नाही. अशाप्रकारे मूल्याचा नियमच एका माल-उत्पादक समाजात सामाजिक श्रम विभाजन निर्धारित करतो आणि कोणते श्रम सामाजिकदृष्ट्या आवश्यक आहे आणि कोणते सामाजिकदृष्ट्या अनावश्यक आहे हे निर्धारित करतो.

**थोडक्यात, मूल्याचा मार्क्सवादी श्रम सिद्धांत सांगतो की प्रत्येक वस्तू किंवा सेवा जी विनिमयासाठी उत्पादित केली जाते ती माल आहे. म्हणून माल ती वस्तू किंवा सेवा आहे जिला उपयोग-मूल्य आणि विनिमय-मूल्य असते. परंतु विनिमय-मूल्य हे वास्तवात दुसरे काही नसून विनिमय करावयाच्या मालांच्या मूल्यांचे गुणोत्तर आहे आणि त्यांची अभिव्यक्ती आहे. खरी गोष्ट म्हणजे उपयोग-मूल्य आणि मूल्य समजून घेणे आहे. कोणत्याही मालाचे मूल्य त्याच्या उत्पादनात लागलेल्या अमूर्त श्रमांच्या प्रमाणात निर्धारित केले जाते, जे सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळात मोजले जाते. मूल्य म्हणजे दुसरे काही नसून वस्तुरुपातील किंवा 'थिजलेले श्रम' आहे.** हे मूल्यच मालांच्या बाजारभावाचा आधार असतात आणि बाजारातील किमती याच मूल्यांभोवती फिरतात, जरी प्रत्येक मालाचे मूल्य आणि त्याची बाजार किंमत साधारणपणे एकसमान नसतात. हे आपण नंतर पुढे समजून घेऊ.

मूल्याचा श्रम सिद्धांत त्याच्या वैज्ञानिक स्वरूपात मार्क्सने विकसित केला. मार्क्सने ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो यांच्या मूल्याच्या श्रम सिद्धांतातील त्रुटी दूर केल्या आणि स्पष्ट केले की भांडवलदार वर्गाचा नफा हा कामगार वर्गाने निर्माण केलेल्या सामाजिक अधिशेषाचेच एक रूप आहे. मार्क्सने ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो यांच्या मूल्याच्या श्रम सिद्धांतातील त्रुटी कशा दूर केल्या आणि भांडवलदार वर्गाच्या नफ्याचे स्रोत कसे उघड केले ते आपण पुढे पाहू.

**(पुढील अंकात सुरु)**

**(मूळ लेख- मजदूर बिगुल, ऑक्टोबर 2022 मध्ये प्रकाशित)**

**अनुवाद- जयवर्धन**

# लव्ह जिहादचे षडयंत्र हाणून पाडले!

## शाहबाद डेअरी मध्ये साक्षीच्या हत्येला लव्ह जिहादचं स्वरूप देऊ पाहणाऱ्या हिंदुत्ववादी संघटनांच्या प्रचाराला क्रांतिकारी कामगार वर्गाने हाणून पाडले!

✎ अश्विनी

28 मे रोजी दिल्लीमध्ये शाहबाद डेअरी येथे 16 वर्षीय साक्षी एका बर्थडे पार्टीला जात असताना तिचा पूर्वीचा मित्र साहिलने रस्ता अडवून तिची हत्या केली. त्याने तब्बल 34 चाकूचे वार केले, एवढ्यावरच तो थांबला नाही तर त्यानंतर दगड घेऊन तिचे डोके, कंबर ठेचून काढले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली, ज्यातून आपण पाहू शकतो की ही हत्या किती निर्दयीपणे केली गेली. त्याचवेळी आजूबाजूने येणाऱ्या जाणाऱ्या जनतेने मात्र या घटनेत कोणताही हस्तक्षेप केला नाही हे सुद्धा दिसते.

शाहबाद डेअरी मध्ये घडलेली ही काही पहिली घटना नाही. महिलाविरोधी, मुलींविरोधी अत्याचार इथे सततच घडत असतात. चौकाचौकात मुलींची छेड काढणे, त्यांचा रस्ता अडवणे ह्या दररोज घडणाऱ्या घटना आहेत, कारण साहिल सारख्या लंपटांना राजकीय आश्रय देणारे भांडवली पक्षही येथे आहेत. वस्तीत वाढणारी नशाखोरी, गुंडगिरी ह्याच पक्षांच्या नेत्यांमार्फत, दलाल-चेल्या-चपाट्यांमार्फत वाढवली जाते आणि अशा पाळलेल्या गुंड-चमचे-दलालांच्या जोरावरच निवडणुकांच्या वेळी यांना मतं मिळवणे शक्य होते. शाहबाद डेअरी सारख्या वस्त्यांमध्ये विविध कारणांवरुन सतत ताणतणाव असतात, त्यातून एकमेकांचे सर्रास खून केले जातात. काही बातम्यांनुसार काही काळापूर्वी ह्याच भागात दोन वेगवेगळ्या वेळी नाल्यात तरुणांचे मृतदेह वाहून जाताना आढळले. एकदा तर रस्त्याच्या बाजूला एका तरुणाचा मृतदेह पडलेला दिसला. परंतु त्या वेळी सुद्धा प्रशासनाची ना कुठलीही त्वरित हालचाल दिसली, ना गुन्हेगारांना पकडण्याचे प्रयत्न सुरू झाले. यातूनच दिसून येते की शाहबाद डेअरी सारख्या ठिकाणी पोलिसांच्या नाकर्तेपणामुळे गुन्हेगारी प्रवृत्तींना एकाप्रकारे खुले रानच मिळालेले आहे.




28 मे ला ही घटना घडल्यानंतर दुसऱ्याच दिवशी संघ भाजपच्या विविध संघटना म्हणजे आरएसएस, बजरंग दल मिळून घटनेला धार्मिक वळण देण्यासाठी खोटा प्रचार घेऊन वस्तीत आले. साहिल मुस्लिम धर्मातून येत होता आणि साक्षी हिंदू, म्हणून हे लव जिहादचे प्रकरण होतं, ह्याप्रकारचं धार्मिक विष पेरत उजव्या संघटना सक्रिय झाल्या. त्यावेळेस भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाच्या (आर.डब्ल्यु.पी.आय.) नेतृत्वात स्थानिक जनतेनेच या प्रकरणात साहिलला शिक्षा तर झालीच पाहिजे, परंतु अशा घटना अगोदरही होत आल्यात, आणि इथे धर्माचा काही संबंध नाही ही भूमिका घेत धर्मांध प्रचारकांना हाकलून लावले. यानंतर भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाकडून गुन्हेगाराला शिक्षा झालीच पाहिजे ही मागणी घेऊन संपूर्ण शाहबाद डेअरी भागातून रॅली काढण्यात आली. अगोदरचे लव्ह जिहादचं षडयंत्र अपयशी ठरल्यामुळे नंतर मुस्लिमांविरोधात विष पेरणारी सभा हिंदुत्ववादी संघटनांनी आयोजित केली. ह्या सभेलाही शह देण्यासाठी भारताचा क्रांतिकारी कामगार पक्षाने ( आर.डब्ल्यु.पी.आय.) त्याच दिवशी जवळच आपली कामगारांची सभा ठेवली आणि वरील संघी प्रयत्नांनाही उलथवून लावले. पक्षातर्फे सतत कामगार एकतेचा प्रचार प्रसार करत प्रचार मोहिमा काढण्यात आल्या. आर.डब्ल्यु. पी.आय. कार्यकर्त्यांसोबत कामगारांनी शपथ घेतली की अशा धार्मिक प्रचाराचा बळी पडणार नाही आणि वर्गीय एकता राखून अशा घटनांना विरोध केला जाईल. स्त्रियांना स्वतःच्या सुरक्षेबाबत आत्मविश्वास वाढावा, अशा गंभीर अत्याचारांना विरोध करता यावा म्हणून आर.डब्ल्यु.पी.आय. तर्फे 'दुर्गा भाभी स्क्वाड' ची स्थापना केली गेली आहे, ज्यामध्ये नियमित रूपाने वस्तीतील इच्छुक मुलामुलींसाठी कवायत, कराटेचे प्रशिक्षण सुद्धा दिले जात आहे.

एन.सी.आर.बी. 2022 अहवालानुसार दिल्ली महिलांसाठी सर्वात असुरक्षित शहर आहे. तिथे दर दिवसाला 2 लहान मुलींवर बलात्कार होतात. पूर्ण देशाची आकडेवारी पाहिल्यास लक्षात येते की देशभरात दर दिवसाला 87 बलात्कार होतात. 2020 च्या तुलनेत 2021 मध्ये महिलांवरील अत्याचारांच्या संख्येत 15.8 टक्क्यांनी वृद्धी झाली आहे. 2020 मध्ये ही संख्या 3,71,503 होती तर 2021 मध्ये वाढून 4,28,278 झाली. बलात्कार करून हत्या करणे अशा अत्याचाराचे क्रूर स्वरूप दिवसेंदिवस वाढत चालले आहेत. यामागे एक मुख्य कारण आहे भांडवली बाजारी व्यवस्थेने सतत चालवलेले स्त्री देहाचे बाजारीकरण.

1991 पासून भारतात 'खाऊजा' धोरण अवलंबले गेले. यातून एक नवधनाढ्य वर्ग उदयाला आला. असा परजीवी वर्ग जो बसल्या बसल्या अगणित पैसा लुटत आहे आणि आर्थिक व राजकीयरित्या मजबूत झाला आहे. अर्थातच कायदे, न्यायव्यवस्था, सरकारं खिशात ठेवून विविध स्त्री विरोधी, कामगार विरोधी अपराध करताना यांना कुणाची चाड नसते. ह्या वर्गाने फेकलेल्या तुकड्यांवर पोसला जाणारा एक दुसरा

पान 12 वर

# स्त्री मुक्ती लीग तर्फे मानखुर्द, मुंबई येथे 'मुक्ती चे स्वर' वाचनालयाचे उद्घाटन!!

## भांडवली पितृसत्तेविरोधात एकजूट होऊन लढण्याचे केले आवाहन!

✎ बिगुल पत्रकार

गेली काही वर्षे स्त्री मुक्ती लीग मुंबईतील मानखुर्द-गोवंडी भागात स्त्री मुक्तीच्या प्रश्नावर क्रांतिकारी कार्य करत आहे. आजच्या भांडवली व्यवस्थेत होणाऱ्या स्त्रियांच्या सामाजिक-आर्थिक दुहेरी शोषणाविरोधात, नफाकेंद्री व्यवस्थेद्वारे केल्या जाणाऱ्या स्त्रियांच्या वस्तुकरणाविरोधात स्त्री मुक्ती लीग वेगवेगळ्या प्रकारे जमिनीवर काम करत आहे. यातील काही कामं म्हणजे सावित्री फातिमा अभ्यास गट चालवणे, राजकीय, सामाजिक विषयांवर महिला बैठक घेणे, फिल्म स्क्रिनिंग आणि चर्चासत्रे, ऑनलाईन चर्चासत्रे, विविध कार्यशाळा, व्याख्यानं आयोजित करणे, पोस्टर प्रदर्शन लावून, पत्रकं वाटून अभियान चालवणे, स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराविरोधात ठाम भूमिका घेऊन ती लिखित रूपात सर्वासमोर ठेवणे, आंदोलन करणे, अभियान चालवणे व त्यायोगे स्त्री मुक्तीकरिता एकजूट होऊन लढण्याचे आवाहन करणे, इत्यादी. याच कामांना पुढे नेत, जनतेतून आर्थिक सहयोग उभा करून स्त्री मुक्ती लीगच्या कार्यालयीन जागेचे 9 जुलै, 2023 रोजी उद्घाटन करण्यात आले जिचे नाव ठेवले गेले - 'मुक्ती चे स्वर' वाचनालय! यावेळी स्त्री मुक्ती लीगच्या समन्वयक पूजा यांनी मांडले की मुक्ती के स्वर ही अशी जागा आहे जिथे विविध पुस्तकं असलेलं वाचनालय आहे, जिथे स्त्रिया मीटिंग्स् करू शकतात, सावित्री फातिमा अभ्यास गटाअंतर्गत मुलींना, महिलांना जिथे शिकवले जाईल, नाटक, गाणी, कविता इत्यादींचा सराव केला जाईल, संगणक शिकवला जाईल, फिल्म स्क्रिनिंग, व्याख्यानं आयोजित केली जातील.




उद्घाटनप्रसंगी क्लारा झेटकिन, रोझा लक्झेंबर्ग, सावित्रीबाई फुले, फातिमा बी शेख, प्रीतीलता वाडेदार, दुर्गाभाभी, तसेच स्त्री मुक्ती लीग सोबत आयुष्यभर संघर्षात सामील असलेल्या साथी मीनाक्षी आणि शालिनी यांच्यासारख्या देशातील व देशाबाहेरील स्त्री मुक्तीच्या संघर्षात सामील महिला क्रांतिकारकांचे फोटोज, स्त्री मुक्तीच्या संघर्षाला प्रेरणादायी अशा काव्यपंक्ती, कोटस्, यांचे बॅनर्स आणि पोस्टर्स यांनी सर्व मंच व्यापला होता. उद्घाटनाच्या दिवशी पाऊसाने हजेरी लावलीच परंतु तरीही मुंबईच्या वेगवेगळ्या भागांतून, तसेच मानखुर्द - गोवंडीमधील वेगवेगळ्या वस्त्यांमधील स्त्री मुक्ती लीगचे हितचिंतक उद्घाटन कार्यक्रमात सामील झाले. संविधान चौक ते आर-15 बिल्डिंग पर्यंत 'स्त्री मुक्ती का रास्ता, इंकलाब का रास्ता', 'मार्ग मुक्तीचा बनवावा लागेल, जगायचे असेल तर लढावे लागेल', 'भांडवली पितृसत्ता मुर्दाबाद' अशा स्त्री मुक्ती लढ्याशी संबंधित घोषणा देत, महिला क्रांतिकारकांचे पोस्टर्स, घोषणा लिहिले प्लाकार्ड्स, बॅनर, दफ्त्या पकडत, डफली वाजवत रॅली काढण्यात आली. रॅलीदरम्यान 'मुक्ती चे स्वर' बद्दल माहिती देणारे पत्रक तसेच स्त्री मुक्ती लीगची भूमिका मांडणारे पत्रक मराठी, इंग्रजी, हिंदी ह्या भाषांमध्ये वितरित करण्यात आले. त्यानंतर कार्यालयाच्या इमारतीच्या खाली सफदर हाशमी लिखित पथनाट्य 'औरत' पासून प्रेरित 'एका कष्टकरी बाईची कहाणी' हे सडक नाटक, गीत, रॅप, काव्यवाचन इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमांची प्रस्तुती करण्यात आली. यावेळी ललिताने स्त्री मुक्ती लीगची व्यापक भूमिका मांडली, शशांकने भाजपा सरकार सत्तेत आल्यापासून महिलांवर वाढलेले अत्याचार व काही प्रमुख घटना ज्यांविरोधात स्त्री मुक्ती लीगने आंदोलने केलीत त्यांचा आढावा मांडला तर पूजाने 'मुक्ती चे स्वर' सारख्या जागांची गरज अधोरेखित केली, 'मुक्ती चे स्वर'च्या उद्घाटनासाठी ज्यांना आमंत्रित केले होते अशा एन.आर.सी. सारख्या काळ्या कायद्याविरोधात उभ्या राहिलेल्या संघर्षात ठामपणे उभे राहिलेल्या महिलांची ओळख मांडली तसेच ह्या गरिबविरोधी कायद्याबद्दल थोडक्यात मांडणी केली. प्रज्ञाने उपस्थित सर्वांना 'मुक्ती चे स्वर'ची सदस्यता घेण्याचे तसेच आर्थिक सहयोग देण्याचे आवाहन केले. त्यानंतर 'मुक्ती चे स्वरच्या' खोलीला लावलेल्या रिबीन कापण्याचा कार्यक्रम घोषणांच्या व टाळ्यांच्या गजरात पार पडला.

यानंतर कार्यालयात बसल्यानंतर उपस्थित अनेकांनी आपली मतं मांडली, 'मुक्ती चे स्वर'ची सदस्यता घेण्याची इच्छा दर्शवली तसेच काही महिलांनी शिकण्याची तर काहींनी शिकवायला येण्यासाठी नावनोंदणी केली. समान व निःशुल्क शिक्षण हा आपला अधिकार आहे, आणि ही जबाबदारी संपूर्णपणे सरकारची असतानाही सरकार मात्र कामगार, कष्टकऱ्यांना त्यापासून वंचित ठेवून खाजगी धंदेबाज शिक्षणाला प्रोत्साहन कसे देते यावर शिक्षण हक्काच्या संदर्भात चर्चा संपन्न झाली. कार्यक्रमाच्या शेवटी पुन्हा एकदा जोरदार घोषणा, क्रांतिकारी रॅप व गीतांची प्रस्तुती करण्यात आली.

मार्ग मुक्तीचा बनवावा लागेल, जगायचे असेल तर लढावे लागेल!

स्त्री मुक्तीचा रस्ता, इंकलाबचा रस्ता!!

# लाखोंच्या संख्येने तोडली जाताहेत कामगार-कष्टकऱ्यांची घरं!

✎ रवि

30 जून रोजी दुपारी 1च्या सुमारास दक्षिण दिल्लीच्या तुघलकाबादमध्ये कपडे शिवत असतांना चंदनलालला त्याच्या 12 वर्षाच्या मुलाचा फोन आला. घाबरलेल्या आवाजात त्याने सांगितले की काही लोक बुलडोझर घेऊन आपले घर तोडत आहेत. शिंपी म्हणून एका दुकानात काम करणाऱ्या चंदनलालने हातातले काम टाकून घराकडे पळ काढला. घरी येऊन चंदनलाल, त्याची बायको आणि त्याच्या मुलांनी हताश होऊन आपले सामान गोळा करण्यास सुरुवात केली. पोलिसांच्या संरक्षणात आलेल्या जेसीबीच्या ताफ्याने संध्याकाळपर्यंत त्यांचे घर जमीनदोस्त केलेले होते. चंदनलाल रस्त्यावर बसलेल्या आपल्या कुटुंबाकडे पाहात शून्यामध्ये हरवून गेला होता. शिकवणीमध्ये मिळालेले जी-20 परिषदेचे टी-शर्ट घालून त्याचा मुलगा दुसऱ्या दिवशी शाळेत जाण्याची तयारी करत होता.

अशा प्रकारे कामगार-कष्टकऱ्यांची घरं उद्ध्वस्त करण्याच्या घटनांमध्ये 2022 पासून मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. वेगवेगळी कारणं देऊन राज्य आणि केंद्र सरकारांनी वस्त्यान्-वस्त्या उद्ध्वस्त करून शहरांमध्ये राहणाऱ्या कामकरी जनतेला रस्त्यावर आणण्याचा घाट घातला आहे. मुख्यत्वे शहराच्या मध्यवर्ती भागांमध्ये राहणाऱ्या वस्त्यांवर कारवाई करून बहुतांश लोकांना बेघर केले जात आहे आणि उघड्यावर राहण्यास भाग पाडले जात आहे. फारच थोड्या घटनांमध्ये जनतेला पर्यायी राहण्याची व्यवस्था किंवा भरपाई दिली जात आहे.

मागच्या काही वर्षांमधील घटनांचा आपण अंदाज घेतला तर असे दिसते की विविध सरकारी प्रकल्पांसाठी कामगार-कष्टकरी जनतेला बेघर केले जात आहे; ज्यात रस्ते, मेट्रो प्रकल्प, विमानतळ, सरकारी इमारती, झोपडपट्टी पुनर्वसन आणि निर्मूलन, शहर सौंदर्यीकरण, पर्यावरण संरक्षण इत्यादी कारणांचा समावेश होतो. पुण्याच्या मध्यवर्ती भागामध्ये शिवाजी नगर येथे असणाऱ्या कामगार पुतळा वसाहतीला मागच्या वर्षी महानगरपालिकेने उद्ध्वस्त केले आणि तिथे राहणाऱ्या जनतेला शहराबाहेर लोहगाव येथे विस्थापित केले. मेट्रो स्थानक बांधण्याचे कारण त्यांना दिले गेले. अहमदाबादमध्येसुद्धा मेट्रोच्या कामासाठी अतिशय तोकडी भरपाई जाहीर करून घरांना जमीनदोस्त केले गेले. आसाममध्ये दूध प्रकल्प उभारण्याच्या नावाखाली अनेक दशकांपासून राहात असलेल्या 300 घरांवर बुलडोझर चालविण्यात आले. त्याबदल्यात त्यांना भरपाई किंवा पर्यायी घरं देण्यात येणार नसल्याचे सरकारने जाहीर केले. जुलै महिन्यात मुंबईच्या मलाड भागात भर पावसात अधिकाऱ्यांच्या आदेशानंतर 200 घरं जमीनदोस्त करण्यात आली आणि तिथे राहणाऱ्या प्रवासी कामगारांना रस्त्यावर आणले गेले. कित्येक वेळा तर घरं तोडण्यापूर्वी सामान बाहेर काढण्यासाठी वेळ सुद्धा दिला जात नाही. दिल्लीमध्ये घरतोडीची नोटीस दिल्यानंतर तीन तासांमध्ये घरं तोडल्याच्या, दिलेल्या वेळेच्या आधीच घरं तोडल्याच्या घटनासुद्धा समोर आल्या आहेत. घर तोडण्यासाठी प्रशासन आल्यानंतर वस्तीचे सर्व प्रवेश रस्ते बंद केले जातात. आत असणाऱ्या आणि बाहेर असणाऱ्या लोकांचा संपर्क तोडला जातो आणि जनतेला गोंधळलेल्या स्थितीमध्ये सोडले जाते जेणेकरून जनतेला संघटित विरोध करणे शक्य होणार नाही. दिल्लीमध्ये मागच्या वर्षी झाडे लावण्याचे कारण देऊन यमुना पात्रातील मुस्लिमबहुल वस्तीला ध्वस्त करण्यात आले.

असे असताना, पर्यावरण संरक्षणाच्या कारणाने घरे तोडणाऱ्या सरकारांचा उद्योगांप्रती असलेला पक्षपातीपणा, आणि ढोंगीपणा मात्र विसरता कामा नये. नुकत्याच जाहीर झालेल्या सरकारी अहवालानुसार मागच्या तीन वर्षांमध्ये देशभरातील 28 हजार 166 उद्योगांनी पर्यावरणविषयक निकषांचे उल्लंघन केले असून त्यात महाराष्ट्रातील 3,402 उद्योगांचा समावेश आहे. कोणत्याच सरकारने या उद्योगांवर आजपर्यंत मोठी कारवाई केलेली नाही. कोरोना काळातसुद्धा सरकारने कामकरी जनतेची घरं तोडण्याच्या कारवायांमध्ये खंड पडू दिला नाही. हरियाणाच्या खोरी गावाला उद्ध्वस्त करून 1 लाख लोकांना रस्त्यावर आणण्याची घटना अजूनही आपल्या मनात ताजी आहे. खोरी गावातील हजारो लोक अजूनही आश्वासित घरांच्या प्रतीक्षेत आहेत. एच.आर.एल.एन.च्या अहवालानुसार मागच्या 5 वर्षांमध्ये देशभरात 10 लाखांपेक्षा जास्त लोकांना घरतोडीचा सामना करावा लागला आहे.

जी-20 परिषदेचे यजमानपद भारताकडे आहे, ज्यात 19 देश आणि युरोपीय संघ सामील झालेले आहेत. ही परिषद यावर्षी देशाच्या 32 शहरांमध्ये आयोजित केली जात आहे. या सर्व शहरांमध्ये सौंदर्यीकरण आणि गरिबी लपवण्याचे जोरदार प्रयत्न राज्य आणि मोदी सरकारद्वारे केले जात आहेत. दिल्लीमध्ये तर मोदी सरकारने क्रूरतेची सीमा ओलांडली. 2023 मध्ये आत्तापर्यंत दिल्ली शहरातून जवळपास 3 लाख लोकांना कुठलीच पर्यायी व्यवस्था न करता बेघर केले गेले. कामकरी जनतेची हजारो घरं आत्तापर्यंत तोडली गेली आहेत. तुघलकाबादमध्ये सर्वात जास्त, म्हणजे 3000 घरं जमीनदोस्त करण्यात आली. दिल्लीमध्ये अजूनही या घटना सुरूच आहेत. विश्वगुरू बनू पाहणाऱ्या मोदी सरकारला देशातल्या गरीब जनतेची एवढी लाज वाटते की अनेक ठिकाणी गरिबी लपवण्यासाठी वस्त्यांभोवती पडदे लावले गेले. गरिबी, महागाई, भूकेकंगालीचे वास्तव जगापासून लपवण्यासाठी कामकरी जनतेला शहरांबाहेर फेकणे हा निरंकुश सरकारांसमोर सर्वात सोईस्कर उपाय आहे. जी-20 परिषदेसाठी घरं उद्ध्वस्त करणे हे या देशात काही नव्याने घडत नाहीये. हॉकी विश्वचषक(भूवनेश्वर), कॉमन वेल्थ गेम्स(दिल्ली), अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांची स्वारी(गुजरात) आणि इतर अनेक आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे यजमानपद भारताकडे होते तेव्हा देखील त्याच्या विस्तवाचा चटका कामगार-कष्टकरी जनतेलाच बसला आहे.

एवढेच कारण नाही तर आता मुस्लिमद्वेष पसरवून राजकारणाच्या पोळ्या भाजणाऱ्या भाजप सरकारांनी मुस्लिमबहुल वसाहतींवर बुलडोझरचा हल्ला करून दहशत पसरवण्याच्या कित्येक घटना मागच्या काही वर्षांमध्ये समोर आलेल्या आहेत. रामनवमी आणि हनुमान जयंतीच्या निमित्ताने हिंदुत्ववादी शक्तींनी घडवून आणलेल्या हिंदू-मुस्लिम दंगलीनंतर लगेच दुसऱ्या दिवशी भाजप शासित मध्य प्रदेश, गुजरात आणि दिल्ली येथे मुस्लिम जनतेची घरं आणि दुकानं अतिक्रमणाच्या नावाखाली तोडली गेली. यासारख्याच घटना अलाहाबाद आणि सहारनपूर येथे सुद्धा समोर आल्या आहेत. बुलडोझरची भीती दाखवून मुस्लिम जनतेवर अत्याचार करण्यासाठी हिंदुत्ववाद्यांना मोकळे रान मिळावे म्हणून ही नवी रणनीती संघ परिवार वापरत आहे. परंतु, अतिक्रमणाच्या नावाखाली कामकरी जनतेच्याच घरांची आणि दुकानांची तोडफोड केली जात आहे. लोकशाहीला धाब्यावर बसवून, सर्व कायदे झुगारून भाजप अशाप्रकारे आपल्या दहशतीच्या राज्याला सुद्धा भक्त समर्थकांकडून मान्यता मिळवून घेत आहे.

कामकरी जनतेच्या वसाहती सरकारद्वारे उद्ध्वस्त करण्याच्या घटना देशभरामध्ये अनेक दशकांपासून घडत आहेत. या घटनांच्या विरोधात कोर्टामध्ये गेल्यानंतर बहुतांश खटल्यांमध्ये सरकारच्या बाजूनेच निर्णय दिला जातो. बोटांवर मोजण्या इतक्याच खटल्यांमध्ये वरच्या कोर्टांनी घरं तोडण्यावर स्थगिती आणली आहे. 1980-90 च्या दशकात सर्वोच्च न्यायालयाने, भांडवली व्यवस्थेअंतर्गतच का होईना, मनुष्याभिमुख असे अनेक निर्णय दिले जे कामकरी जनतेच्या बाजूचे होते. 1990च्या शांतिस्तर बिल्डर्स वि. नारायण खिमालाल तोतमे या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने जगण्याच्या अधिकारामध्ये अन्न, वस्त्र, चांगले वातावरण आणि राहण्यायोग्य जागेचा अधिकारसुद्धा समाविष्ट झाला पाहिजे असा निकाल दिला होता. 1996च्या चमेली सिंघ वि. उत्तर प्रदेश सरकार या खटल्यामध्ये निवाऱ्याचा अधिकार हा मूलभूत अधिकार असल्याचा आणि जगण्याच्या अधिकारासोबत त्याला जोडून बघण्याचा निकाल दिला. परंतु, आता सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयांमध्ये गुणात्मक बदल आलेला दिसत आहे. नागरी अधिकारांच्या बहुतांश खटल्यांमध्ये सरकारी बाजूनेच निकाल दिला जात आहे. हरियाणाच्या खोरी गावाच्या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने पर्यावरणाच्या प्रश्नाला जनतेच्या जीवनापेक्षा वरचे स्थान देत असल्याचे म्हणत हजारो घरे तोडण्याचा आदेश दिला.

जीवनाच्या असंख्य असुरक्षिततांमध्ये जगत असतांना किमान आपल्या कुटुंबासोबत एकत्र राहण्याची संधी आणि कामावरून थकून आल्यावर पाठ टेकवण्यासाठी हक्काची जागासुद्धा एक दिवस अचानक हिसकावून घेतली जाते तेव्हा तो अत्यंत मोठा मानसिक धक्का असतो. राहती जागाच गेल्यामुळे नवीन जागी विस्थापन केल्याशिवाय दुसरा पर्याय लोकांसमोर नसतो. त्यामुळे आधीच्या जागेभोवती असणारी कामं सुटतात. अनेक मुलांना शाळासुद्धा सोडावी लागते. काम करत करत राहण्यासाठी नवीन जागा शोधावी लागते. अशावेळी अनेक दिवस रस्त्यावर रहावे लागते. नवीन ठिकाणी विस्थापित झाल्यानंतर राहत्या जागेजवळ काम मिळवण्यासाठी धडपड करावी लागते. बहुतांश वेळा जुन्या कामाच्या ठिकाणी जाण्यासाठी प्रवासाचा खर्च वाढतो. आयुष्य विस्कळीत करणारा हा अनुभव असतो असे अनेक पीडितांनी पत्रकारांशी बोलतांना सांगितले आहे.

गावांमधून आणि छोट्या शहरांमधून काम मिळण्याच्या आशेने लाखो लोक दरवर्षी मोठ्या शहरांमध्ये विस्थापित होत असतात. शहरांमध्ये आल्यानंतर मिळेल ते काम घेऊन सरकारी जागांवर झोपडपट्टी वसवून राहात असतात. आर्थिक कुवत नसल्यामुळे त्यांना मुलभूत सुविधांचा अभाव असणाऱ्या, अस्वच्छ वस्त्यांमध्ये खुराड्यांसारखी कोंदट घरं उभारून अमानवीय स्थितीमध्ये रहावे लागते. देशातील कामकरी जनता आधीच महागाई आणि बेरोजगारीने त्रस्त आहे. सोबतच, भांडवलशाहीने निर्माण केलेले हवामान बदलामुळे येणाऱ्या संकटांचा, म्हणजेच अतिवृष्टी, दुष्काळ, वादळ, पूर यांचा फटका कामकरी जनतेलाच सर्वात जास्त बसत आहे. जगण्याचा एकेक एक मार्ग दिवसागणिक बंद होत असताना त्यात भर म्हणून सरकार आता कामगार-कष्टकरी जनतेने रक्ताचे पाणी करून अत्यंत चिकाटीने बचत करून उभा केलेला निवारासुद्धा त्यांच्या हातातून हिसकावून घेत आहे.

# देवनार डम्पिंग ग्राऊंड : मानखुर्द-गोवंडी मध्ये आरोग्य, प्रदूषणासह नारकीय जीवनाचा अभिशाप

**पान 11 वरून**

बायोवेस्ट प्लांट अजून देखील बंद करण्यात आला नाही. महाविकास आघाडी सरकार सत्तेत असताना तत्कालीन पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांनी देवनार डम्पिंग ग्राउंड बंद करण्यासाठी लवकरच कृती आराखडा आखून काम सुरू करत उच्च न्यायालयाच्या निर्देशाचे पालन केले जाईल असे सांगितले होते; परंतु परिस्थिती काहीही बदललेली नाही. असेच आश्वासन त्यांनी बायोवेस्ट प्लांट बद्दल देत सांगितले गेले होते की, 2022 पर्यंत शहराच्या बाहेर जागा शोधून बायोवेस्ट प्लांट मानखुर्द-गोवंडी येथून बंद करून स्थलांतरित केला जाईल. त्यावर देखील काहीच काम झालेले नाही.

मानखुर्द-शिवाजीनगर विधानसभा मतदार संघातून समाजवादी पक्षाचे अबू आजमी हे तिसऱ्यांदा आमदार म्हणून निवडून गेले आहेत. एक आमदार आणि सहा नगरसेवक असतांना देखील समाजवादी पक्षाकडून देवनार डम्पिंग ग्राउंड आणि बायोवेस्ट प्लांट बंद करण्यासाठी निर्णायक मोहीम छेडून कधीच संघर्ष उभा केला नाही. समाजवादी पक्षाच्या वतीने आमदार अबू आजमी आणि त्यांच्या सहा नगरसेवक यांनी केलेला विरोध हा फक्त वर्तमानपत्रात आणि वृत्त वाहिन्यांवर प्रसिद्धी मिळवण्यासाठी, 'बोलाची कढी, बोलाचा भात' यापलीकडे नसतो, हे दिसून आले आहे.

अशात वारंवार निवडून जात असलेले लोकप्रतिनिधी खासदार, आमदार, नगरसेवक देवनार डम्पिंग ग्राउंड आणि बायोवेस्ट प्लांट बंद करण्याच्या मुद्द्यावर आणि मतदार संघातील रहिवाशांना पायाभूत नागरी सुविधा मिळवून देण्याच्या जबाबदारीत सपशेल अपयशी ठरले आहेत. या विनाशकारी प्रकल्पांद्वारे स्थानिक रहिवाशांच्या आरोग्य आणि आयुष्याशी खेळले जात आहे.

# देवनार डम्पिंग ग्राऊंड : मानखुर्द-गोवंडी मध्ये आरोग्य, प्रदूषणासह नारकीय जीवनाचा अभिशाप

✎ बबन

देशातील सर्वात जुने आणि सर्वात मोठे डम्पिंग ग्राउंड म्हणून मुंबईतील देवनार डम्पिंग ग्राउंडची कुख्याती आहे. मुंबईतील वाढती लोकसंख्या आणि शहरीकरणाचा वाढता विस्तार लक्षात घेऊन पूर्वी कुर्ला भागात जमा होत असलेला कचरा शहराच्या बाहेर टाकण्याच्या हेतूने स्वातंत्र्यपूर्व वसाहतकाळात 1927 साली देवनार डम्पिंग ग्राउंडची स्थापना करण्यात आली होती. पुढे स्वातंत्र्यानंतरच्या काही दशकात मुंबई शहर काळाच्या ओघात जसजसे विस्तारत गेले तशतशा जागांच्या किंमती वाढत गेल्या. कुर्ला शेजारील भागात तेल शुद्धीकरणाचे कारखाने, खतनिर्मिती कारखाने आणि कामगारांच्या राहण्याच्या इमारती उभ्या राहायला सुरुवात झाली. रेल्वे आणि रस्ते मार्ग विस्तारित करण्यात आले. तसेच अनेक झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करण्यात आले व काही नवीन झोपडपट्ट्या उदयास आल्या. त्याचाच भाग म्हणून मानखुर्द-गोवंडी भागात मोठ्या प्रमाणात लोकसंख्येचे वास्तव्य होण्यास सुरुवात झाली. या भागाची लोकसंख्या आता 12 लाखापेक्षा जास्त आणि मुंबईची एकूण लोकसंख्या 1 कोटी 24 लाखापेक्षा जास्त झाली आहे. गेली अनेक दशके मुंबईत ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात स्थलांतरित प्रवासी कामगारांचे लोंढे येते गेलेत. पूर्ण मुंबईला कष्टाने चमकवणारे व मुंबईच्या घडणीत सिंहाचा वाटा असलेले कामगार मात्र शहराच्या बकाल झोपडपट्टी वस्त्यांमध्ये राहण्यास मजबूर आहेत. डंपिंग ग्राउंडच्या आजूबाजूच्या झोपडपट्ट्या, मुंबईतील सर्वात स्वस्त पण बकाल राहण्याचे पर्याय उपलब्ध करून देतात. त्यामुळे अनेक स्थलांतरित विशेषत: दलित, मुस्लिम अल्पसंख्यांक आणि उत्तर भारतीय कामगारांसह मोठ्या प्रमाणात गरीब प्रवासी कामगारांची संख्या या झोपडपट्ट्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येते. मुंबईच्या परीघावर मानखुर्द-गोवंडी झोपडपट्टी उभी राहिली. आज या नागरी झोपडपट्टीला लागूनच 134 हेक्टर जागेवर असलेल्या देवनार डम्पिंग ग्राउंडवर मुंबई शहराचा 9,000 मेट्रिक टन कचरा रोज कोणतीही प्रक्रिया न करता टाकला जातो. अगोदरच नागरी सुविधांच्या अभावामुळे त्रस्त असलेल्या या झोपडपट्ट्यांना डम्पिंग ग्राउंडमुळे एक ना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

## नागरी सुविधांच्या अभावात मानखुर्द-गोवंडी

आशिया खंडातील सर्वात मोठी झोपडपट्टी म्हणून अगोदर धारावीकडे पहिले जात होते पण आता धारावी बरोबर मानखुर्द-गोवंडी, कुर्ला, घाटकोपर, भांडूप, विक्रोळी अशा अनेक झोपडपट्ट्या उदयास आल्या आहेत. मानखुर्द-गोवंडी ही झोपडपट्टी प्रामुख्याने 1970-80 पासून प्लास्टिक, कचरा आणि पत्र्याच्या घरात उदयास आलेली झोपडपट्टी म्हणून सर्वदूर परिचित आहे. इथे राहणारे लोक प्रामुख्याने बांधकाम, खाजगी आस्थापनात व महानगरपालिकेत साफसफाईचे काम, हाऊसकीपिंग, कचरा उचलणे, खाजगी ऑफिस मध्ये अंगमेहनतीची कामे करणे, रिक्षा चालवणे, घरात बसून पीस रेट वर काम करणे तसेच शिलाई व विणकाम करणे, ड्रेसला लेस, डिझाईन लावणे, जरीचे काम करणे(ज्यातून



डोळ्याचे आजार होण्याच्या खूप जास्त शक्यता असतात), छोट्या-मोठ्या गाड्या चालवणे, मार्केटिंग मध्ये फिल्डवर काम करणे, डिलिव्हरी बॉय आणि इतर सेवा क्षेत्रात कामे करणे, फेरीवाले म्हणून पूर्ण मुंबईभर फिरून काम करणे, छोट्या कारखान्यात काम करणे, छोटे-छोटे असंख्य व्यवसाय करणे, उदरनिर्वाहासाठी कचरा वेचणे अशी कामे करतात. प्रचंड घाणीत हे काम असल्यामुळे आरोग्याच्या गंभीर समस्या उभ्या राहतात. एकंदरीतच पूर्ण मुंबईला लागणारा तिसऱ्या आणि चौथ्या श्रेणीचा कामगार पुरवणारी झोपडपट्टी म्हणून मानखुर्द-गोवंडी ओळखली जाते. इथे महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून आणि उत्तर भारतातून प्रवासी कामगार म्हणून आलेल्या आणि आता इथेच स्थायिक झालेल्या कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. काही सर्वेक्षणात दिसून आले आहे की, डम्पिंग ग्राऊंडजवळील झोपडपट्ट्यात वर्षानुवर्ष राहत असलेल्या रहिवाशांपैकी 37 टक्के रहिवाशांचे नाव अजून देखील मतदार यादीत घेण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांना पुरेशा नागरिक सुविधा देणे महानगरपालिका स्वत:ची जबाबदारीच समजत नाही.

महानगरपालिकेचा एम-पूर्व विभाग हा कामगार-कष्टकरी लोक वास्तव्यास असलेला मोठी झोपडपट्टी म्हणून पाहिला जातो. हा भाग नागरी सुविधांपासून नेहमीच वंचित राहिला आहे. गटार, नाले, चेंबर, पिण्याच्या पाण्याच्या समस्या, विजेची समस्या, सार्वजनिक शौचालय, रस्ते, खेळायची मैदाने, गार्डन, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा अनेक बाबीमध्ये मनपा नेहमीच मानखुर्द-गोवंडीवासीयांच्या तोंडाला पाने पुसत आली आहे. यामुळे मुंबई महानगरपालिकेतील एकूण 24 विभागातील सर्वात ढिसाळ कारभार असलेला विभाग म्हणून एम-पूर्व विभागाची ख्याती आहे.

## डम्पिंग ग्राउंडमुळे उद्भवत आहेत आरोग्याच्या समस्या

मानखुर्द-गोवंडी या झोपडपट्टी भागात आरोग्याची समस्या मोठे विकराळ रूप घेत आहे. त्यात अनेक प्रमुख कारणांपैकी एक प्रमुख कारण देवनार डम्पिंग ग्राउंड आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमधून निघणाऱ्या घातक वायूंमुळे दमा श्वसन आणि त्वचेचे आजार होत आहेत. तर दाटीवाटीने व कोंदट भागात राहत असल्यामुळे अनेकांना टीबी होत असल्याचे मत डॉक्टरांनी अनेक वेळेस नोंदवले आहे. मुंबईत अंदाजे एकूण पन्नास हजारापेक्षा जास्त टीबीचे रुग्ण आहेत त्यात मानखुर्द गोवंडी मधील रुग्णांच्या संख्येचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात आहे. सोबतच डम्पिंग ग्राउंड व गटार नाल्यामुळे पूर्ण भागात घाणीचे साम्राज्य पसरलेले आहे. ज्यामुळे क्षयरोग, दमा, अस्थमा, डेंगू, मलेरिया या सारख्या आजारांनी नागरिकांना ग्रासले आहे. 10 ते 12 लाख लोकवस्ती असलेल्या भागात एकही मोठे दर्जेदार रुग्णालय नाही त्यामुळे अनेकांना उपचाराच्या अभावाने मृत्यूला देखील कवटाळावे लागते.

डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकण्यात येणारा कचरा कोणत्याही प्रकारचे पृथक्करण न करता टाकण्यात येतो. जैव-विघटनशील कचऱ्याबरोबर प्लास्टिक आणि जैव-वैद्यकीय कचरा मिसळून सडत असल्यामुळे मिथेन हा विषारी ज्वलनशील वायू तयार होतो व त्यामुळे लहान मोठ्या आगी लागण्याच्या घटना नियमित होत असतात. त्यामुळे संपूर्ण भागात मोठ्या प्रमाणात कार्बन मोनोऑक्साईड सारख्या विषारी धुराचा आणि काजळीचा वेढा बसतो. सोबतच जळणाऱ्या कचऱ्यातून निघणाऱ्या विषारी द्रव्यामुळे हृदय व रक्त वाहिन्यांचे आजार, फुफ्फुसाचे आजार, कर्करोग व जन्मजात समस्यांसह गंभीर आजार होण्याच्या दाट शक्यतांचा इशारा डॉक्टरांनी वेळोवेळी दिला आहे. अशा घातक विषारी वायूचा प्रसार देवनार, शिवाजीनगर, टिळकनगर, रमाबाई आंबेडकर नगर, मानखुर्द-गोवंडी, चेंबूर सह घाटकोपरपर्यंत होत असतो.

## देवनार डम्पिंग ग्राउंड बंद होण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाकडून होत आहेत फक्त वल्गना!

डम्पिंग ग्राउंडच्या आगीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्यांना लक्षात घेऊन मुंबई उच्च न्यायालयाने 1996 साली लोकांच्या मुलभूत जगण्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी डम्पिंग ग्राउंड अंशतः बंद करण्याचे निर्देश पालिकेला दिले होते. त्यांनतर त्यावर पुढे कधीच गांभीर्याने काम झाले नाही. पुढे नागरिकांच्या अनेक तक्रारींनंतर आणि एका जनहित याचिकेमुळे 2003 मध्ये पुन्हा न्यायालयाने असेच आदेश दिले ते सुद्धा तसेच राहिले. पुढील वर्षात अनेक तक्रारी, जनहित याचिका आणि अनेक नागरिक संस्थांनी मोहिमा चालवल्यानंतर महानगरपालिकेने शास्त्रोक्त पद्धतीने डम्पिंग बंद करण्यासाठी अनेक वेळेस कोटीच्या घरात बजेट जाहीर केले पण परिस्थिती जैसे थे असल्याचे दिसून येते.

पुढे 2009 मध्ये एका याचिकेवर सुनवाई दरम्यान मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अभय ओका आणि रियाज छागला यांच्या खंडपीठाने स्पष्ट करत सांगितले होते की, "राज्य सरकारने पुढील दोन महिन्यात पर्यायी जागा शोधावी. सॉलिड वेस्ट व्यवस्थापन नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे ही सरकारची जबाबदारी आहे. तसेच देवनार डम्पिंग ग्राउंडमध्ये 7000 ते 9000 हजार मेट्रिक टन कचरा बेकायदेशीर टाकण्यात येत आहे, परंतु केवळ 3000 हजार मेट्रिक टन कचरा व्यवस्थापन प्रकल्पात वापरला जातो. सध्या डम्पिंग ग्राउंड परिसरात कचऱ्यामुळे होत असलेल्या प्रदुषणामुळे स्थानिक लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे."

2016 मध्ये मुंबई उच्च न्यायालयाने "देवनार डम्पिंग ग्राउंड कायमचे बंद करून पर्यायी जागा शोधल्या जाव्यात." असे स्पष्ट निर्देश देऊन देखील महानगरपालिकेने कोणतीच ठोस पावले उचलली नाहीत व उलट अजून थोडा वेळ देण्यात यावा असे सांगत मुदतवाढ घेतली जी 2017 पर्यंत होती. परंतु पुन्हा एकदा सरकार पर्यायी जमीन शोधण्यात अयशस्वी ठरल्यामुळे पुन्हा ही मुदत डिसेंबर 2019 पर्यंत वाढवण्यात आली.

पुढे कोरोना महामारीचे कारण सांगून पुन्हा वेळ वाढवून मागण्यात आली आहे. ही मुदतवाढ अजून देखील सुरूच आहे. मुंबई उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीच्या सदस्याने स्वत: दुजोरा दिला की शहरातील या सर्वात मोठ्या लँडफिलची स्थिती सुधारण्यासाठी कोणत्याही महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. खर तर डम्पिंग ग्राउंडची क्षमता संपली असतांना देखील वेळोवेळी मुदतवाढ मागून प्रत्येक दिवसाला 9000 हजार मेट्रिक टन कचरा डम्पिंग ग्राउंडमध्ये टाकणे हे बेकायदेशीर व लोकांच्या आरोग्याशी आणि जीवाशी खेळल्यासारखे असतांना देखील मुंबई उच्च न्यायालयाने कठोर कारवाई केलेली नाही!

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ढिसाळ कारभाराची किमंत चुकवत आहे जनता

दरवर्षी बीएमसीच्या अर्थसंकल्पात शहरातील कचरा व्यवस्थापनाचा चेहरामोहरा बदलण्याच्या "महत्त्वाकांक्षी" योजनांची घोषणा केली जाते पण अशा एक ना अनेक योजना अजूनही सरकारी कार्यालयात धूळ खात पडून आहेत. एकीकडे जनतेला पायाभूत नागरी सुविधा देण्यात पालिका अपयशी ठरली आहे, तर दुसरीकडे डम्पिंग ग्राऊंडवरील कचरा व्यवस्थापनासाठी प्रत्येक वर्षी कोटीचे बजेट जाहीर केले जाते, पण जमिनीवर काहीच काम होताना नागरिकांना दिसत नाही.

मुंबई उच्च न्यायालयाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला देवनार डम्पिंग ग्राउंड बंद करण्यास सांगितल्यानंतर 30 मीटर कचऱ्याच्या ढिगाऱ्यांची उंची असलेल्या कचऱ्यापासून उर्जा तयार करण्यासाठीच्या, मागील सात वर्षांपासून रेंगाळत पडलेल्या, 'कचरा ते ऊर्जा' प्रकल्पाला अंतिम रूप दिले जाईल असे सांगितले जात आहे. प्लांट पूर्णपणे उभारला जाईल तेव्हाच कचऱ्याच्या पुढील डंपिंगसाठी मैदान अंदाजे 2025 पर्यंत बंद केले जाईल अशा सांगितले जात आहे. म्हणजे नजिकच्या काळात अलीकडे देवनार डम्पिंग ग्राउंड बंद होण्याच्या कोणत्याही शक्यता दिसत नाहीत.

## भांडवली निवडणूकबाज राजकीय पक्षांच्या भूमिका आणि राजकीय इच्छाशक्तीचा अभाव

देवनार डम्पिंग ग्राउंड आणि बायोवेस्ट प्लांट बंद करण्यासाठी सर्वच निवडणूकबाज पक्षांकडून प्रत्येक निवडणुकीत घोषणा केल्या जातात. मागील तीन वेळेपासून लोकसभेच्या उत्तर-पूर्व मतदार संघातून भाजपचे खासदार निवडून जात आहेत परंतु 10 ते 12 लाख लोकसंख्या राहत असलेल्या मतदार रहिवाशांना धूर, प्रदूषण आणि आरोग्याच्या समस्यांसहित मरायला सोडून दिले आहे. 2019 च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत उत्तर-पूर्व मुंबईमधून भाजपचे उमेदवार असलेले आणि निवडून खासदार झालेले मनोज कोटक यांनी आपल्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात वचन दिले आहे की, "निवडून आल्यास, मी देवनार डम्पिंग ग्राउंड बंद होईल याची हमी देतो" परंतु निवडून आल्यावर खासदार मनोज कोटक यांनी कोणतेही काम तर केले नाही उलट चकार शब्दाने देखील विरोध सुद्धा केला नाही.

शिवसेनेची मागील कित्येक दशकापासून बृहन्मुंबई महानगरपालिकेवर एकहाती सत्ता असतांना देखील देवनार डम्पिंग ग्राउंड आणि

पान 10 वर

## लव्ह जिहादचे षडयंत्र हाणून पाडले!

पान 9 वरून

लंपट वर्ग आहे जो कामगार वर्गातून असला तरी तो कामगार वर्गापासून पूर्णतः कटलेला असतो आणि पैशासाठी अपराध करायला सुद्धा तो तयारच असतो. मानवतेच्या सर्व शर्ती ह्या वर्गाने गमावलेल्या असल्याने कितीही घृणीत कृत्ये करताना ह्यांना कसलीही लाज नसते. अशामध्ये स्त्रीकडे बघण्याचा उपभोगवादी दृष्टीकोन पसरवणारी व्यवस्था रोजच काम करत आहे. नफेखोर भांडवली व्यवस्थेत प्रत्येक वस्तूची निर्मिती नफ्यासाठी होते. स्त्रीदेह, मानवी नाती ह्यांचेसुद्धा बाजारीकरण ह्या व्यवस्थेत केले जाते. स्त्रीला माणूस म्हणून न बघता वस्तू म्हणून बघणे, स्त्रीदेहाला उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहणे याचा प्रचार रोजच जाहिराती, दर्जाहीन सिनेमे या माध्यमातून बाजाराची व्यवस्था करत असते, आणि यातून निर्माण झालेल्या मानसिकतेतूनच एखाद्या वापरलेल्या वस्तूप्रमाणे स्त्रिची विल्हेवाट लावण्यासारखे अमानवीय कृत्य क्षुल्लक वाटू लागते.

यात भर म्हणून 2014 पासून संघ भाजपचे मोदी सरकार सत्तेत आल्यापासून स्त्रिविरोधी अपराधांना जणू पुर आला आहे. भाजपा हा एक असा पक्ष आहे ज्यात केंद्रात बसलेल्या मंत्र्यांपैकी, आमदार/खासदारांपैकी 40 टक्क्यांपेक्षा जास्त मंत्र्यांवर बलात्कार, हत्यांसारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. अलीकडचीच काही उदाहरणे हे स्पष्ट करतील. 2002 गोध्रा हत्याकांडामधील सामूहिक बलात्कार पीडिता बिल्कीस बानोच्या गुन्हेगारांची जन्मठेपेची शिक्षा पूर्ण होण्याआधीच गुन्ह्यातून मुक्तता केली आणि तुरुंगातून बाहेर आल्यावर त्यांचा हार-तुरे देऊन सत्कार केला गेला. स्वामी चिन्मयानंद आणि हाथरस घटनेतील बलात्कारांच्या समर्थनार्थ यात्रा काढण्यात आल्या. 40 पेक्षा जास्त पहिलवानांवर लैंगिक अत्याचाराचे गुन्हे असलेल्या ब्रिजभूषण सिंहसारख्या खासदाराला अजूनही अटक झालेली नाही! मणिपूरमध्ये दोन महिलांची नग्न धिंड काढली गेल्याचे अमानवियतेची हद्द गाठणारे कृत्य देखील ह्याच सत्ताधाऱ्यांच्या काळात घडले! उदाहरणांची कमी नाहीच. 'बेटी बचाव बेटी पढाव' नारा देणाऱ्या सत्ताधाऱ्यांचे महिलाविरोधी चरित्र ओळखायला वरील उदाहरणे पुरेशी आहेत. अशामध्ये शाहबाद डेअरी मधील साक्षीच्या हत्येला दिला गेलेला धार्मिक रंग देखील हेच स्पष्ट करतो की वाढते महिला अत्याचार रोखणे नाही, तर ह्या घटना वाढून जनतेत धार्मिक अस्मिता कशा भडकावता येतील आणि त्याआधारे जनतेला विभागून राज्य कसे करता येईल हे भाजपचे उद्दिष्ट आहे. सत्तेचेच समर्थन असताना स्त्रिविरोधी अत्याचार वाढणार नाहीत तर काय?

हे सुद्धा लक्षात घेतले पाहिजे की 'लव्ह जिहाद' हे एक थोतांड आहे, सतत सांगून खरे भासवले गेलेले एक धादांत असत्य आहे. मुस्लिम समुदायाकडून नियोजनबद्ध पद्धतीने हिंदू मुलींना फसवून लग्नाच्या जाळ्यात ओढण्याचे षडयंत्र केले जात आहे, ही बाब सर्वथा खोटी आहे. केरळ, कर्नाटक सारख्या राज्यांमध्ये पोलिस तपास, एन.आय.ए. चे तपास यांमध्ये स्पष्टपणे समोर आले आहे की असे कोणतेही षडयंत्र अस्तित्वात नाही. गृहमंत्रालयाने सुद्धा लव्ह जिहाद नावाचे काही अस्तित्वात नाही असे कबुल केले आहे. परंतु एक असत्य अनेक वेळेस सांगून त्याला सत्य बनवण्याच्या हिटलर काळातील गोयबेल्स नितीचा वापर करून लव्ह जिहादचा खोटा प्रचार हिंदुत्ववादी करत आलेत, जेणेकरून कामगार कष्टकरी जनता जाती धर्माच्या नावावर एकमेकांचा द्वेष करेल आणि जगण्यासाठीचे खरे प्रश्न, जे पूर्ण करण्यात सरकार अपयशी ठरले आहे, त्यापासून जनतेला दूर ठेवता येईल.

शहाबाद डेअरीच्या प्रकरणातून हे समजून घ्यावे लागेल की जाती-धर्म बाजूला ठेवून बनलेल्या व्यापक कामगार-कष्टकरी जनतेच्या एकजुटीशिवाय खोटा प्रचार हाणून पाडणे शक्य नव्हते. योग्य क्रांतिकारी कामगार वर्गीय विचारांचा प्रचार करूनच, कामगार कष्टकरी जनतेची व्यापक एकजूट करूनच, फॅशिझमला हरवले जाऊ शकते आणि हिंदुत्ववाद्यांचा प्रचार हाणून पाडला जाऊ शकतो, हे समजून आपल्याला त्या दिशेने मार्गक्रमण करावे लागेल.

## खाजगी सेना: भांडवली राज्यसत्तांचा आणि साम्राज्यवादी गटांचा क्रूर व भेसूर चेहरा

पान 1 वरून

घटना नाही. वॅगनर ग्रुपच्या स्थापनेच्या कित्येक वर्ष आधीपासून युरोप-अमेरिकेत विविध संस्था, कंत्राटदार अस्तित्वात आलेले होते. 'आउटलूक' मधील एका लेखानुसार 1996 साली अमेरिकन नौदलाच्या माजी अधिकारी एरिक प्रिन्सने **'ब्लॅक वॉटर्स' नावाने एक खाजगी सेना उभी केली जी आज 'कॉन्स्टेलीस होल्डिंग' किंवा 'अकॅडमी' नावाने ओळखली जाते आहे.** ही कंपनी अमेरिकन सरकारसोबत सुरक्षा सेवेचे करार करते. 'ब्लॅक वॉटर्स' अमेरिकेतील आपल्या मानवाधिकार विरोधी कारवायांसोबतच 2003 ते 2011 ह्या प्रदीर्घ काळ चाललेल्या इराक-अमेरिका युद्धातील सक्रियतेसाठी प्रसिद्ध आहे. ह्या काळात खुद्द अमेरिकन सरकार आणि सी.आय.ए.कडून खूप मोठी कंत्राटं ह्यांना दिली गेली. ह्या खाजगी सैन्यानी अमेरिकेसाठी इराकमध्ये युद्ध लढले. ह्यांनी **केलेल्या मानव अधिकारांच्या गळचेपीची आणि गुन्हेगारी कृत्यांची एक मोठी शृंखलाच आहे ज्यातील इराक मधील 'निसौर चौक हत्याकांड' फार कुप्रसिद्ध आहे,** ज्यात 'ब्लॅक वॉटर्स' सैनिकांचा गाडी थांबवण्याचा आदेश मानला नाही म्हणून सामान्य नागरिकांवर गोळ्या झाडल्या गेल्या. ह्या गोळीबारात 17 सामान्य इराकी नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता आणि 20 लोक गंभीररित्या जखमी झाले होते. अशा अनेक कंपन्या ह्याच कालावधीत इराक मध्ये काम करत होत्या ज्यात 2001मध्ये अस्तित्वात आलेली 'ओलीव्ह ग्रुप' नावाची खाजगी सेना 2003 पासून इराक मधील तेल खाणींच्या "सुरक्षिततेसाठी" सक्रिय आहे. इंडिया टुडेच्या एका रिपोर्टनुसार **2010ला अमेरिकेकडून इराक आणि अफगाणिस्तान युद्धात 2.6 लाख पेक्षा जास्त खाजगी कंत्राटी सैनिकांनी काम केले.**

**जी.4एस.सुरक्षा कंपनी ही इंग्लंडची जगातील सर्वात मोठ्या खाजगी सैन्यांपैकी एक आहे. हॅरी लेगे-बुर्के हा ब्रिटिश उद्योगपती ह्या कंपनीचा मालक आहे.** ह्या कंपनीकडे 2021च्या माहितीनुसार 5,33,000 लष्करी आणि निमलष्करी प्रशिक्षण झालेले सैनिक आहेत. ही कंपनी मोठ्या प्रमाणात 'सुरक्षेची' सेवा देण्याची कंत्राटे घेते. जी.4 एस.सारख्या कंपन्या जेल, डिटेन्शन सेंटर सुद्धा चालवतात. ह्या कंपन्या जेलमधील स्थानबद्ध असणाऱ्या विस्थापित प्रवाशांना जेलच्या सेवा पुरवण्यासाठीचे अत्यंत स्वस्त कामगार म्हणून वापरतात आणि आपला नफा वाढवतात हे वास्तव अनेक विस्थापित कामगारांनी समोर आणलेले आहे.

रशियात वॅगनर ग्रुपची चर्चा 2014ला सुरु झाली ज्यावेळी रशियाने क्रायमीया आपल्या ताब्यात घेतले. 2014ला क्रायमीया मधील रशियाला अनुकूल असणाऱ्या शक्तींनी युक्रेन सरकारच्या विरोधात आंदोलन सुरू केले ज्यात रशियाने अप्रत्यक्षरित्या वॅगनर ग्रुपचा वापर करून युक्रेनचा क्रायमीया प्रदेश रशियात सामील करून घेतला. **ह्या वॅगनर ग्रुपचा संस्थापक येवजेनी प्रिगोझीन हा स्वतः गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेला मोठा उद्योगपती आहे.** 1990 च्या सुमारास हॉटेलिंग पासून त्याने व्यवसायाची सुरवात केली आणि लवकरच तो रशियाचे सत्ताकेंद्र असलेल्या क्रेमलिनचा खाद्य कंत्राटदार आणि पुतीनचा निकटवर्तीय बनला. पुढे 2014 ला वॅगनर ग्रुपची स्थापना झाली. **त्यानंतर ह्या सैन्याने रशियाच्या बाजूने सीरिया, दक्षिण सुदान यादवी युद्ध, लिबीयन यादवी युद्ध, वेनेझुएला राष्ट्राध्यक्ष संकट प्रसंग, माली युद्ध अशा अनेक ठिकाणी आणि विशेषतः आफ्रिका आणि मध्य पूर्वेत रशियन हितांच्या रक्षणार्थ वॅगनर ग्रुपचा मोठ्या प्रमाणात वापर झाला. नुकत्याच नायजर मध्ये झालेल्या सत्तापालटाच्या सैनिकी बंडामध्ये सुद्धा वॅगनर ग्रुपचे सैनिक सहभागी आहेत.** युक्रेन रशिया युद्धात तर जवळपास 50,000 पेक्षा मोठा फौज फाटा ह्या खाजगी सैन्य ग्रुपने वापरला आहे.

जगभरात आणि विशेषतः विकसित भांडवली देशांत अशा अनेक खाजगी सैन्य कंपन्या वाढत आहेत. युरोपात विक्व्युअल ब्रदर्स, अथोल हायलँडर्स, जर्मन फ्रेईकोर्प्स, रशियातील कद्यरोवत्स्की, तुर्कस्थानातील सादत, अमेरिकेतील ब्लॅकवॉटर, ट्रिपल कॅनोपी, डायन इंटरनॅशनल, दक्षिण आफ्रिकेतील एक्झिक्युटिव आऊटकम्स, रशियातील वॅगनर अशा अनेक कंपन्यांत मोठया प्रमाणात सरकारी सेवेतून निवृत्त झालेले किंवा काढून टाकले गेलेले अधिकारी, सैनिक तसेच गुप्तचर यंत्रणेची माणसं गलेलठ्ठ पगारावर भरती केले जातात. मात्र लढण्यासाठी लंपट सर्वहारा वर्गाचा अ-मानुषीकृत आणि गुन्हेगारी पार्श्वभूमीचा एक हिस्सा, तसेच अत्यंत गरीब परिस्थितीत जगणारी सामान्य कष्टकरी जनतेची मुलं सुद्धा भरती करवून घेतली जातात. ह्यांनाच खऱ्या संघर्षात मोठ्या प्रमाणात तोफेच्या तोंडी देण्याचे काम केले जाते.

अशा अनेक कंपन्या घोषितरित्या व्यक्तींना किंवा व्यवसायाला असलेल्या 'संभाव्य धोक्यांचे' विश्लेषण सुद्धा करतात व त्यानुसार त्या विविध प्रकारच्या सेवा पुरवतात, जसे की व्यक्तींचे संरक्षण किंवा कंपन्यांचे संरक्षण. अनेक कंपन्या भांडवलदारांना तसेच तथाकथित अति महत्त्वाच्या व्यक्तींना, त्यांच्या संपत्तीला सुरक्षा पुरवण्याचे काम करतात. **पैशांची ने-आण करणे, माणसांना एका जागेवरून दुसरीकडे हलवणे, युद्धामध्ये बेकायदेशीर सैन्य म्हणून काम करणे, शस्त्रास्त्रांच्या काळ्या धंद्यांना घडवून आणणे, खून करणे, संपत्तीवर कब्जा करणे व हटवणे, अपहरण करणे, बंड घडवणे, सरकारांचा सत्तापालट करणे, अशा अनेक कामांमध्ये या खाजगी सैन्य कंपन्यांचा वापर जगभरातील सत्ताधारी, खाजगी कंपन्या, श्रीमंत लोक, गुन्हेगार, इत्यादी करवत असतात.**

पण देशाचे सैन्य असताना, पोलीस असताना सुद्धा, मालकवर्गाचा भाग असलेले हे अति महत्त्वाचे लोक एवढे असुरक्षित का असतात? भांडवली समाजात मालक वर्ग एकंदर लोकसंख्येचा अत्यंत छोटा हिस्सा आहे. परंतु तो बहुसंख्य कामगार कष्टकऱ्यांना लुटतो. तो अभाव, अंगतोड परिश्रम, दुःख व दैन्य ह्याने पिडलेल्या असंख्य कामगार कष्टकऱ्यांच्या ज्वालामुखीच्या तोंडावर बसून चैन करतो आहे. मालक वर्ग आपल्या विशेषाधिकारास कारणीभूत असलेल्या खाजगी मालकीच्या रक्षणासाठी अत्यंत चिवटपणे लढतो. कामगार वर्गासोबतच्या संघर्षातून अन्यायपूर्ण उत्पादन संबंधांना टिकवण्यासाठी बळाच्या वापराची धमकी आणि प्रसंगी बळाच्या वापराची आवश्यकता आणि त्यामुळे संभावणारा प्रतिरोध तसेच वस्तुगतरित्या विस्फोटक अशा सामाजिक स्थितीची जाण ह्यामुळे मालक वर्ग सतत भयगंडाने ग्रसित असतो. पोलिस आणि सैन्यासारख्या दलांमार्फत राज्यसत्ता मालक वर्गाकडील खाजगी मालकी आणि एकंदरीत व्यवस्थेच्या रक्षणार्थ दमनाचे साधन म्हणून काम करतेच; **परंतु भांडवली राज्यसत्तेला भांडवली लोकशाहीच्या तिच्या घोषित संरचनेच्या अंतर्गत काम करून जनसमुदायात आपल्या सत्तेला वैध ठरवण्याचे काम सुद्धा करायचे असते. त्यासाठी विविध कायदेशीर नियंत्रण आणि संतुलन (checks and balances) च्या आवरणाच्या माध्यमातून राज्यसत्तेला आपले काम पार पाडावे लागते.** परंतु संकटांच्या काळात हे आवरण सुद्धा जड होते अशा वेळी एकंदरीत संरचनात्मक थोड्या बहुत बाधांनाही बाजूला सारून नग्नरित्या मालकवर्गाची सेवा करण्यासाठी राज्यसत्तेचे विस्तारित अंग म्हणून खाजगी सैन्य, सैन्य कंत्राटदार, खाजगी गुप्तहेर काम करतात. त्यांच्या माध्यमातून बेकायदेशीर अटक, छळ, खून, ताबा मिळवणे कुठल्याही उत्तरदायित्वाशिवाय करवून घेणे शक्य होते. अनेक कुकृत्य आउटसोर्स करवून स्वतःच्या सत्तेला अजून जास्त वर्चस्वकारी बनवणे शक्य होते. अशा खाजगी सेना बेकायदेशीर असतानाही **त्या अनेक देशांमध्ये खुलेआम काम करताना आहेत, त्यांच्या अस्तित्वावरून कोणतेही आंतरराष्ट्रीय वाद नाहीत, आणि आता तर रशियासारखे देश खुलेपणाने त्यांचे अस्तित्व आणि सहकार्य मान्य करत आहेत,** यातूनच दिसून येते की राष्ट्र-राज्य नावाची कल्पना ही सत्ताधारी वर्गाकरिता फक्त कामगार-कष्टकऱ्यांना वैचारिकरित्या भ्रमित करण्यासाठी हवी असते.

खाजगी सेना कमी खर्चीक आहेत आणि त्यांच्या वापरातून उत्तरदायित्वापासून तोंड फिरवणे शक्य होते, त्यामुळे खाजगी सेना वाढत आहेत. त्यांचा आंतरसाम्राज्यवादी प्रतिस्पर्धेत ह्याच सर्व कारणामुळे वापर वाढतो आहे, आणि त्यासोबत जनतेचे दमन सुद्धा त्याच प्रमाणात वाढत आहे.

# बलात्कारी, महिला-विरोधी अपराध्यांना वाचवण्यात भाजप हिरिरीने पुढे

## ब्रिजभूषण शरण सिंग: भाजपने वाचवलेला अजून एक लैंगिक अपराधी!



✍ शशांक

28 मे रोजी प्रधानमंत्री मोदी नवीन संसद भवनाचे उद्घाटन करत असताना आणि गेल्या 9 वर्षात त्यांच्या सरकारने महिला "सक्षमीकरणासाठी" केलेल्या प्रयत्नांबद्दल बढाई मारत असताना, नवीन संसद भवनाकडे कूच करणाऱ्या अनेक आंदोलक कुस्तीपटूंना दिल्ली पोलिसांनी मारहाण केली आणि ताब्यात घेतले. साक्षी मलिक, विनेश फोगट आणि बजरंग पुनिया या आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार विजेत्या खेळाडूंसह अनेक कुस्तीपटूंनी भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष आणि भाजप खासदार, ब्रिजभूषण शरण सिंह(जे त्यावेळी उद्घाटन समारंभाचा आनंद लुटत होते!) यांच्यावर लावलेल्या लैंगिक छळाच्या गंभीर आरोपांकडे लक्ष वेधण्यासाठी दिल्लीच्या जंतर-मंतरवर एक महिन्याहून अधिक काळ आंदोलन केले होते. आंदोलकांवर धडक कारवाई करत पोलिसांनी जंतर-मंतरवरून त्यांचे तंबू हटवले आणि आंदोलनाची जागा साफ केली. आपल्या लोकशाहीची हीच खरी अवस्था आहे जी मोदींनी संसद उद्घाटन समारंभात सांगितल्याप्रमाणे आपले 'संस्कार', विचार आणि परंपरा आहेत. या निमित्ताने पुन्हा एकदा भाजपचे महिला-विरोधी, गुन्हेगार समर्थक चरित्र समोर आले आहे.

मेडलविजेते कुस्तीपटू यापूर्वी जंतरमंतर येथे निषेध करत जमले होते आणि त्यांनी जानेवारीमध्ये कुस्ती परिषद अध्यक्ष सिंह यांच्यावर अनेक वर्षे कुस्तीपटूंच्या लैंगिक छळाचे आरोप केले होते. विनेशने असेही सांगितले की तिला अध्यक्षांच्या जवळच्या अधिकाऱ्यांकडून जीवे मारले जाण्याच्या धमक्या आल्या होत्या. कुस्तीपटूंनी दावा केला की राष्ट्रीय शिबिरांमध्ये भीतीचे वातावरण आहे आणि काही राष्ट्रीय प्रशिक्षक देखील ब्रिजभूषणच्या वतीने काम करतात. त्यांनी ब्रिजभूषणच्या राजीनाम्याची आणि त्याला अध्यक्षपदावरून काढून टाकण्याची मागणी केली. 23 जानेवारी रोजी, क्रीडा मंत्रालयाने मेरी कोमचे नाव पाच सदस्यीय निरीक्षण समिती (OC)च्या प्रमुख म्हणून दिले होते, जिला चौकशी पूर्ण करण्यासाठी चार आठवड्यांचा कालावधी देण्यात आला होता, परंतु एप्रिलपर्यंत अहवाल पूर्ण झाला नाही. समितीने मंत्रालयाला अहवाल सादर केला तेव्हा तो सार्वजनिक करण्यात आला नाही. पुनिया, विनेश फोगट आणि साक्षी मलिक यांच्यासह कुस्तीपटू 23 एप्रिल रोजी आंदोलनाच्या ठिकाणी परतले. त्यांनी दावा केला की एका अल्पवयीन खेळाडूसह सात महिला कुस्तीपटूंनी सीपी पोलिस स्टेशनमध्ये ब्रिजभूषण शरण सिंग यांच्याविरुद्ध लैंगिक छळाची तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा दिल्ली पोलिस त्याची नोंद करण्यास तयारच नव्हते. निदर्शने तीव्र झाल्यानंतर सुद्धा पोलिसांना एफआयआर नोंदवायला एक आठवडा लागला. एफआयआर नोंदवणाऱ्या खेळाडूंना धक्का बसला जेव्हा त्यांना दिसले की ओव्हरसाइट पॅनेलने ब्रिजभूषणच्या कृतीचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला आहे. भाजप खासदाराच्या संरक्षणासाठी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या व्हिडिओ रेकॉर्डिंगमध्ये छेडछाड करण्यात आल्याचा दावा सर्व तक्रारकर्त्यांनी केला आहे. 28 मे रोजी घडलेल्या घटनांची ही पार्श्वभूमी आहे.

लैंगिक छळाचा एफआयआर नोंदवायला 7 दिवस लागले, पण त्याच दिल्ली पोलिसांनी आंदोलक कुस्तीपटूंवर दंगल, बेकायदेशीर सभा, सार्वजनिक सेवकाला कर्तव्य बजावण्यात अडथळा आणणे, सार्वजनिक सेवकाने जारी केलेल्या आदेशाची अवज्ञा करणे, कर्तव्य बजावताना सार्वजनिक सेवकाला दुखापत करणे इत्यादी गुन्हे दाखल करण्यासाठी 7 तासांपेक्षा कमी वेळ घेतला. हे सरकार आणि विशेषत: आमचे पंतप्रधान, ज्यांनी कुस्तीपटूंचा निषेध हिंसकपणे दडपून टाकला आणि ब्रिजभूषण विरोधात निष्क्रियतेची बाजू निवडली, तेच लोक आहेत ज्यांनी कोणत्याही क्रीडा स्पर्धेत पदके जिंकल्यावर कुस्तीपटूंसोबत फोटोशूट करण्याची संधी कधीही सोडली नाही. दिल्ली पोलिसांनी 15 जून रोजी दोषारोपपत्र भरले, परंतु अल्पवयीन पीडितेने निवेदन परत घेतल्यामुळे त्यातून पॉक्सोचे (अल्पवयीन मुलांच्या लैंगिक छळाचे) आरोप वगळण्यात आले आहेत. कुस्तीपटूंनी दावा केला की तिच्या वडिलांना ब्रिजभूषण आणि त्यांच्या माणसांकडून धमकावण्यात आले होते. ब्रिजभूषण यांच्यविरुद्ध दिल्ली पोलिसांनी आरोपपत्र आयपीसी कलम 354 (महिलेला तिची शालीनता भंग करण्याच्या उद्देशाने मारहाण करणे किंवा गुन्हेगारी बळजबरी करणे), 354ए (लैंगिक छळ), 354डी (पिछा करणे) आणि 506 (गुन्हेगारी धमकी) कलमा अंतर्गत दाखल केले आहे. परंतु, पोलिसांचा अटकेचा आग्रहच नसल्यामुळे दिल्ली न्यायालयाने 20 जुलै रोजी ब्रिजभूषण याला जामीन मंजूर केला. ब्रिजभूषण पुन्हा आपल्या राजकीय आणि गुन्हेगारी शक्तीचा वापर करून केस अधिक प्रभावित करेल असा कुस्तीगिरांचा आरोप आहे. तूर्तास, कुस्तीगिरांनी आंदोलन थांबविले असून त्यांनी 'कोर्टात लढाई सुरूच राहील', असे सांगितले आहे.

### कोण आहे ब्रिजभूषण शरण सिंह आणि तो भाजपसाठी इतका महत्त्वाचा का आहे?

ब्रिजभूषण शरणसिंग याचा पूर्व उत्तर प्रदेशातील काही लोकसभा **मतदारसंघात राजकीय दबदबा, बाहुबल, आर्थिक शक्ती, आणि जातीय प्रभाव** ही ती कारणे आहेत ज्यामुळे भाजपला ब्रिजभूषण सारख्या गुन्हेगारांची गरज आहे. बाबरी मशीद विध्वंस प्रकरणातील आरोपी असल्याने सिंग यांना "राम भक्त" हा टॅग मिळाला आणि 2008 ते 2014 या काळात समाजवादी पक्षाचा कार्यकाळ सोडून 1991 पासून त्यांना भाजपचा सतत राजकीय आश्रय मिळाला. गोंडा, बलरामपूर, अयोध्या आणि श्रावस्ती हे काही जिल्हे आहेत जिथे त्याचा प्रभाव आहे. कुस्ती आखाड्यांच्या माध्यमातून त्याने मोठे राजकीय जाळे उभे केले आहे. ब्रिजभूषण याने सलग तीन चार वर्षे कुस्ती परिषदेचा अध्यक्ष म्हणून काम केले आहे. त्यांचा एक मुलगा करण भूषण सिंह आता कुस्ती परिषदेचे उपाध्यक्ष आहेत. त्यांचा जावई बिहार कुस्ती महासंघाचा पदाधिकारी आहे. त्यांचा धाकटा मुलगा प्रतीक गोंडातून दोन वेळा आमदार आहे तर त्यांची पत्नी केतकी सिंह या गोंडा जिल्हा पंचायत अध्यक्ष आहेत. त्याची प्रतिमा बाहुबली, मसलमॅन-राजकारणी अशी राहिली आहे. अशा ब्रिजभूषणचा ट्रॅक रेकॉर्ड पाहिल्यावर त्यांच्याच पक्षाच्या योगी आदित्यनाथ सरकारच्या "गुंडा राज" विरुद्धच्या कठोर भूमिकेबद्दल हसूच येईल. सहा वेळा खासदार राहिलेल्या **ब्रिजभूषण याच्यावर चोरी, दंगल, खून, गुन्हेगारी धमकी, खुनाचा प्रयत्न आणि अपहरण यासह विविध आरोपांखाली तब्बल 38 खटले आहेत.** 1996 मध्ये त्याच्यावर डॉन दाऊद इब्राहिमच्या साथीदारांना आश्रय दिल्याचा आरोप होता. गेल्या वर्षी सिंग यांनी एका यूट्यूब चॅनेलवर दिलेल्या मुलाखतीत त्याच्या साथीदाराची हत्या करणाऱ्या किमान एका व्यक्तीची हत्या केल्याचे जाहीरपणे कबूल केले आहे! इतर बाहुबलींप्रमाणे सिंह यांनी जमीन हडपणे, बांधकाम, अवैध दारूचा व्यवसाय इत्यादीद्वारे मोठी संपत्ती कमावली आहे. शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रवेश करून त्याने प्रतिमा निर्मितीचे काम चालवले आहे. गोंडा, बलरामपूर, बहराइच आणि फैजाबादमध्ये 54 शैक्षणिक संस्था ब्रिजभूषण चालवतो. शिक्षणाच्या नावाने धंदाच सुरू आहे हे सांगण्याची गरज नाही. 2008 मध्ये जेव्हा त्याने विश्वासदर्शक ठरावावर क्रॉस व्होट केले तेव्हा त्याला भाजपमधून काढून टाकण्यात आले होते. पण 2009 मध्ये समाजवादी पक्षाचा उमेदवार म्हणून त्याने कैसरगंजची जागा जिंकली आणि भाजपने त्यांची शक्ती जाणली आणि पुन्हा भाजपत प्रवेश दिला. त्यामुळेच भाजपने त्याला दिलेले संरक्षण आश्चर्यकारक नाही. सर्व भांडवली पक्ष, मग ते राष्ट्रीय असोत वा प्रादेशिक, निवडणूकीच्या "निरोगी कार्यात" त्यांना मदत करणाऱ्या काही किंवा इतर बाहुबलींना आश्रय देतातच. ब्रिजभूषण सारख्या बलाढ्यांचा वापर भांडवलदारांकडून कष्टकरी जनतेवर दहशत माजवण्यासाठी केला जातो जेणेकरून जनतेने बंड करू नये आणि दहशतीचे डावपेच वापरून त्यांची मते गोळा करता यावीत. 2024च्या संसदीय निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून, भाजप ब्रिजभूषण विरुद्ध कारवाई करून कोणताही राजकीय धोका पत्करण्यास तयार नाही हेच दिसते. महागाई नियंत्रणात आलेले अपयश किंवा बेरोजगारीचे संकट सोडविण्यास असमर्थता यामुळे निवडणुकीत आपली स्थिती कठीण होईल याची भाजपला जाणीव आहे. त्यामुळे सिंह यांच्यासारख्या लोकांची, काहीही असले तरी, भाजपला आता पूर्वीपेक्षा जास्त गरज आहे.

### फॅसिस्टांचे स्त्रीविरोधी चरित्र पुन्हा उघडे!

लैंगिक गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या भाजप नेत्यांच्या यादीत ब्रिजभूषण याची ताजी नोंद आहे आणि पक्ष त्यांच्या संरक्षणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. परंतु बलात्काऱ्यांचे समर्थन करण्याचा भाजप आणि संघ परिवाराचा फार मोठा इतिहास आहे. 2017 मध्ये उन्नाव बलात्कार प्रकरणात कुलदीप सिंग सेंगर आणि माजी केंद्रीय मंत्री स्वामी चिन्मयानंद यांच्याबाबतीतही असेच प्रयत्न आपण पाहिले आहेत. त्या अगोदरही भाजप सदस्यांनी हाथरस आणि कठुआमध्ये उघडपणे बलात्काऱ्यांचे समर्थन केले, कठुआमध्ये तर भाजपच्या राज्यमंत्र्यांनी एका निष्पाप मुलीवर सामूहिक बलात्कार आणि हत्या करणाऱ्या पुरुषांच्या समर्थनार्थ मोर्चा काढला! फक्त एक वर्षापूर्वी गुजरातमधील भाजप आमदार, सीके राऊलजी यांनी म्हटले होते की बिल्किस बानो प्रकरणातील 11 दोषी बलात्कारी "चांगले संस्कार" असलेले ब्राह्मण आहेत आणि "वाईट हेतूने कोणीतरी त्यांना शिक्षा केली असावी". राऊलजी हे या 11बलात्काऱ्यांना माफी देणाऱ्या पुनरावलोकन पॅनेलमधील दोन भाजप नेत्यांपैकी एक होते.

आरएसएस-भाजपचे एकंदरीत स्त्रीविरोधी चारित्र्य त्यांच्या वैचारिक पूर्वजांनी लिहिलेल्या ग्रंथातूनही दिसून येते यात आश्चर्य नाही. उदाहरणार्थ, 2002 गुजरात आणि 2013 च्या मुझफ्फरनगर दंगलींदरम्यान महिलांवर लैंगिक अत्याचार होण्याच्या अनेक दशकांपूर्वी, **हिंदुत्वाचे प्रवर्तक माफीवीर सावरकर यांनी** बलात्काराचे न्याय्य राजकीय साधन म्हणून समर्थन केले! 1966 मध्ये त्यांच्या मृत्यूच्या काही वर्षांपूर्वी त्यांनी मराठीत लिहिलेल्या 'सिक्स ग्लोरियस इपॉच्स ऑफ इंडियन हिस्ट्री' या पुस्तकात "हिंदू सद्गुण" या कल्पनेची पुनर्रचना करून त्यांनी हे केले. **"परंतु स्त्रियांच्या शौर्याबद्दलच्या आत्मघाती कल्पनांमुळे, जे शेवटी हिंदू समाजासाठी अत्यंत हानिकारक ठरले, शिवाजी किंवा चिनाजी अप्पा दोघेही मुस्लिम महिलांवर बलात्कार करू शकले नाहीत."** असे सावरकर लिहितात आणि हिंदूंनी बलात्कार का केले नाहीत याचा शोक मनवतात! गोळवलकरांच्या बंच ऑफ थॉट्समध्ये, 'मातृत्वाची हाक' हा अध्याय हिंदू स्त्रियांना 'आधुनिक' होण्याचे टाळण्यास सांगतो. गोळवलकरांच्या मते, आधुनिकतेचे स्वातंत्र्य आणि समानता उपभोगणाऱ्या स्त्रियांमध्ये सद्गुणांची कमतरता असते. गोळवलकर यांनी हिंदू कोड बिलाला विरोध करण्यासाठी संघाचे नेतृत्व केले (जे हिंदू स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे अधिकार देण्याच्या दिशेने अपुरे, पण पहिले पाऊल होते), असा दावा केला की स्त्रियांना हक्क बहाल केल्याने पुरुषांची "मोठी मानसिक उलथापालथ" होईल आणि "मानसिक रोग व त्रास" होईल. फॅसिस्टांची ही दुराचरणवादी विचारसरणी त्यांच्या प्रचारयंत्रणांद्वारे सतत प्रसारित केली जात आहे, ज्याचा परिणाम म्हणून ते सत्तेत आल्यापासून महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ होत आहे.

"बेटी बचाओ, बेटी पढाओ" या आपल्या प्रमुख जाहिरात मोहिमेत मोदी सरकार काहीही दावा करत असले तरी, (बेटी बचाओ, बेटी पढाओ योजनेअंतर्गत मुलींच्या आरोग्य आणि शिक्षणासाठी 80 टक्के निधी मीडिया मोहिमांवर खर्च करण्यात आला) हिंदुत्वाचा पुरुषसत्ताक दृष्टिकोन त्यांच्या कृतीतून सतत प्रकट होतच राहतो. ब्रिजभूषण शरण सिंह हे फक्त या यादीत जोडले गेलेले अजून एक नाव आहे, मूळातच फॅसिस्ट हिंदुत्ववादी विचारधारा हीच महिला-विरोधी, महिलांचे वस्तूकरण करणारी, आणि महिलांना उपभोगाची वस्तू समजणारीच एक विचारधारा आहे, जिला मूळापासून नेस्तनाबूत करणे आपले कर्तव्य आहे.

# रेल्वे प्रवाशांसाठी जीवघेणी ठरणारी, सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी सरकारची नवउदार'वादी धोरणे

पान 15 वरून

दरात विकली जावी आणि त्यांचा नफा वाढावा. ही निर्गुंतवणूक स्पष्ट करते की देश गंभीर बेरोजगारीच्या संकटाने ग्रासलेला असतानाही जागा का भरल्या जात नाहीत. जरी काँग्रेस सरकारने देखील ह्या धोरणांचे पालन केले असले तरी फॅशिस्टांनी (भाजप-आरएसएस) त्यांची अधिक कार्यक्षमतेने आणि जोमाने अंमलबजावणी केली आहे.

उदारीकरणाच्या धोरणांचा नैसर्गिक परिणाम म्हणजे लोकांमध्ये बेरोजगारी आणि असुरक्षितता वाढणे. वंदे भारतचे उद्घाटन, बुलेट ट्रेनची चर्चा, "5 ट्रिलियन अर्थव्यवस्था" हे मुळात आपल्या जीवनाच्या अनिश्चित परिस्थितीतून आपले लक्ष "नवीन भारत"च्या खोट्या स्वप्नाकडे वळविण्याचे साधन आहे. हे स्वप्न पुन्हा पुन्हा भंग पावते **जेव्हा अशा भयंकर घटना घडतात, आणि लक्ष वळवण्यासाठी त्याचा दोष प्रथमतः टाकला जातो एखाद्या मुस्लिम व्यक्ती किंवा समूहावर!** बालासोर घटनेवेळी सुद्धा अपघाताच्या **स्थानाजवळच एक मशीद असल्याची अफवा पसरवली गेली, जे प्रत्यक्षात एक इस्कॉन मंदिर होते** आणि स्टेशन मास्टर मुस्लिम असल्याची सुद्धा अफवा पसरवली जात होती; आणि नेहमीप्रमाणे काही "समजदार" भाजप नेते दावा करतातच की काही देशद्रोही घटक मोदींना बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. बालासोर अपघातात पण हाच घटनाक्रम दिसून आला.

सीबीआयला देखील ह्या घटनेमागे कोणताही "प्रयत्न, "प्रवृत्ति" किंवा "षडयंत्र" आहे किंवा नाही याचा "तपास" करण्यासाठी सांगण्यात आले आहे. 2018 मधील एका आणि अपघाताच्या काही तासांपूर्वी केलेल्या एका अशा दुरूस्तीच्या कामातील चुकांमुळे सिग्नलिंगमध्ये बिघाड होऊन कोरोमंडल एक्सप्रेस आणि दुसऱ्या ट्रॅकवरील मालगाडीची टक्कर झाल्याचे रेल्वे सुरक्षा आयुक्त (CRS) तर्फे सांगण्यात आले. **बालासोर सारख्या घटना होतात, तेव्हा कर्मचाऱ्यांनी कोणत्या परिस्थितीत काम करताना चुका केल्या हे प्रश्नही उपस्थित केले जात नाहीत, कारण व्यवस्थेत वर बसलेल्या लोकांना खालच्या कोणावर तरी दोष मारून लवकरात लवकर नामानिराळे व्हायचे असते.** सीआरएस ने वेगळा निष्कर्ष सादर केल्यानंतरही सीबीआयने 3 रेल्वे कर्मचाऱ्यांना अटक केली आहे. जेव्हा रोजच गोदी मीडियाच्या माध्यमातून खोट्याला खरे करण्याचे काम चालू आहे, तेव्हा अशा अपघातांमागील खरी कारणे कधी समोर येतील याची अपेक्षा सुद्धा धारिष्ट्यच ठरते. **बालासोर सारख्या घटनांमागे रेल्वेचे एक संस्थागत अपयश काम करत असतानाही,** स्वत:ला दोषमुक्त करण्याकरिता मोदी सरकार मात्र सतत जनतेला "षडयंत्रा"च्या कहाण्या भरवत राहणार आहे.

# उत्तराखंडात द्वेषाची आग पेटवून, भाजप-संघ भाजताहेत राजकारणाच्या पोळ्या!

पान 16 वरून

स्वीकारली नाही. **हे लव्ह जिहाद प्रकरण कधीच नव्हते, तर नियमित स्वरूपाचा गुन्हा होता.** ज्यांनी हे केले ते तुरुंगात आहेत. न्यायपालिका आता निर्णय देईल." त्यांनी असेही म्हटले की संघाच्या गुंडांकडून त्यांचा सतत छळ केला जात आहे: "मी त्यांना प्रत्येक वेळी नकार दिला आहे. माझ्यापर्यंत पोहोचण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनी माझे जीवन नरक बनले आहे. मी बाहेरही जाऊ शकत नाही. मला समजले आहे की **त्यांना फक्त जातीय तणाव निर्माण करायचा आहे आणि त्यांचे एकमेव उद्देश घोषणाबाजी करणे आहे.** मी अनोळखी नंबरच्या कॉलला प्रतिसाद देणे बंद केले आहे आणि एक नवीन नंबर देखील विकत घेतला आहे." **परंतु सत्य समोर आल्याने काही फरक पडला नाही.** 21 जून रोजी, लव्ह-जिहादसाठी अपहरणाची आणखी एक कथित घटना भाजपच्या सदस्यांनी आणि श्रीनगर (उत्तराखंड) मधील दुकानदारांच्या संघटनेने पसरवली आणि हिंदू महिलांना लक्ष्य केले जात असल्याचा आरोप करत आंदोलन आयोजित केले.

22 जून रोजी सेलाकी, डेहराडून येथे, एका मुस्लिम पिता आणि मुलाला मारहाण करण्यात आली कारण त्यांनी "जय श्री राम" म्हणण्यास नकार दिला होता. 23 जून रोजी, डेहराडूनमधील एका पिता आणि मुलाला 21 वर्षीय महिलेला इस्लाम स्वीकारण्यासाठी 'प्रेरित' केल्याबद्दल अटक करण्यात आली होती (जबरदस्तीचे अंग असल्याशिवाय एखाद्याला 'प्रभावित' किंवा 'प्रेरित करणे' हा गुन्हा असू शकत नाही). 24 जून रोजी, पुरोलाच्या व्यापारी संघटनेने असा हुकूम जारी केला की कोणत्याही पुरुष न्हावी/ब्युटीशियनला 7 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या महिला किंवा मुलींना सेवा देण्याची परवानगी दिली जाणार नाही आणि योग्य सरकारी पडताळणीशिवाय फेरीवाल्यांना शहरात प्रवेश करण्यास मनाई केली. 27 जून रोजी, बद्रीनाथमधील विविध पुजारी संघटनांनी पोलिसांशी संपर्क साधून मुस्लिमांना बकरी-ईदच्या वेळी कोठेही (त्यांच्या स्वतःच्या घरांसह) नमाज पठण करण्यास मनाई करण्याची मागणी केली. 30 जून रोजी, पुरोला पोलिसांनी हिंसाचारानंतर पुरोल्यात परतलेल्या मुस्लिमांना संरक्षण देण्याऐवजी, त्यांना त्यांच्या घरीही ईदचे मेळावे किंवा प्रार्थना सभा न घेण्याचे आदेश दिले! 6 जुलै रोजी, अल्मोडा जिल्ह्यातील रानीखेत येथे उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी आणखी एक द्वेष रॅली आयोजित केली होती जेव्हा असे समोर आले की एक 40 वर्षीय हिंदू स्त्री (ती तीन मुलांची आई) 30 वर्षीय मुस्लिम न्हाव्यासोबत पळून गेली होती. न्हाव्याच्या दुकानाची तोडफोड करण्यात आली, न्हाव्याला अटक करण्यात आली आणि महिलेला महिला-आश्रमात पाठवण्यात आले. उत्तराखंड धर्म स्वातंत्र्य कायद्यांतर्गत जिल्ह्यात दाखल झालेला हा पहिलाच गुन्हा होता. त्याच दिवशी, चुकून दोन हिंदू महिलांवर पावसाच्या पाण्याच्या डबक्याचे शिंतोडे उडवले गेल्याच्या आरोपावरून त्यांच्यात आणि मुस्लिम पुरुषांमध्ये झालेल्या भांडणानंतर विकासनगर, डेहराडूनमधील मुख्य बाजार आणि इतर अनेक रस्ते वैदिक मिशन, बजरंग दल, विहिंप, प्रतिष्ठा सेवा समिती आणि स्थानिक व्यापारी मंडळाच्या सदस्यांनी बंद केले होते. नंतर त्यांनी पोलिसांच्या उपस्थितीत मुस्लिम पुरुषांवर हल्ला देखील केला.

अशाप्रकारे, संघ परिवाराच्या एका पद्धतशीर, सुसंघटित सघन मोहिमेमुळे जातीय द्वेषाच्या ज्वाला एक महिन्यापेक्षा जास्त काळ तेवत ठेवल्या गेल्या आणि लव्ह-जिहादची कल्पना सामान्य रहिवाशाच्या मनात प्रकर्षाने उमटवली गेली. हे व्यापक जनतेचे आंदोलन नव्हते हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. हे अल्पसंख्याकांचे आंदोलन होते, ज्यात संघ परिवाराचे नेते आणि स्थानिक व्यापारी मंडळांचे व्यापारी, दुकानदार आणि व्यावसायिक (ज्यांचे मुस्लिम दुकानदारांच्या आर्थिक बहिष्कारात भौतिक हितसंबंध होते) सामील होते. *देशातील जनतेचा मोठा हिस्सा अजूनही या गुंडसेनेचा हिस्सा बनलेला नाही, म्हणूनच क्रांतिकारी शक्तींनी कष्टकरी जनतेपर्यंत जाऊन त्यांना त्यांच्या आर्थिक मागण्यांवर संघटित केले तर भाजप-आरएसएसला उघडे पाडत, फॅशिस्टांनी पसरवलेले सर्व भ्रम उलटवले जाऊ शकतात.*

## संघ-भाजपचा खरा अजेंडा

**संघ परिवाराच्या मते, आपल्या समाजाचे मोठे खलनायक हे मोठे उद्योगपती, बिल्डर, कंत्राटदार, सट्टेबाज आणि गुंतवणूकदार नाहीत** जे या देशाच्या 90 टक्के संपत्तीवर ताबा ठेवतात, जे त्यांचे भव्य राजमहाल बांधण्यासाठी आणि त्यांच्या उधळपट्टीच्या जीवनशैलीला टिकवण्यासाठी कष्टकरी लोकांच्या श्रमाचे शोषण करतात, जे अति-नफा मिळविण्यासाठी शिक्षण, आरोग्यसेवा आणि प्रत्येक गोष्टीच्या खाजगीकरणाला पुढे रेटतात. **त्यांच्याकरिता शत्रू म्हणजे भंगार गोळा करणारे, सायकल मेकॅनिक, आईस्क्रीम विक्रेते, गादी बनवणारे किंवा रस्त्यावर भाजीपाला किंवा किरकोळ वस्तू विकणारे फेरीवाले असे सामान्य मुस्लिम. सततचा मुस्लीम विरोधी प्रचार आणि धार्मिक भयगंड कामकरी लोकांना त्यांचे खरे शत्रू म्हणजे भांडवलदार वर्ग आणि त्याने निर्माण केलेली बेरोजगारी, महागाई, खाजगीकरण, कंत्राटीकरण आणि पर्यावरणाचा विनाश पाहू देत नाही.**

**खरेतर, भाजपला महिला सुरक्षेशी काहीच देणेघेणे नाही.** गेल्या तीन महिन्यांत हाथरसचे बलात्कारी आणि बलात्कारी बाबा राम रहीम सिंग यांना मुक्त करण्याचे कट भाजपने रचले आहेत आणि ब्रिजभूषण सिंग यांना अटकेपासून वाचवले आहे. मणिपूरमध्ये गृहयुद्ध आणि लैंगिक हिंसाचार अव्याहतपणे सुरू राहावा, ही इच्छाही त्यांनी आपल्या निष्क्रियतेतून जाहीर केली आहे. भाजपने बलात्कारी, महिला-हिंसाचारी व्यक्तींना वाचवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची यादी तर खूप मोठी होईल.

स्त्रियांच्या सुरक्षेचा विचार करू नका, लव्ह-जिहाद हा धर्माच्या सुरक्षेला धोका आहे, असे हिंदू कट्टरवाद्यांचे म्हणणे आहे. जर 'लव्ह जिहाद' खरोखरच धोका होता, तर भाजप नेते शाहनवाझ हुसेन यांनी हिंदू महिलेशी केलेला विवाह, भाजप नेते मुख्तार अब्बास नक्वी यांच्या एका हिंदू महिलेशी विवाह, भाजप नेते सुशील मोदी यांचे एका ख्रिश्चन महिलेशी लग्न, भाजप नेते सिकंदर बख्त यांचे हिंदू महिलेशी लग्न, भाजपचे नेते सिकंदर बख्त यांचा विवाह, सुब्रमण्यम स्वामींच्या मुलीचे मुस्लिम पुरुषाशी लग्न यावर विश्व हिंदू परिषद का आवाज उठवत नाही? **सामान्य जनतेतील आंतरधर्मीय विवाहांनाच का लक्ष्य केले जाते?** उत्तर सोपे आहे: **या खोट्या प्रश्नांमध्ये आपण एकमेकांना वेठीस धरावे, एकमेकांना ठार मारण्यासाठी, पंगू करण्यासाठी द्वेषाची भावना निर्माण करावी अशी त्यांची इच्छा आहे, जेणेकरून ते शांतपणे अंबानी आणि अदानींना देश विकून मोठे कमिशन मिळवू शकतात;** जेणेकरून ते आपल्या मुलांना हार्वर्ड आणि ऑक्सफर्डमध्ये पाठवू शकतील आणि आमच्या मुलांना शाळेत घालण्यासाठी धडपड करत बसू; ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे आपण मरत असताना त्यांना हृदयविकाराच्या उपचारासाठी अमेरिका आणि सिंगापूरला जाणे परवडेल!

मित्रांनो, खाजगी नफ्याभोवती नव्हे तर न्याय आणि समानतेच्या तत्त्वांनुसार जगाची मांडणी करता येते ही कल्पना स्वीकारण्यापेक्षा भांडवलदार जगाचा नाश स्वीकारत आहेत! बेरोजगारी आणि **महागाई विरोधात आंदोलन करणाऱ्या आपल्या मित्रांवर ते लाठीमार करतात, सरकारच्या विरोधात बोलणाऱ्यांना राजद्रोहाच्या आरोपाखाली तुरुंगात टाकतात, आणि आम्हाला सांगतात की खरा धोका शेजारच्या भंगार विकणाऱ्या मुस्लिम माणसामुळे आहे!** आपण यांच्या फसवणुकीला बळी पडू नये. आपली खरी ओळख आहे की आपण कामगार-कष्टकरी-श्रमिक आहोत. आपण सर्व जे आपली श्रमशक्ती विकतो आणि जीवन चालवतो, आपण एक आहोत! **आपले हित समान आहे: आपल्या श्रमाच्या फळांचे समतामूलक वितरण; आणि एक समान शत्रू आहे, परजीवी भांडवलदार वर्ग, जो आपल्या श्रमाच्या शोषणातून ऐशआरामाने जगतो आणि आपण मात्र उपासमारीने मरतो.** आपण धर्म आणि सत्तेला पूर्णपणे वेगळे करण्याची खरी धर्मनिरपेक्षतेची मागणी केली पाहिजे. कोणताही धार्मिक किंवा राजकीय नेता, जो धर्माचा वापर करून लोकांमध्ये फूट पाडतो, त्याला आपल्या गल्लीतून हाकलून लावले पाहिजे, मग तो भगवा, पांढरा किंवा हिरवा कोणत्याही रंगाचा असो. जर आपण हे केले नाही, **जर आपण प्रत्येक संधिसाधू मूलतत्त्ववादी किंवा धार्मिक प्रवृत्तीला आपल्या पूर्ण ताकदीने नाकारले नाही** आणि त्यांचा प्रतिकार केला नाही, जर आपण हे ओळखले नाही की प्रत्येक कामगार हा आपला भाऊ/बहीण आहे, तर आपण स्वतःचाच नाश ओढवून घेऊ. सुफी संत बुल्ले शाह यांच्या शब्दात,

*चल वे मियां बुलेया, चल यार मना ले*
*वरना बाजी ले गए कुत्ते*

# रेल्वे प्रवाशांसाठी जीवघेणी ठरणारी, सुरक्षिततेला धोका निर्माण करणारी सरकारची नवउदारवादी धोरणे

✎ शशांक

2 जून रोजी बालासोरजवळ शालिमार कोरोमंडल एक्स्प्रेस, यशवंतपूर हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेस आणि एक मालगाडी यांचा झालेला रेल्वे अपघात हा 20 वर्षांतील भारतातील सर्वात भीषण रेल्वे अपघात आहे. हावडाहून चेन्नईच्या दिशेने जाणारी कोरोमंडल एक्स्प्रेस मालगाडीला धडकल्याने हा अपघात झाला. मुख्य मार्ग मोकळा असतांना आणि सिग्नल हिरवा असतांना, कोरोमंडल एक्स्प्रेस एका लूप लाइनवर वळवण्यात आली जिथे ती उभ्या असलेल्या मालगाडीवर जाऊन आदळली. ही पहिली टक्कर होती. दुसरी टक्कर म्हणजे कोरोमंडल एक्स्प्रेसच्या रुळावरून घसरलेल्या बोगींनी बेंगळुरूहून येणाऱ्या हावडा सुपरफास्ट एक्स्प्रेसला दिलेली धडक. एकाचवेळी झालेल्या दोन टक्करी आणि वेगवान रेल्वे रुळावरून घसरल्यामुळे मृतांची संख्या खूप जास्त होती. जवळपास 300 लोक मरण पावले आणि 900 हून अधिक लोक जखमी झाले. अपघातानंतर लगेचच, संकटात 'संधी' शोधण्यात अव्वल असणाऱ्या भाजप सरकारने आपल्या नेत्यांच्या "तत्पर प्रतिसाद" चे कौतुक करण्यासाठी एका शोकांतिकेला प्रसिद्धी मोहिमेत रुपांतरित केले. प्रधानमंत्री मोदी आणि रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना त्यांच्या अनधिकृत प्रचार वृत्तवाहिन्यांवर सभांमध्ये, घटनास्थळाला भेट देऊन आणि पीडितांसाठी भरपाईची घोषणा करताना दाखवण्यात आले. हा दिखावा काही दिवस चालला आणि लवकरच प्रधानमंत्र्यांभोवती फिरणाऱ्या इतर "महत्त्वाच्या" बातम्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी हा अपघात बाजूला सारला गेला. अपघात होऊन एक महिना उलटल्यानंतरही मृतांचे कुटुंबीय आपल्या प्रियजनांच्या मृतदेहाची वाट पाहत होते.

कर्मचाऱ्यांच्या चुकांमुळे असे अपघात होऊ शकतात, परंतु मानवी चुका कमीत कमी करण्यासाठीच रेल्वे सुरक्षा यंत्रणा बनवली जाते आणि उपलब्ध आकडेवारी स्पष्टपणे दाखवते की अशाप्रकारच्या रेल्वे अपघातांच्या वाढत्या शक्यतेचे खरे कारण आहे खाजगीकरण, छाटणी, कंत्राटीकरण, बजेट कपात आणि रेल्वे कर्मचाऱ्यांवर अमानुषपणे वाढणारा कामाचा बोजा. ही सर्व कारणे लपविण्याचा पुरेपूर प्रयत्न केल्या महिन्याभरात केला गेला आहे.

### रेल्वेतील सुरक्षितता धाब्यावर: भारतीय रेल्वेमध्ये असलेली कर्मचाऱ्यांची गंभीर कमतरता!!

1991 मध्ये जेव्हा उदारीकरणाची धोरणे लागू करण्यात आलीत तेव्हापासून आणि विशेषत: गेल्या 9 वर्षांत त्यांची अत्यंत आक्रमकपणे अंमलबजावणी होत असताना, **रेल्वेतील नोकऱ्या सतत कमी केल्या जात आहेत आणि त्याजागी नोकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर कंत्राटीकरण आणि अनौपचारिकरण केले जात आहे. ज्याचा परिणाम म्हणून कर्मचाऱ्यांवर कामाचा बोजा खूप वाढला आहे.** लोको पायलटपासून सुरक्षा विभागात असणाऱ्या रिक्त पदांवरून मनुष्यबळाची कमतरता दिसून येते. दुर्घटनेच्या दोनच दिवस आधी, 'द हिंदूने' भारतीय रेल्वेतील कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे मोठे अपघात कसे घडत आहेत यावर प्रकाश टाकणारा



अहवाल प्रकाशित केला होता. कर्मचाऱ्यांच्या ह्या कमतरतेला तोंड देण्यासाठी लोको पायलटना रजा आणि विश्रांती सुद्धा नाकारली जाते ज्याचा परिणाम म्हणून त्यांच्यावरील तणावाची पातळी वाढते. उदाहरणार्थ, **दक्षिण-पूर्व मध्य रेल्वेमध्ये, 35.99 टक्के लोको पायलटांनी मार्चमध्ये 12 तासांपेक्षा जास्त वेळेच्या शिफ्ट केल्या होत्या,** एप्रिलमध्ये 34.53 टक्के आणि मे महिन्याच्या पहिल्या सहामाहीत 33.26 टक्के. अनेक वेळा **18-20 तास सतत गाडी चालवल्यानंतर चालकांना गाडी थांबवून झोप घ्यावी लागते, तर कधी 10 - 10 तास चालकांना ब्रेकशिवाय काम करावे लागते, अगदी टॉयलेट ब्रेकशिवायही!**

चालू वर्षातच, छोट्या-मोठ्या अपघातांची संख्या 162 होती, त्यापैकी 35 वाहनचालकांच्या कामाच्या अतिप्रचंड ओझ्यामुळे झाले होते. दररोज ट्रॅकची तपासणी करणाऱ्या भारतीय रेल्वेचा कणा असलेल्या गॅंगमनचीही मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. 90 च्या दशकाच्या मध्यात असलेल्या एकूण गॅंगमनची संख्या खाजगीकरण धोरणानंतर हळूहळू कमी केली गेली. प्रवासी आणि कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले रुळांवर गस्त घालून पाहणी करण्याचे आणि लहान-सहान देखभालीचे काम देखील कंत्राटी तत्त्वावर दिले जात आहे, ज्याचा परिणाम म्हणून जागांमध्ये मोठ्या प्रमाणात कपात झाली आहे. काम करण्याची परिस्थिती इतकी खराब आहे की या कर्मचाऱ्यांच्या आरामाची जागा अत्यंत मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहे जिथे विजेची, पिण्याच्या पाण्याची देखील सोय नाही. त्यांना अमानवीय स्थितीत काम करण्यासाठी भाग पाडले जाते. **भारतात 67,367 किमी लांबीचे रेल्वे रूळ आहेत ज्यांची दररोज रूळ निरीक्षक दलाकडून तपासणी केली जाते. असलेल्या रिक्त जागा भरल्या जात नाहीयेत आणि 50 टक्के जागा रद्द करण्यात आल्यात, ज्यामुळे गॅंगमनवर कामाचा अतिरिक्त भार वाढत आहे.** स्टेशन मास्तरांचीही परिस्थिती काही वेगळी नाही. रेल्वे मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, "त्यांना 12 तासांच्या शिफ्टमध्ये काम करायला लावले जात आहे. सुरक्षितता राखण्यात त्यांची भूमिका सर्वात महत्त्वाची आहे. कोणतीही अनियमितता शोधण्यासाठी स्टेशन मास्तरसाठी चाकांपासून ते स्टेशनवरून जाणाऱ्या ट्रेनच्या आवाजापर्यंत सर्व गोष्टींवर लक्ष ठेवणे आवश्यक असते." आत्यंतिक महत्वाच्या आणि देखभालीच्या कामांसाठी रेल्वेकडे पुरेसे कर्मचारी नसताना, 3.11 लाखांहून अधिक क श्रेणीतील पदे (वाहतूक सहाय्यक, मालगार्ड, कनिष्ठ आणि वरिष्ठ टाइमकीपर, कनिष्ठ आणि वरिष्ठ लिपिक-सह-टंकलेखक, आणि स्टेशन मास्तर) आणि मंजूर 18,881 पैकी 3,018 राजपत्रित संवर्ग पदे (वरिष्ठ अधिकारी) भारतीय रेल्वेच्या विविध विभागात रिक्त आहेत. **वर्ष 2023 मध्ये रिक्त असलेल्या जागांपैकी निम्म्या जागा (28,650 पैकी 14,203) ह्या सुरक्षा श्रेणीतील आहेत,** ज्यात निरीक्षक, चालक, ट्रेन परीक्षक, शंटर, इत्यादींसारख्या सुरक्षेच्या कामात असणाऱ्या पदांचा समावेश आहे. एका बाजूला रेल्वे स्थानक आणि रेल्वे रुळांची संख्या वाढत आहे तर दुसऱ्या बाजूला पदांची संख्या कमी करून, त्यांचे कंत्राटीकरण करून, खाजगी कंपन्यांना नफा कमावण्याचे स्वातंत्र्य देऊन रेल्वे कर्मचाऱ्यांवरील कामाचे ओझे सतत वाढवले जात आहे. अशा परिस्थितीत अपघातांची शक्यता वाढणे साहजिक आहे.

### निधी कपात, निधीचा गैरवापर आणि दिखाऊ प्रकल्पांना सुरक्षिततेच्यावर स्थान

नरेंद्र मोदी सरकारद्वारे 2017 मध्ये रेल्वे सुरक्षितता सुधारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या विशेष निधी कोषात, म्हणजे **बहुचर्चित राष्ट्रीय रेल संरक्षण कोषा (RRSK) मध्ये, पुरेसा निधी नसल्याचे डिसेंबर 2022 मध्ये नियंत्रक आणि महालेखा परीक्षक (CAG) द्वारे सादर केलेल्या 'रेल्वे रुळावरून घसरल्याच्या घटना' या लेखापरीक्षण अहवालात दिसून आले आहे.** कॅगच्या अहवालात असे आढळून आले आहे की निधीच्या तुटवड्याने रेल्वेमध्ये परिपूर्ण सुरक्षितता प्रदान करण्यासाठी बनवलेल्या आरआरएसकेच्या निर्मितीच्या प्राथमिक उद्दिष्टालाच हरताळ फासला गेला आहे. त्यात पुढे असेही म्हटले आहे की स्थापत्य अभियांत्रिकीच्या कामांसाठी, ज्यामध्ये रुळांच्या नूतनीकरणाचा समावेश आहे, 119,000 कोटी रुपयांचा निधी अपेक्षित होता, पण त्याला 1 लाख कोटींपर्यंत कमी करण्यात आले. रुळांच्या नूतनीकरणासाठी देण्यात आलेला निधी देखील 2018-19 मध्ये 9,607.65 कोटी रुपयांवरून 2019-20 मध्ये 7,417 कोटी रुपयांवर घसरला. अहवालात पुढे असे देखील म्हटले आहे की **अनावश्यक कामांसाठी जसे की पायाचा मसाज करणारे यंत्र, काचेची भांडी, इलेक्ट्रिकल उपकरणे, फर्निचर, हिवाळ्यातील जॅकेट, संगणक, इत्यादी खरेदी करण्यासाठी, स्वयंचलित जिना बनवण्यासाठी, उद्यानं विकसित करण्यासाठी, शौचालये बांधण्यासाठी आणि ध्वज उभारण्यासाठी निधीचा दुरुपयोग करण्यात आला.**

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी गेल्या वर्षी मार्चमध्ये कवच नावाच्या टक्कर रोखणाऱ्या प्रणालीचे प्रात्यक्षिक सादर करून प्रचार मोहीम राबवली होती. मात्र, रेल्वेच्या संपूर्ण जाळ्यांसाठी ही योजना राबविण्यासाठी सरकारी निधी खर्च करण्याची वेळ आली तर त्याची स्थिती सुद्धा आरआरएसकेसारखी आहे. इंडिया टुडेच्या माहितीनुसार बालासोर ज्या अंतर्गत येते त्या दक्षिण-पूर्व रेल्वेसाठी **तंत्रज्ञानावर खर्च करण्यासाठी ठरविण्यात आलेल्या 468.9 कोटी रुपयांपैकी एक रुपयाही खर्च केला गेला नाही** ज्याचा परिणाम म्हणून संपूर्ण मार्गावर कुठेही कवच यंत्रणा लागू नव्हती. "कवच प्रभावी होण्यासाठी, कवच उपकरणे मार्गावर धावणाऱ्या सर्व लोकोमोटिव्ह किंवा स्वयं-चलित वाहनांवर उपलब्ध असणे आवश्यक आहे," असे ललित त्रिवेदी, रेल्वे तंत्रज्ञान सल्लागार यांचे मत आहे. नुकत्याच उपलब्ध झालेल्या **सरकारी आकडेवारीनुसार, कवच तंत्रज्ञान केवळ 2.13 टक्के रेल्वेचे जाळे व्यापते** आणि म्हणून ह्यावेळी देखील नेहमीप्रमाणे सरकारी प्रकल्प पूर्ण होण्याऐवजी त्याची फक्त घोषणाच साजरी करण्यात आली. अपघाताच्या काही तास आधी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या 'चिंतन शिबिरा'मध्ये उपस्थित असलेल्या अनेक अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, रेल्वेच्या सुरक्षेबाबत विविध विभागांमार्फत होणार असणाऱ्या सादरीकरणाला वगळण्यात आले. एका वरिष्ठ अधिकाऱ्याने नाव न सांगण्याच्या अटीवर द प्रिंटला सांगितले की, "फक्त एकाच झोनला सुरक्षेबाबत सादरीकरण करण्याची परवानगी होती, तर वंदे भारत गाड्या सुरू करण्यावर आणि महसूल वाढविण्याबाबत चर्चा करण्यावर भर देण्यात आली. **भारतीय रेल्वे 1,08,000 कोटी रुपये खर्चून मुंबई ते अहमदाबाद जोडणारी बुलेट ट्रेन योजना देखील हाती घेत आहे! आणि हे सर्व सुरक्षा कामावरील निधीत कपात करून!** यावरूनच दिसते की सरकार बहुसंख्य लोकांच्या सुरक्षिततेपेक्षा लोकसंख्येच्या उच्च-उत्पन्न असलेल्या अल्पसंख्य गटालाच परवडू शकणाऱ्या आलिशान गाड्या सुरू करण्याला प्राधान्य देत आहे.

कर्मचारी कपात आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवरील खर्चात कपातीसारख्या नवउदार धोरणांचे पालन करताना, सुमारे 3 कोटी लोकांचा जीव धोक्यात घालत मोदी सरकार किंवा त्यापूर्वीची इतर सरकारे इतकी बेपर्वा कशी असू शकतात? कितीही अमानवीय आणि असंवेदनशील वाटत असले तरी भांडवलशाहीच्या तर्कानुसार हेच अगदी योग्य आहे. ही सर्व सरकारे भांडवलदार वर्गाची प्रतिनिधी असल्याने, क्षरण होत चाललेल्या भांडवलशाहीच्या युगात, गुंतवणुकीचे मार्ग आकुंचन पावत असतांना, इतर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांप्रमाणेच, ते या क्षेत्रात निर्गुंतवणूक करतात जेणेकरून रेल्वेची संपदा खाजगी भांडवलदारांना स्वस्त

पान 14 वर

# उत्तराखंडात द्वेषाची आग पेटवून भाजप-संघ भाजताहेत राजकारणाच्या पोळ्या!

✎ सुप्रित


फॅसिस्ट हिंदुत्वाच्या राजकारणासाठी सुपीक मैदान तयार करण्यासाठी उत्तराखंडमधील मतदारांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न संघ-भाजपकडून गेली अनेक वर्षांपासून यशस्वीपणे सुरू आहे. 2021 मधील हरिद्वार धर्म संसदेने उघडपणे मुस्लिम नरसंहाराची आणि देशात हिंदू-राष्ट्र स्थापनेची हाक दिल्यापासून या प्रकल्पाला अधिक गती मिळाली आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर धामी आज्ञाधारकपणे "लँड-जिहाद"च्या दुष्प्रचाराची धुरा वाहत आहेत (त्यांच्या स्वतःच्या सरकारच्या सर्वेक्षणात मशिदींपेक्षा आठ पट जास्त बेकायदेशीर मंदिरे असल्याचे सत्य समोर आलेले असले तरी!) आणि नजिकच्या काळात "लव्ह-जिहाद" चे भोंगे जोरजोरात फुंकले जात आहेत. उत्तराखंडात विकासाची स्थिती भीषण असताना हे स्वाभाविक आहे. एकीकडे विध्वंसक भांडवली विकासामुळे हवामान बदलाचे मोठे संकट उभे आहे, आणि दुसरीकडे मोठ्या प्रमाणावरील बेरोजगारीचे संभाव्य स्फोटक संकट उभे आहे. उत्तराखंडचा रोजगार दर फक्त 30 टक्के आहे, जो राष्ट्रीय सरासरी 37 टक्के पेक्षा सुद्धा कमी आहे. रोजगाराच्या शोधात दरवर्षी सुमारे 1 लाख लोक गावांमधून स्थलांतरित होतात. फॅसिस्ट भाजपा-आरएसएसने या संकटाचा वापर करून लोकांमध्ये धर्माच्या आधारे फूट पाडण्याचा कार्यक्रम वेगाने पुढे नेला आहे, जेणेकरुन जनतेचे लक्ष बेरोजगारी, महागाई, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवा, घरे. इ. वास्तविक समस्यांपासून विचलित व्हावे आणि भांडवली लूटीला विनाअडथळा वाव मिळावा.

पुरोल्यातील अपहरणाच्या घटनेने या प्रकल्पाला आणखी चालना मिळाली आहे. पुरोलामध्ये काय घडले आणि त्यानंतर घडलेल्या घटनांचा क्रम थोड्या तपशीलात पाहणे बोधप्रद आहे कारण फॅसिस्ट यंत्रणा कशी कार्य करते हे समजण्यास त्याने मदत होईल.

### पुरोला घटना आणि नंतरच्या घडामोडी

26 मे रोजी दुपारी, उत्तराखंडच्या उत्तरकाशी जिल्ह्यातील पुरोला या शहरात, एका 14 वर्षांच्या मुलीने मुख्य बाजारपेठेत उभ्या असलेल्या दोन पुरुषांना रस्ता विचारला. पुरोला पोलीस ठाण्याचे प्रभारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, उबेद खान, वय 24, ज्यांचे कुटुंब शहरात एक छोटासा व्यवसाय चालवते आणि जितेंद्र सैनी, वय 23, मोटारसायकल मेकॅनिक, या दोघांनी मुलीला परिसरापासून दूर असलेल्या पेट्रोल पंपावर नेले आणि तेथे एका रिक्षा बोलावली. मुलीला रिक्षात बसवले जात असल्याचे पाहून स्थानिकांनी ओरडा केला, आणि त्यानंतर खान आणि सैनी घटनास्थळावरून पळून गेले.

त्याच दिवशी पुरोला पोलीस ठाण्यात आयपीसीच्या कलम 363 (अपहरण), 366ए (अल्पवयीन मुलीची खरेदी) आणि पॉक्सो कायद्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या दिवशी दोघांना अटक करण्यात आली. खरेतर या घटनेने राज्यात आणि देशात महिलांच्या सुरक्षेच्या सतत ढासळत चालेल्या स्थितीबद्दलच्या वादाला तोंड




फुटायला हवे होते. 2020 ते 2022 दरम्यान उत्तराखंडात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये 36 टक्के – अपहरणाच्या घटनांमध्ये 56 टक्के आणि बलात्काराच्या घटनांमध्ये 30 टक्के – वाढ झाली. संपूर्ण देशात दर महिन्याला महिलांविरुद्ध सुमारे 1,200 गुन्हे नोंदले गेले. पीडित आणि कुटुंबीयांना गुन्हेगारांकडून घाबरवल्यामुळे किंवा एफआयआर नोंदवू नये म्हणून पोलिसांना लाच देण्यात आल्याने आणि अशाच अनेक कारणांनी नोंद न झालेल्या प्रकरणांच्या संख्येचा आपण फक्त अंदाज लावू शकतो. ऑलिम्पिक पदकविजेत्या कुस्तीपटूंना भाजप खासदार ब्रिजभूषण सिंग यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्यासाठी काय-काय करावे लागले हे सर्वश्रुत आहे.

मात्र, पुरोल्यातील घटनेने महिलांच्या सुरक्षेच्या बिघडलेल्या स्थितीबद्दल चर्चेला तोंड फुटले नाही. पुरुषांना स्त्रियांकडे लैंगिक वस्तू म्हणून पाहण्याची शिकवण देणारी पुरुषसत्ताक मानसिकता कुठून येते असा प्रश्न यातून निर्माण झाला नाही. त्याऐवजी, अपहरणाच्या प्रयत्नाचे रूपांतर 'लव्ह-जिहाद' प्रकरणात केले गेले. अपहरणातील गैर-मुस्लिम आरोपींकडे दुर्लक्ष करण्यात आले, फक्त मुस्लिम आरोपीवर प्रकाशझोत टाकण्यात आला आणि धार्मिक संघर्षाला यशस्वीरीत्या तोंड फोडले गेले. परिणामी शहरातून 42 मुस्लिम कुटुंबांना रातोरात पलायन करावे लागले (तीन महिन्यांनंतर, फक्त निम्मी कुटुंबे परत आल्याची नोंद आहे).

### द्वेष पेरण्याची आणि 2024 च्या निवडणुकीसाठी जमीन तयार करण्याची एक सुव्यवस्थित मोहीम

29 मे रोजी (घटनेच्या तिसऱ्या दिवशी) विश्व हिंदू परिषदेने "लव्ह-जिहादी आणि मुस्लिम" यांनी पुरोला सोडावे अशी मागणी करणारी एक मोठी रॅली आयोजित केली आणि पुरोलाचे ध्रुवीकरण सुरू झाले. विहिंपच्या सदस्यांनी मुख्य बाजारपेठ बंद करवली, मुस्लिमांच्या मालकीची दुकाने आणि स्टॉलची तोडफोड केली (ध्यानात घ्यावे की पुरोलाच्या लोकसंख्येच्या 1 टक्के पेक्षा कमी मुस्लिम आहेत आणि शहरातील 700 स्टॉल्सपैकी सुमारे 40 मुस्लिमांचे आहेत) आणि मुस्लिम घरांसमोर, पोलिसांच्या उपस्थितीत व सहकार्याने(!) भडकावणाऱ्या घोषणा दिल्या. "देवभूमी" उत्तराखंडमधून मुस्लिमांच्या वांशिक शुद्धीकरणाची मागणी करणारे विहिपचे निवेदन एसडीएमने आदरपूर्वक स्वीकारले! मुस्लिम दुकानांवर नंतर 'X' (नाझी जर्मनीच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण करून देणारे) चिन्हांकित करण्यात आले आणि देवभूमी रक्षा अभियानाच्या नावाखाली नोटीस लावण्यात आली –

*"लव्ह-जिहादींना याद्वारे सूचित केले जाते की त्यांनी येत्या 15 जून रोजी होणाऱ्या महापंचायतीपूर्वी आपली दुकाने रिकामी करावीत. जर या निर्देशाचे पालन केले नाही तर त्यांचे भवितव्य फक्त काळच ठरवेल."*

या महापंचायतीच्या पूर्वतयारीसाठी उत्तरकाशी, मोरी, गंगोत्री, नौगाव, बरकोट, चिन्यालीसौर, डुंडा, दमता, नेतवार आणि सांक्री या आसपासच्या शहरांमध्ये संघ परिवाराच्या गुंडांनी "इशारा रॅली" काढल्या. गौचर, इमलीखेडा, चक्रता आणि तुनी येथे अशाच प्रकारच्या "लव्ह-जिहाद"च्या घटना रचल्या गेल्या. त्यांनी मुस्लिमांना दुकाने नाकारली जावीत, बाहेरील लोकांची अतिरिक्त सरकारी "पडताळणी" केली जावी किंवा मुस्लिमांना हद्दपार करावे असे आवाहन केले. मुस्लिम रहिवाशांना भाड्याने घरे देणाऱ्या घरमालकांना सांगण्यात आले की त्यांना एकतर त्यांची मालमत्ता रिकामी करावी लागेल किंवा त्यांच्या भाडेकरूंच्या कृतीचे परिणाम भोगावे लागतील. टिहरीच्या लगतच्या जिल्ह्यात, विहिंप आणि बजरंग दलाने जिल्हा प्रशासनाला सादर केलेल्या आणखी एका निवेदनात असे म्हटले केले आहे की ग्रामीण भागात मुस्लिमांचा वाढता प्रसार "आमच्या" रोटी, बेटी आणि चोटी (जीविका, महिला आणि धर्म) साठी धोका आहे. त्यांनी नैनबाग, जाखर, नागटिब्बा, थातूर, सकलाना, दमटा, पुरोला, बरकोट आणि उत्तरकाशी या शहरांमधून मुस्लिमांना 10 दिवसांत जबरदस्तीने बाहेर काढण्याची मागणी केली, जी पूर्ण न केल्यास त्यांनी धरणे आंदोलन करून पूल आणि महामार्ग रोखण्याची धमकी दिली. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्करसिंग धामी यांनी डोंगराळ भागातील उच्च पोलीस अधिकाऱ्यांची बैठक घेतली आणि 'लव्ह जिहाद' प्रकरणांमध्ये कठोर कारवाई करण्याच्या सूचना पोलिसांना दिल्या.

या घटनेच्या दोन आठवड्यांनंतरही द्वेषाच्या ज्वाला धगधगत राहिल्या. 15 जूनची महापंचायत जेव्हा उच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे स्थगित करावी लागली तेव्हा हिंदू रक्षा सेनेचे प्रमुख स्वामी प्रबोधानंद गिरी महामंडलेश्वर यांनी फेसबुकवर पोस्ट टाकून म्हटले की हिंदूंनो "स्वतःच्या भ्याडपणा आणि नपुंसकतेसाठी सरकारला दोष देऊ नका" आणि म्हटले की जेव्हा म्यानमारच्या बौद्धांनी शस्त्रे उचलली होती (रोहिंग्यांचा नरसंहार करण्यासाठी) तेव्हाच तेथील सरकारने त्यांना पाठिंबा दिला होता. 25 तारखेला महापंचायतीची आणखी एक घोषणा झाली होती जी पोलिसांनी त्याविरोधात सल्ला दिल्यानंतर स्थगित करण्यात आली. "सवलत" म्हणून, पोलिसांनी जाहीर केले की ते उत्तराखंडच्या लव्ह-जिहाद कायद्याच्या (उत्तराखंड धार्मिक स्वातंत्र्य कायदा (सुधारणा), 2022) कोणत्याही उल्लंघनासाठी गेल्या पाच वर्षांतील सर्व आंतर-धार्मिक विवाहांची तपासणी करतील. राज्य महिला आयोगाने पोलिसांना राज्यात "कोणीही स्वतःची धार्मिक ओळख लपवत नाहीये" याची हमी देण्यास सांगितले, आणि मुस्लिम पुरुष हिंदू स्त्रियांना आमिष दाखवण्यासाठी स्वतःची धार्मिक ओळख लपवतात या अपप्रचाराच्या शीडात हवा भरली.

17 जून रोजी, हनुमान चालिसेच्या सामूहिक पठणानंतर, मुस्लिमांच्या मालकीच्या दुकानांची तोडफोड करण्यात आली, हल्दवानी, नैनिताल येथे दुकाने जबरदस्तीने बंद करण्यात आली आणि एका मुस्लिम तरुणाने "प्राणी क्रूरता" केल्याच्या कथित घटनेचे कारण देत 15 दिवसांच्या आत जागा रिकामी करण्यास मालकांना सांगितले. या घटनेचा तपशील पोलिसांनी कधीच स्पष्ट केला नाही. त्यांनी कट्टरतावाद्यांविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदवला नाही, असे सांगून की कोणीच तक्रार दाखल केलेली नाही (सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे की द्वेषपूर्ण भाषणाच्या घटनांमध्ये पोलीस स्वतःहून कारवाई करू शकतात). 18 जून रोजी, उत्तरकाशी जिल्ह्यातील धौंती येथे हिंदू दुकानदार आणि स्थानिक भाजप नेत्यांनी सर्व मुस्लिम रहिवाशांच्या पडताळणीच्या मागणीसाठी आणखी एक आंदोलन आयोजित केले होते. दिवसभर बाजार बंद घोषित करण्यात आला. स्थानिक व्यापारी मंडळाच्या अध्यक्षांनी "विशिष्ट समुदायातील फेरीवाल्यांची आणि विक्रेत्यांची वाढती संख्या" याबद्दल भीती व्यक्त करणारे भाषण दिले. "आम्ही आता हे बाहेरचे लोक आमच्या घरांमध्ये आणि दुकानात रोज पाहत आहोत. या लोकांना पडताळणी प्रक्रियेतून जावे लागेल." पोलीस कारवाई झाली नाही. 19 जून रोजी हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांनी काल्सी मार्केट, डेहराडूनमध्ये हिंदू देवतांच्या पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तू विकल्याबद्दल आणि काही इतर मांसाची दुकाने चालवल्याबद्दल मुस्लिमांविरुद्ध आंदोलन केले. हे पुरुष स्वतःची धार्मिक ओळख लपवत असल्याचा आरोप त्यांनी केला. असे करणाऱ्या कार्यकर्त्यांवर कोणतेही गुन्हे दाखल झाले नाहीत.

परंतु, **20 जून रोजी, पुरोला पीडितेच्या मामांनी एका वृत्तपत्राला सांगितले की या घटनेला कोणतीही धार्मिक बाजू नाही.** "पहिल्या तासापासून याला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न झाला. उजव्या विचारसरणीच्या कार्यकर्त्यांनी स्वतःहून आमच्यासाठी पोलीस तक्रारही तयार केली, पण पोलिसांनी ती

पान 14 वर

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॅार, भायखळा सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई - 9820017588 येथे मुद्रित